
# हाकारा

वर्ष विसावे : अंक तिसरा-चौथा
जुलै-डिसेंबर १९९९



## बोर्डी परिसर : अभ्यास विशेषांक

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. अ. रा. कुलकर्णी |
| उपाध्यक्ष | : | वैद्यरत्न भा. पु. नानल |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| सह सचिव | : | श्री. पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : | डॉ. वि. श्री. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. न. शं. देवधर |
| | : | डॉ. विजय भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. शं. गो. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |
| | : | श्रीमती आरती कौलगेकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ❑ संपादकीय | | | २ |
| ❑ किनाऱ्यावरचा कल्पवृक्ष | : | मिलिंद बोकील | ७ |
| ❑ कोसबाड आणि आसपास | : | स. ह. देशपांडे, शरद कुलकर्णी, वसंत देशपांडे | ३५ |
| ❑ जगदीश : एक कलंदर अभ्यासक | : | रा. के. मुटाटकर | ७२ |



वर्ष विसावे : अंक तिसरा व चौथा
जुलै - डिसेंबर १९९९

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन - ५८८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरूषोत्तम आगाशे

**मुखपृष्ठ**
पुरूषोत्तम आगाशे

मूल्य रु. ३२/-

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी असाईन सिस्टीम्स्,
६६७, दत्तवाडी, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे - ३०.


अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व हाकारा परिवारातील आमचे सहकारी मित्र डॉ. मिलिंद बोकील यांनी अलीकडे ठाणे जिल्ह्यातील बोर्डी परिसरातील वारल्यांच्या जीवनातील परिवर्तनाचा अभ्यास केला. चिक्कू व भाजीपाल्याच्या वाड्यांचा त्यांच्या जीवनावर काय परिणाम झाला याबाबत त्यांचे विश्लेषण हाकाराचा या अंकात आम्ही प्रकाशित करीत आहोत.

भारतासारख्या शेतीप्रधान देशात आता औद्योगिकरण, माहिती तंत्रज्ञानाद्वारे लक्ष्मीची उपासना, जगाच्या आर्थिक मुख्य प्रवाहात मानाचे स्थान मिळविण्यासाठी धडपड चालू आहे. त्याकरिता नागवलेले गरीब आदिवासी अक्राळविक्राळ शहरांत मजूरांच्या रूपात किड्या-मुंग्यांचे जीवन जगू पाहत आहेत. अशा पार्श्वभूमीवर, बोर्डी परिसरातले अनुभव, वांझदा भागातील उपक्रम, राळेगण सिद्धीचे यश अभ्यसनीय व अनुकरणीय आहेत. या आर्थिक विकासांच्या उपक्रमाबरोबरच जनार्दन महाराज वळवी, आमचे पूर्वीचे अध्यक्ष, यांचे धुळे जिल्ह्यातील अक्राणी महालातील शिक्षणाद्वारे विकासाचे प्रयत्नही वंदनीय आहेत.

आमचा बोर्डी परिसराचा संबंध गेल्या ३५ वर्षांचा जुना आहे. आचार्य भिसे गुरूजींच्या आमंत्रणामुळे पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागाचे विद्यार्थी कोसबाड व खुनवडा या गावांचा अभ्यास करण्यासाठी डिसेंबर १९६५ व जानेवारी १९६६ या दरम्यान कोसबांडला वस्तीत होते. तेव्हा प्रथम डॉ. जयंत पाटील यांच्याशी संबंध आला. श्रीमती ताराबाई मोडक व अनुताई वाघ यांचे कार्यही पाहिले, यांच्याशी चर्चाही झाल्या. त्यावेळेस वांगी विकणाऱ्या आदिवासी स्त्रीस माप व भाव यांचे ज्ञान नव्हते. दोन आण्याचे तेल विकत घेण्यासाठी बोर्डीच्या आठवडे बाजारात आदिवासी पायपीट करीत. त्यानंतर अनुताईंचा आमचा संबंध दुणावला. त्यांनी हाकारासाठी लेखन केले. त्यांच्या स्मरणार्थ जुलै-डिसेंबरचा हाकाराचा जोड अंक काढण्यात आला. डॉ. जयंत पाटील यांच्याशी आमचा स्नेह आजही काम आहे. "बोर्डीचा फुलोरा म्हणजे कोसबाड." त्या कोसबाडला नावारूपाला आणलं डॉ. जयंत पाटील यांनी, त्यावेळच्या वारल्यांच्या शोषणाविषयी आचार्य भिसे गुरूजींनी मला उत्तरादाखल लिहिलेले पत्र आम्ही पूर्वी हाकारात छापले होते. ते या अंकात परत पुनर्मुद्रित केले आहे.

डहाणूच्या बाजारात आदिवासींच्या भाजीला भाव मिळत नसे. ज्या भैय्याबद्दल मिलिंद बोकील यांनी आपल्या लेखात उल्लेख केला आहे, ते भैय्या डोकीवरून पाट्या ओढून घेत व काही पैसे आदिवासींच्या

हातावर कोंबीत असत. याच पार्श्वभूमीवर गोदावरी परूळेकरांनी वारल्यांचे बंड घडविले. आचार्य भिसे गुरूजींनी शिक्षणाचा प्रसार केला व सहकाऱ्यांच्या मदतीने जंगल कामगार सहकारी संस्था काढल्या. ताराबाई मोडक व अनुताईंनी शाळा कुरणापर्यंत नेली. हरिश्चंद्र पाटील व जयंत पाटील यांनी शेतीचे तंत्रज्ञान विकसित करून आदिवासींपर्यंत पोहोचविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. हे सर्व लोक बोर्डी परिसरात पाय रोवून राहिले व अजूनही आहेत.

यानंतर आमच्या संबंधामुळे, मानवशास्त्राचे दोन इराणहून आलेले विद्यार्थी व पुण्याच्या स्पायसर कॉलेजचे विद्यार्थी १९७६ साली परत बोर्डी परिसरात जाऊन आले. मध्यंतरी मौजच्या १९७८ च्या दिवाळी अंकात प्राध्यापक स. ह. देशपांडे, शरद कुलकर्णी व कै. वसंत देशपांडे यांनी 'कोसबाड आणि आसपास' असा कोसबाडच्या संस्था व त्यांचा वारली जीवनावर परिणाम या अर्थी एक प्रदीर्घ लेख लिहिला. ही सगळी मंडळीही आमची ज्येष्ठ मित्रच.

तेव्हा केवळ मिलिंद बोकीलांचा लेख न छापता, देशपांडे - कुलकर्णींचा लेखही पुर्नमुद्रित केला आहे व त्यावर संपादकीय टिप्पणी ही केली आहे. त्यामुळे २०-२२ वर्षांची तौलनिक पहाणी एका ठिकाणी मांडता येते.

गेल्या ५०-७५ वर्षांपासून आदिवासी हा पारंपारिक शेतीनिष्ठ, शेतीप्रिय समाज आहे या धारणेने समाजसुधारक, शेती तंत्रज्ञ व प्रशासक आपल्या आदिवासींबाबत व त्यांच्या जमिनीबाबत, जंगल जमिनीबाबत धोरणात्मक विचार प्रकट करीत आलेले आहेत. शेती करणे, पोटापुरती करणे, त्यासाठी काही परंपरेने प्राप्त झालेले मागासलेले तंत्रज्ञान वापरणे व शेती उत्पन्नाचे साधन म्हणून वापरणे या दोन बाबी वेगवेगळ्या आहेत. शेतीशी, जमिनीशी भाविनक नाते आदिवासींचे केव्हापासून आहे ? ग्वाल्हेरच्या खेड्यातील एका किराट जातीच्या शेतकऱ्याने कलियुगाची व्याख्या १९५८ साली माझ्याजवळ अशी केली. ''जब जोरू और जमीन बाजारमे बिकेगी वो कलियुग'' म्हणजे, जेव्हा जमीन व स्त्रीची बाजारात विक्री होईल ते कलियुग. असे जमिनीशी भावनिक नाते भारताचा शेतकरी तसेच पर्ल बकच्या 'गुड अर्थ' या कादंबरीतील चिनी शेतकरी सांगतात. ब्रिटिशांपासून सुरू झालेल्या प्रशासनाच्या धोरणांमुळे शतकानुशतके जतन करणाऱ्या आदिवासींना जंगल पारखे झाले आहे. आदिवासी जरी शेतीतून धान्य काढत होता तरी त्याचा पिंड निसर्गातून, जंगलातून अन्न संकलन करण्याचा राहिला आहे. जंगलातून हुसकल्यावर शेतीशिवाय किंवा जंगलमजूरी व शेतमजूरीशिवाय त्याला तरणोपाय नाही. तेवढ्यावर भागत नाही तेव्हा तो महानगराच्या विळख्यात जगण्यासाठी ओढला जातो

व जंगलचा राजा उघड्या डोळ्याने मरण भोगतो.

आदिवासींना अतिमागासलेले, प्रिमिटिव्ह, कां म्हणावे ? त्यांच्यात मालमत्तेच्या कल्पना साम्यवादी स्वरूपाच्या कां असतात ? व्यक्तिगत मालमत्तेची जाण त्यांच्यात केव्हांपासून निर्माण झाली ? सर्वांची सामायिक जमीन, जंगल, कुरण, पाणी, शिकारीची जागा अशी भावना कमी होत आहे का ? त्याऐवजी माझी जमीन, माझे शेत, माझे उत्पन्न ही भावना केव्हापासून वाढीस लागली ? घटनेच्या ७३ व्या दुरूस्तीतही आदिवासी ग्रामसभेस इतर जातीनिष्ठ शेतकी समाजातील ग्रामसभेपेक्षा इतर जातीनिष्ठ शेतकी समाजातील ग्रामसभेपेक्षा सामायिक मालमत्तेच्या संदर्भात जास्त अधिकार देण्यात आलेले आहेत. असा सामायिक प्रवृतीचा वारसा असलेला समाज मागासलेला कां राहातो ? त्यांना विकासाच्या संधी म्हणजे शाळा, दवाखाना, प्रगत तंत्रज्ञान बहाल केले तरी त्याचा उपयोग करण्याची प्रवृत्ती व औद्योगिक प्रशिक्षण संस्थात येण्याची प्रवृत्ती, उद्योगधंदे काढल्यास त्याचा उपयोग करण्याची क्षमता त्यांच्यात नसते. म्हणून धरणाखाली जाणाऱ्या जमिनीचा पैशात मोबदला म्हणजे त्याची फसवणूक आहे. कारण पैशाचा विनियोग करण्याची क्षमता त्यांच्यात नाही. पैसा त्यांना वाढविता येत नाही, म्हणजेच ते मागासलेले असे समीकरण आहे.

पर्यावरणाशी जवळचे नाते असणारा आदिवासी, स्वत:पुरती दारू काढणारा आदिवासी हा दारूच्या आहारी जातो तो दारिद्र्यामुळे व जमीन हडप करणाऱ्या सावकारी फसवणुकीमुळे. आणि त्याने शेतीचे, विहीरीचे तंत्रज्ञान आत्मसात करून बाजारात भाव मिळेल अशा पिकांची, फळांची, भाजीपाल्याची शेती केली तरी त्याचा फायदा व्यापाऱ्याला किंवा दलालाला मिळतो. आदिवासी बाजारात फसविला जातो. शासकीय आदिवासी विकास महामंडळाला आदिवासी परिस्थितीने गांजलेला असताना पोटाचे धान्य विक्रीस आणतो याची जाण नसल्याने, अव्यवहार्य नियम करण्यात येतात. अशा आदिवासींना कोसबाडच्या कृषि-शिक्षण संस्थेने शहाणं करावयाचे आहे, या अडचणींचा उहापोह देशपांडे-कुलकर्णींच्या लेखात आहे. विहिरी स्विकारीत नाही, तंत्रज्ञान स्विकारीत नाही याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. समाजपरिवर्तन एकंदर प्रातांच्या किंवा देशाच्या वाटचालीवर अवलंबून असते. ती प्रक्रिया अतिशय मंदगतीने चालणारी प्रक्रिया आहे. अनुताईंना पाड्यांवर घराघरात जावे लागले. जनार्दन महाराजांनी अक्राणीत घरी जाऊन मुलं गोळा केली. एके काळी शिकविण्यापेक्षा मुलं गोळा करण्यात गुरूजींचा वेळ जास्त जावयाचा. ती परिस्थिती आता पालटली आहे. शिक्षणाची गोडी निर्माण झाली आहे. तरी जास्त शिकला तर जमीन, शेती सोडून कचेरीत शिपाई होण्याची मनीषा निर्माण होईल म्हणून काही पालकांचा आपल्या पाल्यांना जास्त शिकविण्यास विरोध आहे.

स्वत: डॉ. जयंतरावांनी एकदा मला सांगितले की त्यांनी विनोबांना त्यांची खंत सांगितली. ''आम्ही वीस वर्षे कोसबाडला विहिरी व इतर शेती तंत्रज्ञानाचे कार्य करीत आहोत पण आमचा प्रभाव शेजारील आदिवासींवर होत नाही'' विनोबांनी त्यांना विचारले, ''तुम्ही वीस वर्षात आदिवासींबरोबर कितीदा जेवला? जास्त वेळा, वारंवार जेवत जा.'' हा मानवशास्त्रीय संशोधनपद्धतीचा मंत्र विनोबांनी त्यांना सांगितला.

आता त्याच परिसरात काय स्थित्यंतर झाली आहेत हे बोकीलांचा लेखात आहे. चिक्कूची रोपं पारशी वाडी मालक त्यांना देत नसत. परंतु वारली चिक्कूचे तंत्रज्ञान मजूर म्हणून शिकला होता. त्यास जयंतरावांनी व त्यांच्या संस्थेने रोपं दिल्याक्षणी कायापालट झाला. हाच कायापालट नाशिकमधेही हरसूल भागात दिसतो. मणिभाई देसाईंनी भारतीय कृषी-उद्योग संस्थानाच्या माध्यमातून गुजरात व महाराष्ट्रातील आदिवासींना आंब्याची रोपे दिली, कलम करायला शिकविले व बाजारपेठ मिळवून दिली. काही ठिकाणी कलिंगड, काही ठिकाणी भाजीपाला असे वाडी प्रकल्प चालू आहेत. आंब्यावर प्रक्रिया करायलाही शिकले आहेत. सुरवातीला दारू सोडून, मणिभाईंचे तंत्रज्ञान स्वीकारून आलेली पाच कुटुंबे आता पाच हजारांच्या वर गेली आहेत. त्याचे मूल्यमापन करण्यास मणिभाईंनी मला सांगितले होते. हे लोक परत दारूकडे वळले नाहीत ही समाधानाची बाब होती.

अण्णा हजारे म्हणतात तसे फळं येणाऱ्या झाडांना लोक दगड मारतात. कोसबाड मोहोरावर आले असताना जयंतरावांवर १९८४ च्या सुमारास दगड वर्षाव झाला. त्याच्या परिणामस्वरूप त्यांनी जास्त जोमाने कार्य केले. त्याची परिणती मिलिंद बोकीलांनी आपल्या लेखात समर्थपणे मांडली आहे. साधारण त्याच सुमारास, मी व शरद कुलकर्णी कोसबाडला जयंतरावांकडे गेले होते. तेव्हा तरूण आदिवासी कार्यकर्त्यांची एक बैठक झाली. त्यात त्या तरूणांनी पाण्याचा प्रश्न हा एक नंबरचा प्रश्न म्हणून मांडला. त्यांचे म्हणणे असे की पारश्यांच्या विहिरी जास्त खोल असतात. ते विजेवर २४ तास पंप चालवितात त्यामुळे आदिवासींच्या विहिरींना पुरेसे पाणी नसते. त्यावर त्यांचा तोडगा असा की आदिवासींच्या विहिरी खोल कराव्या किंवा पारश्यांना पंपाचा अनिर्बंध वापर बंद करावा. त्यासाठी चळवळ करावी. म्हणजे विहिरीचे महत्त्व, पाण्याचे महत्त्व त्यांना १९८३-८४ साली उमगले होते. ते देशपांडे-कुलकर्णीच्या ७-८ वर्षापूर्वीच्या अभ्यासात आढळून आले नाही. आदिवासींचे विश्व विस्तारित होण्यास बराच काळ लोटावा लागतो. अनुताई व जनार्दन महाराजांचा हाच अनुभव आहे. शेतीची पारंपारिक गोडी नसलेला आदिवासी, योग्य शेतजमीन नसलेला आदिवासी, जेमतेम सहा महिने पुरेल एवढेच उत्पादन मिळेल अशा अर्थव्यवस्थेतील आदिवासी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे दुरापास्त. नवीन शेती तंत्रज्ञान प्रथम श्रीमंत शेतकरी घेतो, गरिबातला गरीब घेत नाही. स्वत:च्या पोटाची खळगी जेमतेम ५-६ महिने भरणाऱ्या शेतावर कोण नवीन प्रयोग करेल ?

तंत्रज्ञान आतमसात करणे हा केवळ आदिवासींचा प्रश्न नसून सर्वसाधारण समाजाच्या परिवर्तनशीलतेचा प्रश्न आहे. लोकसंख्या नियंत्रण, रोग निर्मूलन, शेतीसुधार अशा अनेक बाबतीत तंत्रज्ञान उपलब्ध आहे. परंतु समस्या आहे तशाच आहेत. तंत्रज्ञान असणे व त्याचा वापर उत्पादनासाठी करणे आणि त्यास बाजारपेठ उपलब्ध करून त्यातून नफा किंवा उत्पन्न मिळविणे या अनेक घटनेतील कड्या आहेत.

बोर्डी परिसर हा मुंबईच्या बाजारपेठेत जवळ आहे. एका बाजूला मुंबईचे अक्राळविक्राळ सर्व समावेशक व गिळंकृत करण्याची क्षमता असलेले रूप तर दुसरीकडे बोर्डीत राहून शिक्षणाचा प्रसार, आदिवासींना भावेल अशा तंत्रज्ञानाचा प्रसार असे गांधीवादी, सर्वोदयी स्वरूप या परस्परविरोधी शक्तींच्या मुकाबल्यात बोर्डीची सरशी होत आहे असे मिलिंद बोकीलाच्या अभ्यासावरून दिसते. महात्मा गांधींनी ब्रिटिशांशी स्वातंत्र्याचा लढा देत असताना रचनात्मक कार्यक्रमांद्वारे अनेक सर्वोदयी कार्यकर्त्यांनी प्रेरणा दिल्या. बोर्डी परिसर व तेथील कार्यकर्ते हे त्या गांधीवादी प्रेरित वारसाचे मानकरी आहते जयंतराव पाटील यांनी आदिवासी संस्कृतीला छेद न देता चिक्कू व भाजीपाल्याचे तंत्रज्ञान वारली आदिवासीस दिले. त्याचे विश्लेषण आमचे मित्र डॉ. मिलिंद बोकील यांनी या हाकाराच्या अंकात दिले आहे. जव्हार भागात मणिभाई देसाई व त्यांचे 'बायफ'चे सहकारी डॉ. गिरीश सोहोनी यांनी वाडी प्रकल्प चालविले. त्याविषयी स्वतंत्र अभ्यास करून हाकाराचा अंक काढला होता. वाडी प्रकल्प मोखाडा, पेठ, सुरगाणा भागात वाढविण्यापूर्वी तेथील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास आम्ही केला व तो हाकाराच्या एप्रिल-जून १९९६ च्या अंकात पुढे आणला. तसेच वारली लोकगीते व बोलीभाषा विशेषांक जानेवारी-जून १९९७ त प्रकाशित केला.

आदिवासी संस्कृती व त्याचे वेगवेगळे पैलू यांचे अभ्यास, याबाबतचे विचार हाकारातून पुढे आणणे हे आमचे कर्तव्य आहे असे आम्ही मानतो. म्हणून या अंकातून जयंतरावांनी गांधीवादी बोर्डीच्या परिसरात, वारली आदिवासींच्या जीवनास दिलेली कलाटणी मांडली आहे. अशा उपक्रमांच्या अध्ययनाचे हाकारात स्वागत आहे.

**- रा. के. मुटाटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशतः अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# “किनाऱ्यावरचा कल्पवृक्ष”

- मिलिंद बोकील

\- १ -

सुरेश जीवल्या कान्हात हे डहाणू तालुक्यातील मोहपाड्याचे एक लहान वारली शेतकरी. जमीन दोन एकर. त्यात फक्त पावसाळ्यात भात होई. भोवतालच्या चिक्कूच्या वाड्यांवर मजुरी करणे हा मुख्य व्यवसाय. काही वर्षे गावातल्या तलाठी कचेरीतही हरकाम्या म्हणून काम केले. सुमारे १२ वर्षापूर्वी त्यांनी कोसबाडच्या कृषी विज्ञान केंद्रातून चिक्कूची कलमे आणून वाडी केली. शेतावर पाणी नव्हते तेव्हा डोक्यावरून पाणी आणून ती शिंपली नंतर शेतात बोअर घेतले. आज त्यांच्याकडे दिडशेच्यावर कलमे आहेत. नारळ, आंबा, शेवगा, चिंच, लिंबू अशी हरतऱ्हेची झाडे आहेत. ह्या सगळ्याचे वार्षिक उत्पन्न दीड लाखाच्या वर आहे. घर अद्यापही जुने कौलारू पद्धतीचे आहे पण त्यात गॅसपासून टीव्हीपर्यंत शहरात सापडणारी सर्व साधने आहेत. सुरेश कोतवाल ह्यांना पाच मुले. मोठी मुलगी संगीता डहाणू कॉलेजला बारावीत शिकते. ती शासकीय हॉस्टेललाच राहते. धाकटी सुनंदा बोर्डीच्या हायस्कूलला नववीत आहे. त्यानंतरची प्रतिमा आठवी तर नंतरचे नितीन व अनिकेत अनुक्रमे सातवी व पाचवीत आहेत.

शंकर महादू गोरखणा हे डहाणू तालुक्यातल्या मानपाड्याचे वारली शेतमजूर. समजायला लागल्यापासून ते त्यांच्या आसपासच्या परिसरातील चिक्कूच्या वाड्यांवर मजूरी करत. आपल्या मजुरीतून पैसा साठवून त्यांनी सुमारे बारा वर्षांपूर्वी आपल्या पाड्यावर एक लहानसे किराणा मालाचे दुकान टाकले. दुकान चांगले चालले. मग त्यातून त्यांनी डिझेल मशीनवर चालणारी एक पिठाची चक्की टाकली. त्यातले पैसे साठवून घर बांधले. घराभोवती उत्तम परसबाग करून त्यात आंबा, चिंच, नारळ, सिताफळ अशी हरतऱ्हेची झाडे लावली. पण मनातून खरी इच्छा चिक्कूची वाडी करायची. कारण शंकर महादू हे कलमे करण्यात एकदम पटाईत. त्या बाबतीत आसपासच्या सगळ्या पाड्यांवर त्यांचा हात कुणी धरणार नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या ताब्यातला एक एकराचा एकसाली जंगल प्लॉट त्यांच्याकडे आला. ही अगदी पडीक जमीन होती. ह्या जमिनीत त्यांनी बोर्डीच्या आदिवासी कल्याण प्रतिष्ठानकडून आणलेली ४३ चिक्कूची कलमे लावली. चार ठिकाणी बोअरवेल केली पण कुठेही पाणी लागले नाही. आता शेजारच्या शेतकऱ्याकडून पाणी विकत घेतात. ह्यांची चिक्कूची झाडे दोन वर्षांपूर्वीची असली तरी दिसतात पाच वर्षांच्यासारखी कारण त्यांनी प्रत्येक झाडाला एका रोपाऐवजी तीन तीन रायणरोपांची जोड दिली आहे. घाटात चढणाऱ्या रेल्वेगाडीला डबल इंजिने लावावीत तशी.

गणपत रूपजी पागीर हे डहाणू तालुक्यातल्याच तलाईपाड्याचे अशिक्षित वारली शेतकरी. वडीलोपार्जित चार एकर जमीन. ती दोघा भावांच्या वाट्याला. दहा वर्षांचे असल्यापासून, शेजारच्या एका चिक्कूच्या बागेत वीस वर्षे गडी म्हणून मजूरी केली.

मजुरीचे पैसे बाजूला टाकत टाकत आपल्या शेतीत काही ना काही सुधारणा करण्याची धडपड चालू. पाण्याची सोय व्हावी म्हणून भावाबरोबर सामायिक बोअरवेल केली. १५० फूट खोल जाऊनही पाणी लागले नाही. पण त्यातून नाऊमेद न होता दुसरी बोअरवेल केली. तिला पाणी लागले. सुमारे २५,००० रुपये खर्च करून शेताला पाण्याचे साधन केले आणि तऱ्हेतऱ्हेचा भाजीपाला काढायला सुरूवात केली. आधी चटकन उत्पन्न होईल म्हणून केळी लावली आणि दोन वर्षांपूर्वी चिक्कूची १६० कलमे प्रतिष्ठानकडून आणून लावली. सबंध दिवस हे शेतातून हलत नाहीत. बायको डोक्यावर टोपली घेऊन बाजारात भाजी विकायला जाते. गेल्यावर्षी केवळ कांद्याचेच उत्पन्न ३५,००० रूपये झाले. त्यांना तीन मुली आणि दोन मुलगे. मुलगे सर्वात धाकटे. ते शाळेच्या जाण्याच्या वयात नाहीत. पण मोठी मुलगी चौथीत, मधली पहिलीत आणि धाकटी बालवाडीत जाते.

शिवाजी कुरसन भिमरा हेही जांबू गावचे वारली शेतकरी. त्यांचे वडील विहिरी फोडण्याची कंत्राटे घेत. त्यांना भूदान आंदोलनात सव्वा एकर जमीन मिळाली. ती कसायला सुरवात केली. वडील आचार्य भिसे यांच्या संपर्कात आले. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन त्यांनी कोसबाडच्या कृषि सेवा केंद्रातून २५ कलमे आणून लावली. स्वतःच्या हाताने १९६५ साली विहीर खणली. सुरवातीला मोट-नाड्याने कलमे शिंपली. वडील जांबू गावचे सरंपच झाले. आदर्श शेतकरी म्हणून बहुमानही मिळाला. शिवाजीचे शिक्षण मॅट्रीक पर्यंत झाले. नंतर कोसबाडला शेतीशास्त्राचा डिप्लोमा केला. मेहनत करून शेती वाढवली. आणखी जमीन विकत घेतली. कलमेही लावली. आज चिक्कू आणि भाजीपाल्याचे उत्पन्न दोन लाखांच्या पुढे असेल. शिवाजी आदिवासी प्रतिष्ठानचे काम करतात. सध्या सरपंच आहेत. त्यापूर्वी ते डहाणू पंचायत समितीचे उपसभापती होते.

रेडका देढीया धोडी हे धेनारपाडा गावातले धोडी जमातीचे शेतकरी. धोडी ही जमात मुळची गुजरातमधली पण महाराष्ट्रात तिचा समावेश अनुसूचित जमातीत केला जातो. कूळ कायद्याने ह्यांच्या वडिलांना दीड एकर जमीन मिळाली. ती हे आणि ह्यांचे भाऊ करतात. बरीच वर्षे त्यात फक्त भातशेती होती आणि भातशेतीत भागत नसल्याने हे मजुरी करत. १४ वर्षापूर्वी बोर्डीच्या आदिवासी प्रतिष्ठानकडून त्यांनी चिक्कूची ४ कलमे घेतली. ती जगली. मग शेतात बोअरवेल करून आणखी ७० कलमे लावली. कलमे मोठी होत असताना दरवर्षी भाजीपाला घेतला. सध्या त्यांचे चिक्कूचे उत्पन्न एक लाखाच्या पुढे आहे. स्वतःचा भाजीपाला ते विकतातच पण मोटरसायकलवरून आसपासच्या आदिवासींची भाजी गोळा करून दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजताची मुंबईला जाणारी बलसाड पॅसेंजर घोलवड स्टेशनला धरतात. त्यांच्या साधारण पाच पोती भाजीपैकी तीन पोती गाडीमध्येच विकली जातात. उरलेली दोन पोती घेऊन ते विरारला उतरतात. आणि तिथे भाजी विक्री करून परतीच्या गाडीने माघारी येतात. ह्यांच्या शेजारी राहणाऱ्या धोडी समाजातल्याच एकाने तीन चाकी टेम्पो घेतला आहे. तो केवळ भाजी वाहतुकीचा व्यवसाय करतो.

भिकू चमार दुबळा हे तलाईपाडा इथले दुबळा जमातीचे शेतकरी. वय वर्षे ७०. ही जमातही मुळची गुजराथी पण महाराष्ट्रात अनुसूचित जमातीत मोडणारी.

त्यांच्याकडे वडिलोपार्जित साडेपाच एकर जमीन होती. कोसबाडच्या कृषी सेवा केंद्राच्या प्रोत्साहनाने सरकारी तगाई कर्ज घेऊन त्यांनी स्वत:च विहीर केली. त्यावर आधी दहा वर्षे मोट हाकली. भाजीपाला काढला. मग विद्युत मोटर बसवून प्रतिष्ठानकडून कलमे आणली. आज त्यांच्याकडे सुमारे ३०० चिक्कूची कलमे, १०० नारळ व ३० आंब्याची झाडे आहेत. ह्यांची शेती एखाद्या आधुनिक फार्म सारखी दिसते. ह्या भागात होणारी प्रत्येक भाजी तर ते करतातच पण सर्व तऱ्हेची फुलझाडेही त्यांच्याकडे आहेत. त्यांचे शेतीचे वार्षिक उत्पन्न सहजगत्या पाच-सहा लाखांच्या वर आहे. पॉवर टीलरसारखी शेतीला लागणारी सर्व अवजारे तर आहेतच पण घरात गॅसपासून फ्रिजपर्यंतची सर्व साधनेदेखील आहेत.

उधऱ्या चेऱ्या हाडळ हेही तलाईपाड्याचे वारली शेतकरी. वय ५६-५७. मुळात भूमीहीन आणि अशिक्षित, अनेक वर्षे मजुरीच केली. मग थोडेसे पैसे साठवून एक फिरते दुकान सुरू केले. म्हणजे एका टोपल्यात बिडी, सिगरेट, माचीस, गोळ्या, बिस्किीटे असले साहित्य घालायचे आणि गावोगाव फिरायचे. दहा वर्षे तसा उद्योग केला. मग घरामध्ये किराणा मालाचे दुकान टाकले. पैसे साठवून एका मारवाडी शेठकडून ४००० रुपये एकर भावाने ४ एकर जमीन खरेदी केली. ती सगळी मुरमाड, उंचसखल होती. अपार कष्ट करून तिला वाहेतीखाली आणली. बँकेचे साधारण २०,००० रूपये कर्ज घेऊन विहीर खणली. भाजीपाला घेतला. मोटर-पंप बसवला. १७ वर्षापूर्वी म्हणजे १९८२ साली प्रतिष्ठानकडून ६० कलमे घेतली. ती मेहनत करून वाढवली. आज त्या ठिकाणी सूर्यप्रकाश खाली पोहोचू शकत नाही इतकी दाट वनराई झाली आहे. शेतीतल्या उत्पन्नाची नक्की खात्री कोणीही देत नाही पण गेल्या काही वर्षात उधऱ्या हाडळ यांचे उत्पन्न कधीही सव्वा लाखाच्या खाली गेलेले नाही.

नागणकस पाड्यावर सुरेश शिडवा खरपडे हे एक दुसरे वारली शेतकरी. कूळकायद्याने मिळालेली वडिलोपार्जित एक एकर आणि एक साली प्लॉटची दीड एकर अशी एकूण अडीच एकर जमीन. त्यात भातशेतीच व्हायची पण वडिलांनी विहीर खणून त्यात ३० कलमे लावली. ह्यांनी ती कलमे सांभाळली. घर चालवण्याकरता झाडावरून स्वत: ताडी काढण्याचा उद्योग केला. त्या उद्योगात स्वत: ताडीची ६० झाडे जोपासली. आज इतरांची १०० झाडे भाड्याने घेतलीत. दोन माणसे नोकरीला ठेवलेली आहेत. गेल्या वर्षी स्वखर्चाने ३०,००० खर्चून बोअरवेल केली. ह्या वर्षी पूर्ण जमिनीत कलमे लावणार. एकूण मुले सहा, चार मुली आणि दोन मुलगे. सर्वात मोठी मुलगी सातवी पास झाली पण इंग्रजीची भिती वाटते म्हणून तिने शाळा सोडली. दुसरी सातवीत शिकते. बाकीच्या दोघी बालवाडीत जातात. मुलांपैकी एकाने सातवीत शाळा सोडली, दुसरा चौथीत जातो.

ही उदाहरणाची लांबड कितीही लावता येईल. अगदी दोनशे अडीचशे पर्यंत. डहाणू तालुक्यातल्या घोलवड-बोर्डीच्या किनारपट्टीत असे अनेक आदिवासी शेतकरी आहेत की ज्यांनी आपल्या शेतीचा आणि जीवनाचा कायापालट केला आहे. ह्या प्रत्येकाचे नाव निराळे आहे, कुटुंबे निराळी आहेत, प्रत्येकाची कथा निराळी आहे पण ह्या सगळ्यांच्या जगण्यात एक समान सूत्र आहे. ते म्हणजे ह्या सगळ्यांनी चिक्कू लावला

आहे. हे सगळे आदिवासी आहेत, बहुसंख्येने अशिक्षित आहेत. अल्पभूधारक आहेत. आपले निम्मे आयुष्य त्यांनी रोजमजुरी करण्यात घालवले. ह्यांच्या वडिलांची पिढी तर आयुष्यभर जमीनदारांकडे बांधील गडी म्हणूनच वाढली. पण आज यातला प्रत्येकजण सहजगत्या मोटरसायकल घेऊन हिंडू शकतो आणि काहीजण तर बाजारात आलेली नवीन मोटारसुद्धा विकत घेऊ शकतात.

- २ -

महाराष्ट्रामध्ये बहुसंख्य आदिवासी असणारे जे तालुके आहेत त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्याचा फार वरचा क्रमांक लागतो. इथे सुमारे ६०% लोकवस्ती अनुसूचित जमातींची आहे. ही वस्ती बहुतांशी वारली समाजाची आहे आणि मग त्यानंतर कातकरी, दुबळा, धोडी, मल्हार कोळी इत्यादी. महाराष्ट्रातल्या आदिवासींमध्ये वारली ही एक महत्वाची जमात आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने भिल्ल, गोंड, कोकणा व महादेव कोळी ह्यांच्या खालोखाल वारली समाजाचा क्रमांक लागतो.

बहुतेक सर्व वारली ठाणे जिल्हयाच्या उत्तर भागात राहतात. काही प्रमाणात गुजरातमधल्या उंबरगाव तालुक्यातही ते आहेत. ह्या परिसरातले ते आदिम रहिवासी आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही. वारली हे मुळात शेतकरीच. डोंगरउतारावर वरी-नाचणी आणि सखल प्रदेशात भातशेतीच्या आधारानेच त्यांची उपजीविका चालते. ब्रिटिशांच्या काळात जमिनींचे हस्तांतरण फार मोठ्या प्रमाणावर झाले आणि सावकार, जमीनदार, व्यापारी, वाडीवाले आणि भ्रष्ट सरकारी कर्मचारी ह्यांच्याकडून त्यांचे अनन्वित शोषण झाले म्हणून एकेकाळी कष्टाळू शेतकरी म्हणून आपल्या परंपरागत भूमीत मानाने जगणाऱ्या वारल्यांची परिस्थिती हलाखीची झाली. एरवी महाराष्ट्रातल्या अत्यंत संस्कृतीसंपन्न समाजात वारल्यांची गणना होते. अर्थात वारल्यांमध्ये राजकीय जागृतीचे आणि सामाजिक सेवेचे कामही मोठ्या प्रमाणावर झाले आहे. त्यामध्ये गांधीवादी, सर्वोदयी कार्यकर्त्यांपासून मार्क्सवादी कम्युनिस्ट विचारसरणीच्या संघटनांचा मोलाचा वाटा आहे. आजमितीस महाराष्ट्रात जे जागृत आदिवासी समाज आहेत त्यात वारल्यांचा समावेश करावा लागेल.

ठाणे जिल्ह्याच्या उत्तरेकडच्या पालघर पासून गुजरातमधील बलसाड पर्यंतची किनारपट्टी हा भारतातला चिक्कू पिकवणारा क्रमांक एकचा भाग आहे. घोलवड हे त्याचे केंद्र मानायला हरकत नाही. चिक्कू म्हटले की ते घोलवडचेच असे समीकरण तयार झाले आहे. पण त्याला काही ऐतिहासिक कारणे आहेत. चिक्कू हे आता केळ्यासारखेच लोकप्रिय फळ असले तरी मुळात ते भारतातले फळ नाही. ते आहे दक्षिण अमेरिकेतले. अठराव्या एकोणिसाव्या शतकात इंग्रज किंवा पोर्तुगीज व्यापाऱ्यांमार्फत ते भारतात आले. आधी त्याची झाडे कलकत्त्याच्या आसपास होती. काही पारशी धनवंतांनी ती मुंबईत आणली.

मुंबई येथील सर दिनशा पेटीट यांच्या बागेत चिक्कूची झाडे होती. त्यातील दोन कलमे श्री. अर्देशीर इराणी ह्या गृहस्थांनी १९०१ साली घोलवड येथे आपल्या बागेत आणून लावली. किनारपट्टीची वालुकामय जमीन आणि उष्ण दमट हवामान हे चिक्कूसाठी अतिशय लाभदायक होते. त्यामुळे ही कलमे

वाढली आणि त्यांना वर्षभर फळे येऊ लागली. कलमांची पुनर्निर्मिती व्हावी म्हणून त्यांनी झाडावर गुटी कलम करण्याचे तंत्र विकसित केले. ह्या कामात त्यांना श्री. कावसजी पटेल ह्या पारशी गृहस्थांची साथ मिळाली. १९०१ ते १९२० ह्या काळात ह्या दोघांनी चिक्कूच्या बागा घोलवड-बोर्डी परिसरात वाढवल्या. त्यांचे उदाहरण बघून मग इतर पारशी-इराणी बागवाल्यांनीही मोठ्या प्रमाणावर चिक्कू लावायला सुरवात केली.

पारशी लोक इराणमधल्या इस्लामी छळाला कंटाळून भारतात आले ते ह्याच किनाऱ्यापाशी. मुळात ते इथून उत्तरेकडे काही अंतरावरच्या संजाण बंदरात उतरले पण घोलवड जवळच्या बारड नावाच्या डोंगरातल्या गुहेत त्यांचा पवित्र अग्नी ठेवलेला होता. ब्रिटिशांच्या काळात कंत्राटदारी, व्यापार, नोकरी आणि अधिकाराच्या जागा ह्यामुळे पारशी समाज भरभराटीला आला आणि त्याने किनारपट्टीवर मोठमोठ्या बागाही निर्माण केल्या. त्यांच्यानंतर जे लोक तिकडून आले त्यांना सामान्यपणे इराणी म्हटले जाते. ते मुख्यत: मुंबईतल्या कोपऱ्यावरच्या रेस्टॉरंटमुळे नावारूपाला आले तरी ते मुळात चांगले शेतकरी होते आणि त्यांनीही डहाणू-संजाण किनाऱ्यावर फळबागा म्हणजे 'वाड्या' तयार केल्या. अर्थात वाड्यासोबत हे लोक मोठ्या प्रमाणावर सावकारीही करत आणि ब्रिटिश काळात त्यांचा दारूचा धंदाही जोरात चालत असे. त्यांचा झोराष्ट्रीयन धर्म एरवी कितीही मानवतावादी असला तरी स्थानिक लोकांची, विशेषत: वारल्यांची त्यांनी अतोनात पिळवणूक केली. गोदावरी परूळेकर यांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' (१९९२) ह्या पुस्तकात किंवा आचार्य भिसे ह्यांच्या 'जंगलातील छाया' (१९७१) ह्या कादंबरीत आदिवासींच्या होत असलेल्या छळाचे हृदयद्रावक चित्रण आले आहे. आदिवासींना हिशोबात फसवणे, त्यांच्या जमिनी गिळंकृत करणे, त्यांच्याकडून रात्रंदिवस कष्ट करून घेणे, शारिरीक मारझोड करणे एवढेच नाही तर आदिवासी स्त्रियांवर वाईट नजर ठेवणे असे त्या अत्याचारांचे स्वरूप होते. अर्थात आदिवासींचे शोषण करण्याच्या बाबतीत स्थानिक शेठ, सावकार, जमीनदार आणि जंगल कंत्राटदारही मागे नव्हतेच.

घोलवड-डहाणू परिसरात चिक्कूच्या वाड्या उभ्या रहात असताना वारली समाज तिथे बहुतांशी शेतमजूर म्हणूनच कामाला होता. वारल्यांप्रमाणेच ह्या भागात जो वाडवळ म्हणजे सोमवंशी क्षत्रिय समाज होता तोही वाड्यांवर मजुरी करत असे. वाडवळ हे पारंपरिक शेतकरी असल्याने त्यांच्याकडे शेतजमिनी होत्याच पण त्यात भागत नसल्याने त्यांना शेतमजुरी करावी लागे. त्यांच्या आणि वारल्यांच्या परिस्थितीत फार अंतर नव्हते. एक गट आदिवासी समाजातला आणि दुसरा मुख्य प्रवाहातला एवढाच फरक. ब्रिटिश काळातल्या जमीन विषयक कायद्यांचा फटका दोघांनाही बसला होता. त्यामुळे मुळच्या स्थानिक शेतकरी असलेल्या ह्या लोकांवर जमीनदारांची शेती खंडाने करण्याची किंवा तेही नाही तर शेतमजुरी करण्याची पाळी आली होती. मात्र हे सर्वजण जातिवंत शेतकरी असल्याने भातशेतीचे, भाजीपाल्याचे किंवा चिक्कूच्या वाड्या करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे उपजतच होते.

पारशी-इराणी वाडीवाल्यांनी चिक्कू जरी मोठ्या प्रमाणावर लावला तरी अत्यंत धूर्तपणाने हे फळ आपल्यापुरतेच मर्यादित ठेवले. त्याचा प्रसार इतर

शेतकऱ्यांत होऊ दिला नाही. नवीन चिक्कू लावण्यासाठी जी कलमे लागत ती ते स्वत:च्या बागेत तयार करत. जुन्या आठवणी शाबूत असणारे लोक सांगतात की त्यांनी कधीही कोणालाही चिक्कूचे कलम दिले नाही. कलमांसाठी रोपवाटिका करण्याची तर बातच सोडा.

परंतु चिक्कूचे महत्व लक्षात घेऊन वाडवळ समाजातील काही हरहुन्नरी शेतकऱ्यांनी मात्र आपल्या शेतात चिक्कूची झाडे लावायला सुरवात केली. बोर्डी येथील सर्वश्री गोपाळराव नाना पाटील, चिंतामण नाना पाटील, मुकुंदराव सावे ह्या शेतकऱ्यांनी या बाबतीत पुढाकार घेतला. ह्या संबंधीचे तपशील प्रसिद्ध कृषीतज्ञ, डॉ. जयंतराव पाटील ह्यांच्या 'आदर्श गाव बोर्डी' या पुस्तकात पाहावयास मिळतात. (१९७८) त्यापूर्वी म्हणजे १९२० साली बोर्डी येथे गोखले एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमाने एक शाळा सुरू करण्यात आली होती. या शाळेची जबाबदारी सुरवातीपासूनच आचार्य शंकर रामचंद्र भिसे ह्या श्रेष्ठ समाजकार्यकर्त्याने स्वीकारली होती. त्यांच्या कार्यात बोर्डीचेच आत्मारामपंत सावे आणि कृष्णराव महादेव चित्रे हे दोन निष्ठावंत आणि तळमळीचे सहकारी सामील झाले. ह्या तिघांनी मिळून बोर्डीतल्या गांधीवादी, राष्ट्रीय जीवन शिक्षणाचा पाया घातला. या शाळेला एका पारशी बाईंनी मोठी देणगी दिली आणि शाळेचा विस्तार होऊन तिथे एक मोठे गुरूकुलच उभे राहिले. या कामातूनच आचार्य भिसे ह्यांनी पुढे आदिवासी सेवा मंडळाची स्थापना करून आदिवासी सेवेसाठी स्वत:ला आजन्म वाहून घेतले.

बोर्डीत शाळा सुरू झाल्याचा मुख्य परिणाम असा झाला की वाडवळ, मांगेले, कुणबी अशा बहुजन समाजातील मुले तिथे शिकू लागली आणि हे कार्य १९२० पासूनच सुरू झाले. शिक्षणाच्या प्रभावाने वाडवळ समाजात फार मोठी जागृती झाली आणि अनेक नामवंत माणसे ह्या समाजातून तयार झाली. बोर्डीच्या शाळेचा पुढचा टप्पा म्हणून कोसबाड येथे १९४९ साली कृषी-संस्थेची स्थापना करण्यात आली. कृषी विद्यालय हा संस्थेच्या कामाचा एक महत्वाचा भाग होता. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणे आणि शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे बियाणे, कलमे आणि अद्ययावत तंत्रज्ञान पुरवणे हा या संस्थेचा उद्देश होता. सुरवातीची काही वर्षे मुंबई शासन ही संस्था चालवत असे पण १९५५ साली एका खास ठरावाने ही संस्था सर्व मालमत्तेसहित गोखले एज्युकेशन सोसायटीकडे सुपूर्द करण्यात आली. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रा. टी. ए. कुलकर्णी व आचार्य भिसे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. हरिश्चंद्र पाटील ( जे पुढे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू झाले) आणि डॉ. जयंतराव पाटील (जे पुढे केंद्रिय नियोजन मंडळाचे सदस्य झाले) ह्या दोघा कृषीशास्त्रज्ञांनी ही संस्था नावारूपाला आणली. (ह्या कार्याची तपशीलवार माहिती डॉ. जयंतराव पाटील ह्यांच्या 'माझे ग्रामपुनर्रचनेचे प्रयोग' ह्या पुस्तकातून मिळू शकेल (१९९२)).

चिक्कूचे पीक जर ठराविक वाडीवाल्यांच्या मक्तेदारीतून मोकळे करायचे असेल तर आपण त्याची कलमे तयार करून सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिली पाहिजेत हे ह्या दोघा संशोधकांनी बरोबर ओळखले. आणि म्हणून संस्था सुरू होताच चिक्कूची रोपवाटिका म्हणजे नर्सरी तयार करून चिक्कूचा प्रसार करण्यास सुरवात केली. शिक्षणाच्या प्रभावाने जागृत झालेल्या वाडवळ समाजातील शेतकऱ्यांनी ह्या कामात पुढाकार

घेतला आणि मोठ्या प्रमाणावर चिक्कूच्या बागा तयार केल्या.

आदिवासी समाजाची उन्नती हेही कोसबाडच्या संस्थेचे उद्दिष्ट असल्याने ह्या पुढची पायरी ही आदिवासी शेतकऱ्यांमध्ये चिक्कूचा प्रसार करण्याची होती. मात्र वाडवळ शेतकऱ्यांनी ज्या उत्साहाने चिक्कू स्वीकारला तसा आदिवासी, म्हणजे मुख्यत: वारली, शेतकऱ्यांनी स्वीकारला नाही. 'हे पारशाचे फळ आम्हाला नको' असं ते म्हणत. ते सगळेजण पारशांच्या वाड्यांवर कामाला जात असले तरी चिक्कू हे त्यांना पारशी-इराणी जमीनदारीचे प्रतीक वाटे आणि त्या जमीनदारीबद्दल त्यांच्या मनात इतका राग होता की ते फळ आपण लावू नये अशी त्यांची भावना होती.

अनेक वर्षे चिकाटीने पाठपुरावा केल्यानंतर काही आदिवासी शेतकरी चिक्कू लावायला तयार झाले. ह्यामध्ये सुरवातीस उल्लेख केलेल्या श्री. शिवाजी भिमरा ह्यांचे वडील कुरसन नवश्या भिमरा, शंकर वशा धोडी, भिकू चमार दुबळा ह्या आदिवासींचा समावेश होता. मात्र हे शेतकरी तयार झाले तरी मुख्य अडचण पाण्याची होती. कारण चिक्कूला पाणी लागते. तेव्हा १९५७ साली शासनाच्या समाज कल्याण विभागातर्फे अनुदान मिळवून १० विहिरी खोदण्याचा प्रकल्प राबवण्यात आला. अर्थात विहिरी झाल्यावर लगेच कलमे लावली असे झाले नाही. विहिरीचा उपयोग सुरवातीची काही वर्षे भाजीपाला काढण्याकरताच झाला. ह्या भाजीपाल्यापासून थोडेसे आर्थिक स्थैर्य आले तेव्हा कलमांचा विचार करण्यात आला आणि हळूहळू आदिवासी समाजात चिक्कू मूळ धरायला लागला.

या सर्व कामामागची प्रेरक शक्ती डॉ. जयंत पाटील ह्यांची होती.. त्यांच्या नेतृत्वाखालीच कोसबाड येथे १९७६ साली स्वयंसेवी क्षेत्रातले पहिले कृषी विज्ञान केंद्र स्थापन झाले आणि कृषी विस्ताराच्या कामाला वेग आला. मात्र १९८३ साली काही अंतर्गत मतभेद झाल्यामुळे त्यांना कोसबाडची संस्था सोडावी लागली आणि मग त्यांनी बोर्डी येथेच 'कृषी-उद्योग आणि आदिवासी कल्याण प्रतिष्ठान' ह्या संस्थेच्या कामाला वाहून घेतले. ही संस्था त्यांनी १९७४ साली स्थापन केली होती. ह्या संस्थेला वनखात्याकडून काही जमीन लीजने मिळाली आणि तिथे पाण्याची सोय करून कृषी विस्तार आणि विकासाचे काम त्यांनी नव्या जोमाने सुरू केले. चिक्कू हेच डहाणू भागातल्या आदिवासींना वरदान आहे ह्याची खूणगाठ बांधून त्यांनी पुन्हा रोपवाटिका उभी केली आणि शिवाजी भिमरा, विलास सावे, हरी सावे, सुशीला कोम अशा कार्यकर्त्यांचा संच जमवून फळबागा निर्मितीच्या कार्याला वाहून घेतले.

१९९० च्या सुमारास ड्रीलींग मशीनद्वारे बोअरवेल करण्याचे तंत्र चांगले लोकप्रिय झाले आणि ठिकठिकाणी खाजगी कंत्राटदारांनी ही सेवा देण्यास सुरवात केल्याने शेतकऱ्यांची सोयही झाली. वाढत्या स्पर्धेमुळे कूपनलीका खणण्याचा खर्चही कमी झाला. त्यामुळे पारंपारिक, उघडी विहीर खोदण्याची जी अडचण होती ती दूर झाली व आदिवासी शेतकरीही आपल्या शेतात पाण्याचे साधन तयार करून घेऊ शकला. प्रतिष्ठानच्या कार्याला त्यामुळे चालना मिळाली. १९९२-९३ पासून आजपर्यंत प्रतिष्ठानने सुमारे १५,००० च्या आसपास कलमे केवळ आदिवासींमधे वितरीत केली आणि २५० हून अधिक शेतकऱ्यांच्या फळबागा उभ्या राहिल्या.

- ३ -

फळबागांच्या माध्यमातून आदिवासींची ही जी प्रगती झाली आहे ती एकांगी नाही. तिला अनेक पदर आहेत. प्रगतीचा परिणाम हा अनेक रूपांनी दृष्टीस पडतो.

सर्वात प्रथम आणि सर्वात महत्वाचा परिणाम अर्थातच उत्पन्नातील वाढ हा आहे. चिक्कूचे झाड लावल्यापासून साधारण चार-पाच वर्षातच फळे धरायला लागते. सहाव्या वर्षी सुमारे ५० किलोपर्यंत उत्पादन एका झाडापासून मिळते. हे उत्पादन विक्रीसाठी उपयोगात आणता आले तरी तो झाडाचा खरा बहार मानत नाहीत. त्यानंतर झाडाची वाढ जशी व्हायला लागते तसे उत्पादन वाढायला लागते. पण खऱ्या अर्थाने व्यापारी उत्पादन १२ वर्षानंतर सुरू होते. पंधराव्या वर्षी साधारण ५०० किलो इतकी फळे चिक्कूला लागतात. त्यानंतर माती, पाणी, खत, मशागत ह्यांचे प्रमाण कसे आहे त्यावर उत्पादन वाढते. मात्र नंतर उत्पादनाची वाढ थांबून ते एका स्थिर पातळीत येते. त्यानंतर चिक्कूच्या गुणवत्तेत वाढ होते. झाड जितके जुने तितके त्याचे फळ गोड, रूचकर आणि घसघशीत असते. सर्वसाधारणपणे चिक्कूचे अर्थशास्त्र मांडताना झाडामागे ५०० किलोचा हिशोब धरला जातो. मात्र वीस-पंचवीस वर्षाची झाडे सहजगत्या ७००-८०० किलोचे उत्पादन देतात. उत्तमातले उत्तम झाड वार्षिक १५०० किलोपर्यंत उत्पन्न देते. सर्वोच्च उत्पादनाची नोंद २००० किलोपर्यंत आहे.

चिक्कूच्या भावात चढ-उतार चालू असतातच. हिवाळ्यात म्हणजे डिसेंबर-जानेवारी महिन्यात चिक्कू उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्यावेळी भाव कमीत कमी असतात तर उन्हाळ्यात ते सर्वात जास्त असतात. चिक्कूचा भाव हा प्रामुख्याने त्याच्या आकारावरून ठरतो. चांगला पोसलेला चिक्कू हा सफरचंदाइतका मोठा होऊ शकतो. त्याचे वजन सहज ७५ ग्रॅम पर्यंतही जाते. चिक्कूमध्ये आकारामधली तफावत फार मोठ्या प्रमाणावर असते. चिक्कू कच्चा असतानाच झाडावरून काढतात आणि बांबूच्या करंड्यात भरून बाजारात पाठवतात. एका करंडीत सर्वात मोठ्या आकाराचा चिक्कू साधारण ६ डझन बसतो तर त्याच करंडीत लहान चिक्कू १५ डझनापर्यंत बसतात. लहान चिक्कूला अर्थात भावही कमी असतो. मोठ्या, चांगल्या चिक्कूची ६ डझनाची करंडी २००-२५० रूपयांनाही जाते तर लहान चिक्कूच्या १५ डझनाच्या करंडीला ३५-४० रूपये इतकाही कमी भाव मिळतो. ही पाहणी चालू असताना १२ ते १५ डझन करंडीचा भाव साधारण ४० रुपये इतका होता.

भावातली चढउतार जमेस धरून चिक्कूस सर्वसाधारणपणे किलोमागे ५ रुपये इतका भाव पडतो असे समजले जाते. (हा अर्थातच खालचा अंदाज आहे.) ह्या हिशेबाने ५०० किलो फळ देणारे झाड वर्षाला रुपये २,५०० इतके उत्पन्न देते. चिक्कूची कलमे ३० फूट x ३० फूट ह्या अंतरात लावली जातात, म्हणजे एकरी ४० झाडे. जर एक एकराची बाग असेल तर तिचे वार्षिक उत्पन्न सरळपणे १,००,००० रुपये इतके असते. पाणी, खते, मशागत, मजुरी इत्यादी खर्च हा त्याच्या निम्मा येतो असे समजतात. त्याप्रमाणे निव्वळ उत्पन्न वा नफा रूपये ५०,००० इतका असतो.

चिक्कूचे अर्थशास्त्र असे असल्याने साधारण १०० कलमे लावणारा शेतकरी सहजगत्या लाखाच्यावर नफा कसा मिळवतो ते लक्षात येईल. भात शेतीमधून इतके

उत्पन्न कदापिही मिळू शकत नाही. ह्या भागातली भाताची उत्पादकता, सुधारित जाती व रासायनिक खते वापरूनही, एकरी ७ ते ८ क्विंटलच्या आसपास आहे. भाजीपाला वा इतर नगदी पिके कदाचित ह्या बरोबरीने येतील पण त्यांच्या भावांतील चढउतार फार तीव्र असते आणि जोखीम तर कैक पटीने जास्त असते.

निव्वळ उत्पन्नासोबतचा दुसरा चांगला परिणाम वाढत्या रोजगाराचा आहे. चिक्कूचे पीक द्राक्षासारखेच मजूर-प्रधान आहे. चिक्कूचा हंगाम पावसाळा सोडला तर जवळजवळ वर्षभर असतो. त्यामुळे चिक्कू झाडावरून उतरावयाला वर्षभर सातत्याने मजूर लागतात. शिवाय मशागतीची, पाणी देण्याची कामे असतात ती वेगळीच. एक एकर चिक्कूतून वर्षाला साधारण १८०० मनुष्य - दिवस रोजगार मिळू शकतो. हे काम करण्यासाठी विशेष प्रशिक्षण लागत नसल्याने त्यामध्ये कुणालाही मजुरी मिळू शकते. मोठ्या प्रमाणावर स्त्रिया हे काम करतात. चिक्कूवर रासायनिक कीटकनाशके फार कमी प्रमाणावर फवारली जातात. त्यामुळे हे काम सुरक्षित असते. झाडावरून पडण्याच्या घटना घडत असतात पण बराचसा चिक्कू आकडीने काढला जातो. तेवढे सोडले तर त्यात शारिरीक जोखीम वा व्यावसायिक धोका नसतो. रेतीबंदरावर, इमारतींच्या बांधकामात किंवा मासेमारीसाठी समुद्रात गेल्यावर जसे उघड्यावर ऊन, पाऊस, थंडी, वाऱ्याचा सामना करावा लागतो तसे इथे होत नाही. त्या तुलनेत हे कमी कष्टाचे काम आहे. चिक्कूच्या बागांमुळे डहाणू-पालघरच्या किनारपट्टीच्या भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार-निर्मिती झाली आहे. त्यामुळे हंगामी स्थलांतर कमी झालेच पण दुर्भिक्ष्य महागाई, बेकारी ह्या सारख्या समस्यांची तीव्रताही कमी झाली. आता ह्या किनारपट्टीच्या भागात मजुरांचा तुटवडा जाणवतो म्हणून डोंगरपट्टी कडच्या तलासरी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर वारली मजूर बागांमध्ये येऊ लागले आहेत.

चिक्कूच्या पिकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते तयार होत असताना त्यात मोठ्या प्रमाणावर आंतर-पिके घेता येतात. झाडे लहान असताना भातशेती तर करता येतेच पण सर्व प्रकारचा भाजीपालाही करता येतो. अल्पभूधारक, आदिवासी शेतकऱ्यांमध्ये चिक्कू लोकप्रिय होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. चिक्कूसाठी जी जमीन तयार केली जाते व पाण्याची सोय केली जाते त्याचा फायदा घेऊन ही तऱ्हेतऱ्हेची आंतरपिके काढता येतात. भाजीपाल्याच्या भावात चढउतार असला तरी एका भाजीतले नुकसान दुसऱ्यात भरून काढता येते. मुख्य म्हणजे मशागतीशिवाय वेगळे काही करावे लागत नाही. घरात खाण्यासाठी जो भात लागतो तो सहजगत्या काढता येतो. किंबहूना खात्रीच्या पाण्याची सोय असल्याने ह्या पिकाची उत्पादकताही वाढते. ज्यांना भाजीपाला करायचा नसतो असे शेतकरी त्यात गहू, हरभरा, तीळ, कांदा अशी पिकेही काढतात. आधी ज्या गणपत पागीर ह्यांचा उल्लेख केला त्यांनी तर चिक्कूच्या पिकात पहिल्या वर्षी केळ्याचे पीक घेतले आणि एक हंगाम चांगले उत्पन्न घेऊन ती केळी कापून टाकली. इतर शेतकरी वांगी, टोमॅटो, मिरची, गवार, घेवडा, पडवळ, कारली, कोथिंबीर अशा भाज्यांचे सातत्याने उत्पादन घेतात. बहुतेक शेतकऱ्यांच्या बायकाच हा भाजीपाला डोक्यावर घेऊन विकायास जातात त्यामुळे रोजच्या रोज रोकडही त्यांच्या हातात पडते. काही हुशार शेतकऱ्यांनी आता निशीगंधासारखी

फुलेही लावायला सुरवात केली आहे. एक एकर क्षेत्रात केलेल्या भाजीपाल्याचे सरासरी वार्षिक उत्पन्न २० ते २५,००० रूपयांच्या घरात असते. उदरनिर्वाहाच्या, अन्न आणि रोख पैसा, ह्या दोन मुख्य गरजा आहेत. भातशेती अबाधित राहिल्याने आणि भाजीपाल्यापासून रोख पैसा मिळाल्याने, चिक्कू उत्पादनातून उदरनिर्वाहाच्या प्रक्रियेत खंड पडत नाही.

कोसबाडच्या कृषी संस्थेत केलेल्या कार्याचा अभ्यास प्रा. स. ह. देशपांडे प्रा. शरद कुलकर्णी आणि प्रा. (कै.) वसंत देशपांडे ह्या तिघा ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञांनी केली आहे (१९७८). ह्या अभ्यासात अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्याला काही भवितव्य आहे का असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. आणि शेतीपेक्षा खात्रीच्या रोजगारातून अशा शेतकऱ्यांची उन्नती होऊ शकेल असे म्हटले आहे. देशपांडे प्रभृतींच्या प्रश्नाला चिक्कू फळबागांच्या माध्यमातून काही प्रमाणात उत्तर मिळते. छोट्या शेतकऱ्यांची शेती आतबट्ट्याची असते आणि म्हणून त्यांना ती परवडत नाही ही वस्तुस्थिती आहे. पण तसे का होते ? कारण नुसतीच जिरायती भुसार पिके घेतली तर त्या शेतीतून पुरेसे उत्पादन मिळत नाही. मात्र त्या शेतीत पाण्याचे साधन निर्माण केले आणि भाजीपाला, फळबागा आणि जास्त उत्पादन देणारी पिके वर्षभर घेतली तर ती शेतीसुद्धा फायदेशीर ठरते हे ह्या उदाहरणांवरून स्पष्ट होईल. लेखाच्या सुरवातीस वर्णन केलेली सर्व उदाहरणे लहान शेतकऱ्यांचीच आहेत. त्यांचा पोटाचा प्रश्न तर सुटला आहेच पण आर्थिक उन्नतीही झालेली आहे.

भाजीपाल्याचा, जोडउत्पन्नाखेरीजचा फायदा म्हणजे या सर्व कुटुंबांचा आहार लक्षणीयरित्या सुधारला आहे. पूर्वी आदिवासींच्या आहारात भाज्यांचा समावेश जवळजवळ नसेच किंवा असला तर रानात सहज मिळणाऱ्या ठराविक हंगामी भाज्या ते वापरत. आता शहरातल्या मध्यमवर्गीय लोकांना महाग वाटतील अशा भाज्या सहजगत्या त्यांच्या रोजच्या जेवणात असतात. त्यामुळे ह्या सर्वांचे आरोग्य लक्षणीयरित्या सुधारले आहे. प्रत्येकाच्या रक्तात पूर्वी हिमोग्लोबीनचे प्रमाण किती होते आणि आता किती आहे अशा प्रकारची तपासणी करून ह्या संदर्भात नक्की निष्कर्ष काढता येतील. पण या वस्त्यांवरून फिरताना टवटवीत चेहेरे आणि बांधेसुद शरीरे पाहिली की आरोग्याची कल्पना येते. ज्यांच्याकडे अशा वाड्या नाहीत त्या आदिवासींनाही ह्या भाजी उत्पादनाचा फायदा झाला आहे. जी वांगी बोर्डी वा घोलवडमध्ये १० ते १२ रुपये किलोने विकली जात होती तीच आतल्या आदिवासी पाड्यावरच्या दुकानात ४ ते ५ रुपये किलोने मिळत होती.

चिक्कूचा दुसरा मोठा फायदा असा की ह्या पिकाने कुपोषण व उपासमार एकदम कमी झाली आहे. चिक्कू हे नगदी पीक असले तरी तो एक पौष्टिक खाद्यपदार्थही आहे. त्यात ग्लुकोजचे प्रमाण जास्त असल्याने दोन-चार चिक्कू खाल्ले तरी माणसाची भूक भागते. त्यामुळे जे लोक वाड्यांवर मजुरीला जातात त्यांना अन्नाची वा भुकेची चिंता नसते. अर्थात ह्या भागात चिक्कू इतक्या प्रमाणावर होतो की ज्यांच्याकडे चिक्कूची झाडे नाहीत त्यांनाही चिक्कूचे अप्रूप नसते. पण चिक्कू हा चटकन् खाण्याचा जिन्नस असल्याने तो कुणालाही उपाशी राहू देत नाही. कोसबाड येथेच बालशिक्षणाचे काम करणाऱ्या थोर समाजसेविका ताराबाई मोडक ह्यांना महात्मा गांधींनी असे सांगितले होते की शिक्षणाचे काम

करण्याआधी आदिवासींना खाता येईल अशी वस्तू निर्माण करा. चिक्कू ही अशी वस्तू आहे . कोसबाडच्या कृषी-केंद्राने आणि नंतर बोर्डीच्या प्रतिष्ठानने चिक्कूच्या बरोबरीने शेवगा, पपई, सोयाबीन, वाल, सिताफळ, दुधी व तांबडा भोपळा आणि नारळ ह्या पिकांचा प्रसार ह्या भागात केल्याने ज्यांच्याकडे जमीन नाही असे आदिवासीही आपल्या परसात ही झाडे लावू शकतात. त्यामुळे उत्पन्न तर मिळतेच पण मुख्य म्हणजे उपासमार थांबते.

ह्याशिवाय इतरही अनुषंगिक परिणाम आहेतच. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांकडून समजले की आदिवासी शेतकरी खात्रीचे पाणी उपलब्ध झाल्याने आता भाताच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती लावतात. म्हणजे तायचूंग नेटीव्ह-१, जया, रत्ना, पालघर, कर्जत इत्यादी. त्यामुळे त्यांचे भाताचे उत्पन्न दुपटी-**तिप्पटीने** वाढले आहे. पूर्वी जी अन्नाची भ्रांत असायची ती निदान ह्या शेतकऱ्यांना तरी राहिलेली नाही स्वत:ची कूपनलिका असण्याचा दुसरा फायदा म्हणजे पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी ह्या कुटुंबांना मिळू लागले आहे. त्यामुळे पाण्याद्वारे फैलावणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव पुष्कळच कमी झाला आहे. अस्वच्छ व दूषित पाण्यामुळेच आदिवासी समूहांचे आरोग्य धोक्यात येत असते. घराजवळच पाणी उपलब्ध झाल्याने स्त्रियांचाही पाणी वाहून आणण्याचा त्रास वाचला आहे. ज्यांच्याजवळ गाय, बैल इत्यादी जनावरे आहेत त्यांनाही सकस-हिरवा चारा मिळायला लागला आहे. चिक्कू व भाजीपाल्याची वाहतूक करण्यासाठी बोर्डी परीसरातच निदान ३०-३५ आदिवासी तरूणांनी लहान टेम्पो खरेदी केले आहेत.

चिक्कूच्या बागांमुळे जी रोजगार निर्मिती झाली आहे तिचा एक वैशिष्टयपूर्व पैलू म्हणजे त्यात स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. सध्याच्या काळात फारच थोडे उद्योग वा व्यवसाय असे असतात की ज्यामध्ये स्त्रियांना सहजगत्या रोजगार मिळतो. आजचे बहुतेक उद्योग हे भांडवलप्रधान, यंत्राधारित आणि पुरूष श्रमाला प्राधान्य देणारे असतात. ह्याला शेतीही अपवाद नाही. आणि स्त्रियांना वाटा जरी मिळाला तरी त्यांचे श्रम हे उत्पादक प्रक्रियेत ढोर-मेहनत करण्यासाठीच वापरले जातात. जिथे पैशाची खरी उलाढाल होते त्या बाजारपेठेत किंवा विक्री व्यवस्थेत स्त्रियांना स्थान नसते. इथे मात्र उलटे आहे.

चिक्कू आणि भाजीपाल्याची विक्री ह्या माध्यमातून आदिवासी स्त्रियांचा बाजारपेठेत प्रवेश झाला आहे. ह्या स्त्रिया घरचा भाजीपाला सरळ डोक्यावर नेऊन विकतात. त्याचा एक चांगला फायदा म्हणजे विक्रीतून आलेले पैसे थेट त्यांच्याच हातात येतात. आणि ही विक्री फक्त स्थानिक गावातच होते असे नाही. बऱ्याच बायका विरार, वसई, बोरीवली, उंबरगाव अशा दूरच्या बाजारांमध्येही जातात. ज्यांच्याजवळ स्वत:ची जमीन नाही अशा स्त्रियांनीही चिक्कू विक्रीची वेगळी पध्दत शोधून काढली आहे. ह्या स्त्रिया बागांमधून खाली पडलेला चिक्कू वेचतात आणि रेल्वेने जाऊन विरार, बोरीवली अशा गजबजलेल्या ठिकाणी विकतात. चिक्कू वेचण्याचे काम आदल्या दिवशी संध्याकाळी होते पण बहुतेकवेळा ते पहाटे लवकर उठून, रॉकेलच्या, दिवटीच्या किंवा बॅटरीच्या प्रकाशात केले जाते.

चिक्कू पिकून तयार झाला की झाडावरून खाली पडतो. बागांच्या मालकांना त्याचा उपयोग नसतो कारण तो बाजारपेठेत पाठवता येत नाही. त्यामुळे असे चिक्कू

ते कमी भावात ह्या स्त्रियांना देतात (साधारण दोन ते ते तीन रुपये डझन ह्या भावाने). पडलेले चिक्कू अनायासे वेचले जातात ते वेगळेच.

हा अभ्यास करताना, घोलवड स्टेशनवर पाहिले तेव्हा सकाळी साडेआठ वाजताच्या मुंबईकडे जाणाऱ्या सुरत शटलवर साधारण पन्नासेक स्त्रिया चिक्कूच्या पाट्या घेऊन गाडीत चढल्या. त्यापूर्वी त्यांच्याशी बोलणे केले तेव्हा लक्षात आले की ह्या स्त्रिया वारली आणि दुबळा समाजांपैकी होत्या आणि अशा तऱ्हेने चिक्कू विकणे हा त्यांचा रोजचा व्यवसाय होता. एका पाटीत साधारणपणे तीस डझन चिक्कू होते आणि बहुतेकींनी पहाटे चार वाजता उठून ते गोळा केले होते. स्टेशनवर बसूनच त्यातले खराब चिक्कू वेगळे काढून प्रतवारी करणे चालले होते. काहीजणी इतक्या लवकर उठलेल्या होत्या की त्यांना वेणीफेणी करायलाही वेळ मिळाला नव्हता. गाडी येण्याअगोदर ते सोपस्कार उरकणे चालले होते. काहीजणी फडक्याने चिक्कू स्वच्छ पुसून त्यावरचा चीक वगैरे काढून टाकत होत्या. ह्या बहुतेक स्त्रिया विरार स्टेशनला उतरणार होत्या आणि स्टेशनबाहेर बसून चिक्कू विकणार होत्या. आपण गाडीत चिक्कू विकत नाही असे त्या म्हणाल्या कारण त्यासाठी रेल्वे पोलीस आणि तिकीट तपासनीसांना हप्ता द्यावा लागतो. स्टेशनबाहेर, साधारण सहा-सहा चिकूंचे वाटे करून ते चार ते सहा रूपयांना त्या विकत होत्या. तीस डझनांच्या पाटीमागे त्यांना साधारण १०० ते १२५ रुपये दिवसाला मिळत असावेत असे दिसले. दुपारी दोन वाजताच्या गाडीने आपण परत येतो असे त्यांनी सांगितले.

ह्या बायका केवळ चिक्कूच विकत होत्या असे नाही. चिक्कूचा हंगाम कमी झाल्यावर केळी, शेवग्याच्या शेंगा, पेरू, लिंबे, कैऱ्या, आंबे, जांभळे, कढीपत्ता, नारळ अशा वस्तूही त्या विकतात. मे महिन्यातले काही दिवस डहाणू भागात 'लिची' ह्या फळाचा हंगाम असतो. तेव्हा अशाच खाली पडलेल्या 'लिची' त्या विकतात. सकाळच्या सहा वाजण्याच्या पहिल्या गाडीला तर ह्या पेक्षाही जास्त बायका चढतात असे त्यांच्याकडून समजले. त्या केवळ मुंबईच्या दिशेने जात होत्या असे नाही तर गुजरात बाजूला उंबरगाव, वापी, बलसाड ह्या स्टेशनापर्यंतही जात होत्या. केवळ घोलवड स्टेशनवरून दिवसभरात २५० ते ३०० स्त्रिया अशा तऱ्हेचा व्यवसाय करतात. डहाणू स्टेशनवर तर त्याहून अधिक.

ह्या स्त्रिया जी विक्री करतात तो नुसताच फुटकळ व्यापार नाही तर ती एक समांतर अशी अर्थव्यवस्था आहे. प्रस्थापित बाजारपेठा ह्या सगळ्या पुरूषांच्या ताब्यात आहेत. तिथे म्हणजे वाशी, दादर, भायखळा इत्यादी 'मार्केट यार्ड' मध्ये दलाल, व्यापारी, अडते, घेवारी आणि त्यांना माल पाठवणारे बागवान हे सगळे पुरूष असतात. त्यामुळे त्या मुख्य व्यवस्थेची उलाढाल आणि पैसा पुरूषांच्या हातात राहतो. त्या अर्थव्यवस्थेच्या तोडीस तोड अशी ही व्यवस्था ह्या स्त्रियांनी निर्माण केली आहे. ह्या बाजारपेठेचे वैशिष्ट्य म्हणजे तयार, पिकलेला माल थेट ग्राहकांच्या हातात पडतो. त्यात मध्यस्थ कुणी नाही. मार्केट यार्डमध्ये जाणारा चिक्कू कच्चा असतो व तो तिसऱ्या-चौथ्या दिवशी ग्राहकांपर्यंत पाहोचतो. जो माल एरवी वाया जाणार तो सगळा ह्या स्त्रियांच्या कष्टाने आणि कर्तबगारीने सत्कारणी लागतो. एवढेच नाही तर त्याला किंमत येऊन मूल्यवृद्धीही होते (व्हॅल्यू ॲडीशन) केवळ एवढे करूनच त्या थांबत नाहीत तर त्या त्या हंगामात

त्या वेगवेगळ्या वस्तूंकरता बाजारपेठ निर्माण करतात. ग्राहक आणि उत्पादक ह्यांना त्या जोडतातच पण ग्राहकाला काय पाहिजे तेही उत्पादकापर्यंत पोहोचवतात. लग्नसराईचे दिवस आले आणि अमूक एक भाजी मिळत नसली की जेवणाचे कंत्राटदार ह्या स्त्रियांशीच संपर्क करून ती भाजी थेट बागांमधून मिळवतात.

अशा तऱ्हेचा व्यापार करण्यासाठी अपार कष्ट करण्याची तयारी तर लागतेच पण अंगात धाडसही लागते. तीस डझनाची पाटी डोक्यावर उचलून, गाड्यातून ने-आण करणे ही सोपी गोष्ट नाही. रस्त्यावर बसून विक्री करायला हिम्मत तर लागतेच पण पैशाचा व्यवहार हाताळण्याचे कौशल्यही लागते. सतराशे साठ प्रकारच्या 'गिऱ्हाइकांशी' सामना करावा लागतो ते वेगळेच. ह्या सगळ्या प्रक्रियेतून ह्या स्त्रिया खऱ्या अर्थाने सक्षम आणि सबल होत जातात. आणि हा परिणाम त्यांचा त्याच घडवतात. त्यासाठी कोणी 'प्रशिक्षण वर्ग वा शिबिरे' आयोजित केलेली नाहीत. देवीची जी अनेक नावे वा रूपे आहेत त्यातले एक 'शाकंबरी' असे आहे. भाजीपाल्याचे उत्पादन आणि व्यापार करणाऱ्या ह्या स्त्रिया पहिल्या की त्या रूपाची सहज आठवण होते.

चिक्कूच्या ह्या अर्थव्यवस्थेत काही पूरक रोजगारही तयार झाले आहेत. त्यातला एक आहे बांबूपासून टोपल्या तयार करण्याचा. चिक्कू पाठवण्यासाठी साधारण बादली एवढ्या पण थोड्याशा पसरट अशा बांबूच्या करंड्या लागतात. त्या बनवण्याचा उद्योग बोर्डी आणि त्या शेजारच्या (पण गुजरात राज्यामधल्या) देहरी ह्या गावात मोठ्या प्रमाणावर चालतो. ह्या उद्योगात तिथला माह्यावंशी समाज गुंतलेला आहे. हा गुजराती भाषिक समाज आहे. पूर्वी त्यांना धेड म्हणून ओळखले जायचे आणि अस्पृश्य म्हणून वागवले जायचे. ते अर्थात भूमीहीन आहेत आणि बुरूडकाम करून पोट भरतात. वस्त्या अजूनही गावाबाहेर आहेत. मात्र शिक्षणाच्या प्रसाराने ह्या समाजात चांगली जागृती झाली आहे. बोर्डी गावात ह्या समाजाची साधारण १०० घरे आहेत. बहुतेक घरातली पुरूषमाणसे नोकरीच्या वा कामधंद्याच्या निमित्ताने मुंबई, वापी, बलसाड इत्यादी ठिकाणी जातात. बांबूपासून करंड्या बनवण्याचा उद्योग घरी असलेल्या बायका करतात. ह्या वस्तीत गेलं की प्रत्येक घरासमोर बायका व मुली हातात लहानसा कोयता घेऊन बांबू साळत बसलेल्या दिसतात. असेच दृश्य शेजारच्या देहरी गावात दिसते.

करंड्या बनवण्यासाठी जो बांबू लागतो तो मुख्यतः दक्षिण कोकणातून म्हणजे सावंतवाडी, चिपळूण, कुडाळ इथून व गोवा, कारवार ह्या ठिकाणाहून येतो. वाहतूक खर्च धरून बोर्डीमधल्या व्यापाऱ्यांना मध्यमप्रतीचा बांबू २१ / २२ रुपयांना पडतो. बायकांना तो २५ रूपयांना मिळतो. हा बांबू 'मानवेल' जातीचा असतो आणि चांगल्या, मोठ्या बांबूची किंमत ४० रुपयापर्यंतही जाते. एका मोठ्या बांबूतून १२ ते १५ करंड्या होऊ शकतात. एका करंडीची किंमत ६ रुपये आहे. म्हणजे दिवसभरात जर १५ करंड्या केल्या तर त्या बाईला ५० रुपये सुटू शकतात. ही पाहणी करत असताना चिक्कूचा हंगाम ऐन भरात होता. त्यावेळी बोर्डी गावातून दिवसा सुमारे ८०० ते १००० करंड्या जातात असे समजले. एरवी ह्या बायका भातासाठी कणग्या, कोंबड्यांसाठी डालग्या, आंब्यासाठी टोपल्या, भाजीपाल्याच्या करंड्या, सुपे असल्या वस्तूही बनवतात.

शेजारच्या देहरी गावात माह्यावंशी समाज जास्त आहे. तिथे असा गृहोद्योग चालतोच पण काही व्यापाऱ्यांनी कारखान्यांसारखे व्यवसायही चालवले आहेत. तिथे मजुरी देऊन टोपल्या बनवल्या जातात. काम अंगावरचे असते. एका टोपलीमागे दोन रुपये मजुरी मिळते. दिवसभर काम करणाऱ्या बायका साधारणपणे ३० टोपल्या तयार करतात. हंगामात एकट्या देहरी गावातून २,५०० ते ३,००० टोपली दिवसाकाठी जाते असे समजले.

व्यापक अंदाज घेतला तर करंड्या बनवण्याच्या जोडधंद्यातून कितीतरी उत्पन्न मिळते असे लक्षात येईल. बोर्डी-डहाणू भागातून हंगामात रोजचा ५० ट्रक चिक्कू बाहेर जातो. वर्षाकाठी ही जावक सुमारे ६००० ट्रक इतकी असते. एका ट्रकमध्ये १५०० करंड्या मावतात. म्हणजे वर्षाला नव्वद लाख करंड्या लागतात किंवा पैशाच्या भाषेत साडेपाच कोटी रुपयांची उलाढाल केवळ करंड्यांमधून होते आणि तिचा मुख्य हिस्सा हा माह्यावंशी समाजाकडे येतो.

असाच फायदा, चिक्कूची कलमे ज्या लहान कुंड्यातून लावली जातात, त्या कुंड्या बनवणाऱ्या कुंभार समाजाला होतो. डहाणू परिसरात नोंदणीकृत अशा ३६ रोपवाटिका आहेत. ह्या नर्सरीमधून काही लाख कलमे दरवर्षी तयार होतात. आता काही प्रमाणात प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरल्या जात असल्या तरी पारंपारिक कलम हे कुंडीतच लावले जाते. त्यामुळे बोर्डी व आसपासच्या कुंभार समाजाचा पारंपारिक रोजगार शाबूत राहिला. एवढेच नाही तर त्याला कायमस्वरूपी, खात्रीची बाजारपेठही मिळाली.

चिक्कूच्या अर्थव्यवस्थेचा प्रसार केवळ चिक्कूचे फळ विकण्यापुरता मर्यादित नाही. कारण फळ म्हणून चिक्कू कितीही खपत असला तरी वर्षात काही दिवस असे येतात की चिक्कूचे पीक अमाप येते आणि मालाला तेवढा उठाव येत नाही. त्यामुळे चिक्कूवर प्रक्रिया करून त्याचे टिकाऊ पदार्थ तयार केले पाहिजेत असा विचार काही हुशार वाडीवाल्यांच्या मनात आला नसता तरच नवल. भाजीपाल्याप्रमाणेच ह्याही बाबतीत बोर्डी मधल्या स्त्रियांनीच पुढाकार घेतला. सोमवंशी क्षत्रिय समाजाने चिक्कू व भाजीपाला उत्पादनात जी मोठी आघाडी घेतली त्याचे एक कारण असे होते की ह्या कुटुंबातील गुणी व कष्टाळू स्त्रियांनी त्यात फार मोठा वाटा उचलला. त्यांनी केवळ घरच्या बागांमध्येच मेहनत केली असे नाही तर डोक्यावर भाजीपाल्याच्या करंड्या नेऊन बाजारात स्वत: भाजी विकली. त्यामुळे ज्यादा प्रमाणात तयार होणाऱ्या चिक्कूचे काय करायचे असा प्रश्न उभा राहिल्यावर त्यांच्यापैकीच काही जणींनी चिक्कूवर प्रक्रिया करून त्याचे निरनिराळे पदार्थ बनवायला सुरवात केली. ह्या कामात बोर्डीमधल्या सौ. शारदाताई पाटील ह्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी आजमितीस चिक्कूपासून करता येणारे जवळ जवळ दिडशेहून अधिक पदार्थ शोधून काढले आहेत. ह्या विषयावरचे त्यांचे 'अमृत माधुरी' हे पुस्तकही प्रकाशित झाले आहे. त्यामध्ये काय नाही? चिक्कूचे लोणचे, मुरांबा, चिप्स, चॉकलेट्स, लॉलीपॉप्स, चिक्कूची सुपारी, चिक्कू पावडर, बर्फी, हलवा, आईस्क्रीम, पुऱ्या, मोदक, करंज्या.

असे अनेक चवदार पदार्थ चिक्कू पासून बनतात. हे सर्व पदार्थ त्यांनी स्वत: करून पाहिले आहेत. ठिकठिकाणी प्रदर्शनात मांडलेले आहेत. त्याविषयी

सप्रयोग व्याख्याने दिली आहेत. त्याबद्दल त्यांना पुरस्कारही मिळाले आहेत. त्यांच्या घोलवड महिला सेवा संस्था ह्या संस्थेतर्फे आणि खाजगीरित्या हे पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध असतात. त्यामागची मूलभूत प्रक्रिया अगदी साधी आहे. चिक्कूचे काप करून ते वाळवायचे आणि मग गरजेनुसार वापरायचे. ह्या प्रक्रियेत कोणतेही रासायनिक द्रव्य वापरले जात नाही. एरवी वाया जाणारा चिक्कू उपयोगात आणला जातो आणि चवदार पदार्थ तर तयार होतातच पण चिक्कू ह्या उत्पादनाची मुल्यवृद्धीही होते. उदाहरणार्थ चिक्कू शेकसाठी वापरता येणारी पावडर अठरा रुपये शंभर ग्रॅम ह्या दराने विकली जाते तर वेफर्ससारखेच खाता येणारे चिप्स सोळा रुपये शंभर ग्रॅम ह्या दराने जातात. चिक्कूची बाजारपेठ अशा रितीने वाढवण्यात ह्या स्त्रियांनी दाखवलेली उद्यमशीलता चकित करणारी आहे.

आतापर्यंत वर्णन केलेला चिक्कूच्या बागांचा परिणाम हा प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाचा होता. सामाजिक परिणाम कोणत्या प्रकारचा आहे ? सामाजिक परिणामाचे प्रमुख अंग शिक्षणाचे आहे. सामान्यपणे असे म्हणता येईल की ज्या शेतकऱ्यांनी बागा केल्या आहेत त्यांच्या साक्षरतेची पातळी काहीही असली तरी त्या सर्वांची मुले आता शाळेत जातात. लेखाच्या सुरवातीला जी उदाहरणे दिली त्याच्यावरून हे स्पष्ट होईल. ह्या भागातल्या वारली कुटुंबांम्ध्ये शिक्षणाचे प्रमाण नक्की किती आहे आणि चिक्कूच्या माध्यमातून आलेल्या समृद्धीचा त्यात वाटा किती हे कळण्यासाठी वेगळी पाहणी करावी लागेल पण शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे ही गोष्ट निर्विवाद. अर्थात त्यामागे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हेही कारण आहेच.

सुरवातीस म्हटल्याप्रमाणे ह्या भागात शिक्षणाचा प्रसार ७० वर्षांपूर्वी सुरू झाला. सध्याही जिल्हा परिषदेमार्फत सर्वदूर प्राथमिक शाळा चालवल्या जातात. आपण शिक्षण घेतले पाहिजे अशी जागृती वारली समाजात झाली आहे. मात्र असे असले तरी प्रत्यक्षात मुलांना शाळेत पाठवायचे आणि त्यांचा शैक्षणिक खर्च सोसून शिक्षण चालू ठेवायचे ह्यासाठी जी सक्षमता लागते ती चिक्कूच्या माध्यमातून आली आहे. ज्यांच्याजवळ ती नाही त्यांचे जगणे अद्याप शेतमजुरीवर अवलंबून आहे. बोर्डीजवळच्याच नागणकस नावाच्या पाड्यावर, रेतीबंदरावर मजुरी करायला काही कुटुंबे जात असल्याचे समजले. हंगामी स्थलांतर करणाऱ्या ह्या कुटुंबांच्या बाबतीत शिक्षणाचा प्रश्न पूर्वीसारखाच आहे. ह्यातली दुसरी अडचण अशी आहे की शिक्षणाचा प्रसार जरी झाला तरी त्याची गुणवत्ता सुधारलेली नाही. मुख्य म्हणजे ते अत्यंत अनाकर्षक आणि कंटाळवाणे आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यालाच काय पण सर्वसाधारण ग्रामीण विद्यार्थ्यालाही शाळा आपल्याकडे खेचून घेऊ शकत नाही. पाचवीनंतर तर इंग्रजी आणि गणित ह्या विषयांचा धसका घेतला जातो. लेखाच्या सुरवातीस दिलेले सुरेश शिवा खरपुडे ह्यांच्या मुलीचे उदाहरण ह्या बाबतीत बोलके आहे. ह्या हुशार, चुणचुणीत मुलीने इंग्रजी जमत नाही म्हणून सातवीनंतर शाळा सोडली. तिच्या घरची परिस्थिती तिला हवे तेवढे शिकवण्याची आहे. एखादा विषय येत नसला किंवा आवडत नसला तर सबंध शिक्षण बंद होण्याची आवश्यकता आहे का? मॅट्रीकला विषय सुटले नाहीत म्हणून किंवा नववीचा अभ्यासक्रम कठिण वाटतो म्हणून शाळा सोडलेली किती तरी मुले ह्या भागात दिसली. शिक्षण थांबल्याने शेतीचे तंत्र शिकण्याचे, पशूचिकित्सा व पशुपालन शिकण्याचे,

बाजारपेठ समजून घेण्याचे किंवा आधुनिक व्यवस्थापन शिकण्याचे मार्ग त्यांना बंद झाले आहेत. खरे तर ह्या सर्व गोष्टींची त्यांना नितांत आवश्यकता आहे. पण शिक्षणपद्धतीत मूलभूत दोष असल्याने त्यांचे पाऊल पुढे पडत नाही आणि आर्थिक सुस्थितीचा फायदा करून घेता येत नाही.

आर्थिक उत्पन्न वाढल्याने इतरही बदल वारली कुटुंबात दिसतात. एका वाक्यात सांगायचे तर त्यांची जीवनशैली बदलते आहे. अजूनही वाड्यांवरची बहुतेक घरे जुन्या पद्धतीची, कुडाची आणि कौलारू छपरांची आहेत पण नवीन बांधल्या जाणाऱ्या घरांमध्ये सिमेंट काँक्रीट व लोखंडाचा उपयोग होतो आहे. ही घरे शहरातल्या इतर कोणत्याही घरांसारखी दिसतात. वीज सर्वच पाड्यांवर आहे पण ज्यांना शक्य आहे त्या सर्वांकडे टीव्ही आहे. शहरी भागाशी जास्त संपर्क आलेल्या घरात फ्रीज व गॅस आहे. शिवणाचे यंत्र, क्वार्टझ घड्याळ, एखादं कपाट, खुर्ची-टेबल, लोखंडी वा लाकडी पलंग, गाद्या ह्या वस्तू सगळ्यांकडे कमी-अधिक प्रमाणात दिसतात. लूना, एम-८० किंवा तत्सम प्रकारची दुचाकी वाहनेही बऱ्याच आदिवासी बागवानांकडे आहेत. पूर्वी बहुतेक वारली पाड्यांमध्ये घरांच्या भिंतीवर तांदूळाच्या पिठीने वा रंगाने काढलेली वारली चित्रकला दिसायची. शहराजवळच्या पाड्यांमध्ये ती आता अभावाने दिसते. साधारण बऱ्या पद्धतीने केलेल्या लग्नाचा खर्च आता ३०-३५,००० रुपयांच्या घरात जातो असे समजले. ह्या लग्नात आता लग्नपत्रिका, बँड, कपडे, मानपान, जेवणावळी ह्यांचे महत्त्व वाढले आहे आणि त्या प्रमाणात पारंपरिक प्रथा कमी होत आहेत. वेशभूषेतही फरक दिसतो. पुरूष फार पूर्वीपासूनच शर्टपँट घालायला लागले आहेत तर तरूण मुली व बायकांचा कल पाचवारी नेसण्याकडे आहे.

हे जे सगळे होते आहे ते अर्थातच विकासाच्या आधुनिक प्रक्रियेला धरून होते आहे (मॉडर्नायझेशन). भोवतालची सामाजिक परिस्थिती जशी बदलेल तसा वारली समाज बदलणे क्रमप्राप्त आहे. मात्र फळबागा लागवडीतून काय होते आहे तर ह्या बदलांना सामोरे जाण्याची हिम्मत आणि ताकद वारली शेतकऱ्यांकडे येते आहे. चिक्कू लागवडीतून त्यांची केवळ आर्थिक स्थितीच सुधारली आहे असे नसून त्यांना आपण परिस्थितीवर थोडेफार नियंत्रण मिळवू शकतो असा आत्मविश्वास आला आहे. एखादा समूह जेव्हा केवळ अन्नसंग्रहण किंवा शिकार करून जगतो तेव्हा भोवतालची प्राकृतिक परिस्थिती त्याला नियंत्रित करत असते पण शेतीमधून निसर्गावर काही प्रमाणात ताबा मिळवून सामाजिक ध्येये गाठता येतात. फळबागांच्या लागवडीतून हेच होते आहे. एरवी आधुनिक विकासाच्या ह्या गुंतागुंतीच्या आणि बलदंड प्रक्रियेपुढे वारली हतबल झाले असते. कातकऱ्यांसारखे आदिवासी समूह ह्या रेट्यापुढे जसे इतस्ततः होत आहेत तशीच त्यांची गत झाली असती. फलोद्यानाच्या कार्यक्रमामुळे ह्या प्रक्रियेला तोंड देण्याची एवढेच नाही तर तिच्यात सन्मानाने सामील होण्याची क्षमता वारल्यांमध्ये आली हे ह्या उपक्रमाचे मोठे सामाजिक यश आहे.

- ४ -

डहाणू-बोर्डी भागात चिक्कूच्या माध्यमातून हा जो बदल झाला आहे त्याला काही कारणे आहेत. सर्वात प्रथम म्हणजे चिक्कू हे एक कल्पवृक्ष म्हणता यावे अशा

प्रकारचे झाड आहे. तसे पाहिले तर प्रत्येक झाड हे कल्पवृक्षच असते पण विशिष्ट काळात, विशिष्ट प्राकृतिक परिस्थितीत त्या त्या झाडाचे गुणधर्म वा उपयोग सिद्ध व्हावे लागतात आणि व्यापक प्रमाणात ते समाजाला उपयोगी पडावे लागते. चिक्कूच्या बाबतीत तसे झाले आहे.

एक फळझाड म्हणून चिक्कूचे काही गुणधर्म लक्षणीय आहेत. हे एक अतिशय चिवट, टणक आणि दिर्घायुष्य असणारे झाड आहे. चिक्कूला फळ उशीरा येते ह्याचे कारणच चिक्कूचे झाड हे दिर्घकाळपर्यंत म्हणजे १००-१५० वर्षे टिकते. जे झाड अल्पजीवी असते त्यालाच चटकन् फुले वा फळे येतात. चिक्कूच्या झाडाला, मोहराला वा फळाला चटकन् कीड लागत नाही. या बाबतीत त्याची अंगभूत प्रतिकारक्षमता फार मोठी आहे. हे झाड उष्णता, पाऊस, थंडी वा हवामानातील टोकाचे चढउतार सहन करून शकते. अतिशय जोरदार वादळ झाले तरच ते उन्मळून पडू शकते अन्यथा वर्षानुवर्ष जागेवर ताठ उभे राहते. हे सदाहरित जातीचे झाड आहे. त्याला कायम भरपूर हिरवीगार पाने असतात त्यामुळे सूर्य प्रकाशाचे अन्नात रूपांतर करण्याचे काम (फोटोसिंथेसीस) ते पूर्ण कार्यक्षमतेने करू शकते. त्याचे मूळ सोटमूळ प्रकारचे असते. ते जमिनीत खोलवर जाते त्यामुळे झाड तर भक्कम प्रकारे उभे राहतेच पण खोलवर जमिनीतूनही ते अन्नरस शोषू शकते. चिक्कू फळाला चीक असतो त्यामुळे नैसर्गिकरित्या किडीपासून त्याचे संरक्षण होते. कच्च्या फळाची चव तुरट असते त्यामुळे वानरासारख्या प्राण्यांचा वा पक्ष्यांचा त्यावर हल्ला होत नाही. फळ झाडावरच पिकवणे आवश्यक नसल्याने त्याची काढणी वा विक्री सोईनुसार नियंत्रित करता येते. साल अतिशय पातळ असते. ती खाता येते त्यामुळे फळात काहीच वाया जात नाही. ह्या भागातले उष्ण-दमट हवामान त्याला अनुकूल आहे हे खरे पण कोरड्या हवेतही ते चांगले वाढते. पुणे जिल्ह्यात बारामती-इंदापूर अशा अगदी भिन्न परिस्थितीतही ते चांगले वाढलेले आढळते. सुरवातीची काही वर्षे त्याला नियमित पाणी द्यावे लागते पण नंतर थोड्या पाण्यावरही ते जगू शकते. फळाची गुणवत्ता आणि उत्पादन कायम राखण्यासाठीच जास्तीचा पाण्याचा पुरवठा करावा लागतो. मात्र रासायनिक खतांचा वापर करावा लागत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिक्कू हे अतिशय गोड, रूचकर आणि मनापासून खावेसे वाटणारे फळ आहे. त्यात लोह भरपूर असते आणि अपायकारक गुणधर्म जवळजवळ नाहीच.

बोर्डी-डहाणू भागातले किनारपट्टीचे अनुकूल हवामान चिक्कूसाठी फायदेशीर ठरले तशीच इथली पाण्याची उपलब्धताही. मुळात हा जास्त पावसाचा प्रदेश. पाण्याचा उपसा हा प्रामुख्याने बागायतीसाठीच. उपसलेले पाणीच पुन्हा जमिनीत मुरल्यामुळे पाण्याची पातळी चांगली राहिली. त्यातच ह्या भागात अस्वली येथे एक मध्यम आकाराचे धरण झाले. शिवाय लहानमोठे नाले अडवल्याने पाण्याचे साठेही तयार झाले. नवीन होणाऱ्या कूपनलिका ह्या अर्थातच भूगर्भातून पाणी ओढतात. भूप्रतलीय पाण्याच्या साठ्यांचा परिणाम त्यांचा भरणा होण्याकरता किती होतो ते समजू शकले नाही. पण आजमितीस ह्या भागत पाण्याचा तुटवडा जाणवत नाही.

चिक्कूची लागवड लोकप्रिय होण्याचे आणखी एक कारण म्हणजे चिक्कूमध्ये भाजीपाल्याचे आंतरपिक घेता

येते. नपेक्षा चिक्कू तयार होण्यासाठी लागणाऱ्या काळात आदिवासींचा टिकाव लागला नसता. फळझाडांचा प्रसार न होण्याचे एक मुख्य कारण असे असते की मधल्या काळात खायचे काय असा प्रश्न शेतकऱ्यासमोर असतो. चिक्कूमध्ये भाताचे पीक तर घेता येतेच पण भाजीपालाही लावता येतो. केळ्यासारखे कमी मुदतीचे रोखीचे पीकही काढता येते. मुख्य म्हणजे चिक्कूबागेसाठी निर्माण केलेल्या पाण्याच्या साधनाने हे सर्व करता येते.

अर्थात चिक्कू हे असे गुणवंत फळ आहे एवढ्यामुळेच ते लोकप्रिय झालेले नाही. हे झाड लावण्याची परंपरा गेली सुमारे शंभर वर्षे ह्या भागात जोपासली गेली आहे. सुरवातीची चाळीस पन्नास वर्षे पारशी-इराणी लोकांची मक्तेदारी राहिली तरी नंतर हे झाड तिथल्या बहुजन समाजाने आपलेसे केले. मुख्य म्हणजे हा उद्योग वाढता रहावा ह्यासाठी त्यांनी दूरदृष्टी दाखवली. सोमवंशी क्षत्रिय समाजातील अनेक तरूणांनी फळबागा तर लावल्याच पण रोपवाटिकाही सुरू केल्या. रोपवाटिकांमधून हमखास कलमे मिळण्याची सोय झाली म्हणून चिक्कूचे क्षेत्र वाढत गेले. आदिवासी लोक काही दशके ह्या बागांमध्ये काम करत होते आणि म्हणून आजमितीस ते आपल्या शेतांवर फळबागा करू शकले. फळबाग करण्याची परंपरा ह्या भागात जिवंत राहिली, परस्परपूरक अशा उद्योगाचे जाळे उभे राहिले आणि औद्योगिकरणाच्या रेट्यात तिचा बळी गेला नाही म्हणूनच तिची फळे सर्वांना चाखता येत आहेत.

मात्र मोठ्या प्रमाणावर चिक्कूबागा होण्याचे कारण म्हणजे शेजारीच उपलब्ध झालेली मुंबई नावाची प्रचंड बाजारपेठ. ह्या बाजारपेठेचे तोंड आणि आकार इतका मोठा आहे आणि ती कायम इतकी भुकेलेली असते की कितीही पुरवठा केला तरी तिचे पोट भरत नाही. शिवाय दिवसागणिक ती वाढतच चालली आहे. ह्या बाजारपेठेशी जोडून घेण्याकरता जी रेल्वे व रस्त्यांची सुविधा लागते ती इथे पूर्वीपासूनच होती. डहाणू, घोलवड वा उंबरगाव ही पश्चिम रेल्वेवरची महत्वाची ठिकाणे आहेत. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गही जवळूनच जातो. बाजारपेठेची सोय आणि दळवळणाची साधने सहजगत्या उपलब्ध झाल्याने चिक्कूचे उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळाले.

ह्या मोठ्या बाजारपेठेअंतर्गत लहान लहान जागा वा कोनाडे शोधण्याचे आणि तेथे पोहोचण्यासाठी सोपे, स्वस्त आणि सहज पर्याय काढण्याचे कामही काही हुशार लोकांनी केले. आधी उल्लेख केलेल्या आदिवासी स्त्रियांचे काम ह्या प्रकारचे. त्यांनी पिकलेला चिक्कू विकायचे तंत्र तर शोधलेच पण स्टेशनबाहेरची रेल्वेमधली व रस्त्यावरची अनौपचारिक बाजारपेठही उपयोगात आणली. असेच काम उत्तर प्रदेशातून आलेल्या भैय्या लोकांनीही केले आहे. मुंबई शहराचा आणि भैय्यांचा संपर्क फार जुना आहे आणि भैय्यांचा आणि आदिवासींचाही. ह्या शतकाच्या सुरवातीस येणाऱ्या भैय्यांनी मुख्यत: म्हशींचे तबले टाकले. म्हशींसाठी गवत हवे म्हणून त्यांनी डहाणू-पालघर भागातल्या जमीनदारांशी संपर्क केला आणि कालांतराने गवताच्या व्यापारात ते शिरले. गवताचे डेपो किंवा गवत बांधायचे प्रेस ह्यावर ठाणे जिल्ह्यातले आदिवासी मोठ्या प्रमाणावर मजुरी करत. ७०-८० च्या दशकात भैय्यांची आवक मुंबईत फार मोठ्या प्रमाणावर झाली आणि मुंबईच्या अर्थव्यवस्थेच्या सर्व अनौपचारिक, असंघटित

क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला. त्यातलेच एक क्षेत्र फळांच्या विक्रीचे होते. गवताच्या निमित्ताने त्यांचा उत्तर ठाण्याशी संपर्क होताच. त्यामुळे चिक्कूच्या व्यापारात ते सहजगत्या शिरले.

कोणत्याही क्षेत्रात शिरलेल्या भैय्यांचे वैशिष्ट्य म्हणजे तो सर्व मध्यस्थ बाजूला सारून ग्राहक व विक्रेता ह्यांच्याशी थेट संपर्क स्थापन करतो आणि हे करत असताना दिवस-रात्र, सोय-गैरसोय, मान-अपमान इत्यादी गोष्टींची फिकीर न करता अपार मेहनत करतो. जे प्रस्थापित बागवान वा वाडीवाले होते त्यांना भैय्यांची गरज नव्हती कारण उत्पादन जास्त असल्याने त्यांचा चिक्कू बागांमधून सरळ ट्रकने बाहेरगावी जात होता. पण लहान शेतकऱ्यांना, विशेषत: आदिवासींना, तसे करणे शक्य नव्हते कारण त्यांच्याकडे दिवसाला पाच-दहा करंड्या एवढाच माल निघे. ह्या लहान उत्पादकांची गरज भैय्यांनी नेमकी हेरली आणि त्यांच्या बागांवर जाऊन चिक्कूंची खरेदी सुरू केली. किंवा एखाद्या सोईच्या ठिकाणी वजनकाटा मांडून तिथे चिक्कू विकत घेऊ लागले. ह्या ठिकाणांना काटा म्हणतात. भैय्यांचे दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सर्व प्रकारचा लहान-मोठा चिक्कू वजनावर घ्यायला सुरवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांचा लहान, दुय्यम प्रकारचा मालही खपू लागला. आजमितीस अशा प्रकारचा धंदा भैय्ये मोठ्या प्रमाणावर करतात. ते स्वत:च हा माल पोत्यात भरून, डोक्यावर घेऊन रेल्वेत चढवतात आणि इतर भाईबंदांच्या मदतीने सर्वदूर पोचवतात. हे अर्थात चिक्कू पुरतेच आहे असे नाही. इतर फळे आणि भाजीपाल्याचाही ते असाच व्यापार करतात.

भैय्ये पैसे रोखीने देतात किंवा भाव चांगला देतात असे मात्र अजिबात नाही. शक्य तितक्या कमी भावात माल पाडून घेण्याचीच त्यांची प्रवृत्ती असते. पैशाच्या फसवणुकीचे प्रकार तर नेहमीच घडत असतात, विशेषत: आदिवासींच्या बाबतीत. आधी चांगला भाव देऊन बांधून घ्यायचे आणि नंतर दर कमी कमी करायचा असे त्यांचे धोरण असते. पण लहान उत्पादकांचा माल ते जवळजवळ घरी येऊन खरेदी करतात हीच त्यांची उपयुक्तता. मुंबईचे क्रॉफर्ड मार्केट (सध्याची महात्मा फुले मंडई) किंवा भायखळा वा वाशी मंडई इथे प्रस्थापित दलाल वा अडते शेतकऱ्यांची वारेमाप फसवणूक व अडवणूक करतात. त्या तुलनेत भैयांचा आमने-सामने व्यवहार जास्त सोईचा पडतो. प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की भैय्यांनी जर ही समांतर सेवा पुरवली नसती तर छोट्या आदिवासी शेतकऱ्यांना चिक्कूची विक्री करणे कठिण गेले असते. मुंबईमध्ये मोठ्या संख्येने आलेले भैय्ये पाहून सामान्य माणसाच्या कपाळावर आठी पडत असते पण भैय्ये काही उपयुक्त सामाजिक कार्य करत असतात आणि म्हणून सर्व क्षेत्रात त्यांचा प्रवेश होतो हे लक्षात घेतले पाहिजे.

- ५ -

आदिवासी समाजात विकासाची ही प्रक्रिया सुरू करण्यात बोर्डीच्या कृषी-उद्योग आणि आदिवासी कल्याण प्रतिष्ठान ह्या स्वयंसेवी संस्थेची भूमिका आणि कामगिरी महत्त्वाची राहिली आहे. सध्याच्या समाजव्यवहारात स्वयंसेवी संस्थांचे स्थान काय असा प्रश्न नेहमी चर्चिला जात असतो. आदिवासी विकासाच्या संदर्भात तर हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. ह्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्यासाठी प्रतिष्ठानच्या कामगिरीची चिकित्सा

करणे आवश्यक आहे. त्यातून सर्वच स्वयंसेवी संस्थांना काही ना काही शिकता येईल.

प्रतिष्ठानविषयी जाणवणारी सर्वात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रतिष्ठानला समाजाच्या विकासाच्या, विशेषत: आदिवासी विकासाच्या बाबतीत काही एक निश्चित दृष्टीकोन (व्हीजन) आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचा विकास हा त्यांच्याकडील नैसर्गिक साधन संपत्तीचा म्हणजे, जमीन, पाणी, झाडे इत्यादी गोष्टींचा उत्पादक व संवर्धनशील वापर करून घडवता येईल आणि त्या कामात आपण त्यांना मदत करावी असा हा दृष्टीकोन आहे. वरवर पाहता हा दृष्टीकोन सरळ-साधा वाटला तरी तो फार सखोल, गंभीर आणि महत्त्वाचा आहे. आपण ज्या काळात, समाजात आणि परिस्थितीत राहात आहोत त्यामध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा झपाट्याने नाश होत चालला आहे आणि त्यामुळे पुढचा विकासच नव्हे तर मानवी अस्तित्वही धोक्यात येऊ शकते. शहरी व औद्योगिक विकासाच्या काही साचेबंद कल्पनांपायी, नैसर्गिक संपत्तीचा वापर करण्याच्या ज्या काही पारंपरिक व्यवस्था आहेत आणि तसे करणारे जे मानवसमाज आहेत त्यांच्या मुळावर येणारी प्रक्रिया सध्या चालू आहे.

ह्या प्रक्रियेशी सामना करायचा असेल तर आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर करून, नैसर्गिक साधनांची उत्पादकता वाढवणे आणि त्यायोगे अविकसित समूहांची उन्नती साधणे हाच मार्ग राहतो. प्रतिष्ठानने नेमके हेच करण्याचा प्रयत्न केला आहे. हा असा मूलभूत दृष्टीकोन आणि त्यावरची अविचल निष्ठा हे प्रतिष्ठानचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. स्वयंसेवी संस्थांजवळ ह्याच गोष्टीची उणिव असते आणि म्हणून त्यांच्या कार्याला टोकदारपणा येत नाही आणि परिणाम जाणवत नाही.

प्रतिष्ठानला हा दृष्टीकोन देण्यात अर्थातच डॉ. जयंतराव पाटील हे कारणीभूत आहेत. शेतकरी कुटुंबातून आल्याने आणि नंतर कृषीविज्ञानाचे उच्च शिक्षण घेतल्याने कृषीउद्योगांचे महत्व तर त्यांच्या लक्षात आलेच पण स्वत: नामांकित शास्त्रज्ञ असल्याने हा दृष्टीकोन प्रत्यक्षात कसा राबवायचा ह्याचेही तंत्र त्यांना विकसित करता आले. समाजकार्याची परंपरा त्यांच्या घराण्यात होतीच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे आचार्य भिसे आणि स्वामी आनंद ह्या सारख्या ऋषीतुल्य गांधीवाद्यांमुळे सर्वोदयी विचारांचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्यातून आदिवासींसारख्या सर्वात शेवटच्या समाजघटकासाठी आपण कार्य केले पाहिजे ही भूमिका तयार झाली. त्यांचे वडील श्री. शामराव पाटील मुंबई राज्यात मंत्री होते पण जयंतरावांनी, अनेक निमंत्रणे येऊनही, सत्तेत सहभागी होण्याचे नाकारले आणि एकदा स्वीकारलेले हे व्रत जन्मभर निष्ठेने पाळले. ते केंद्रिय नियोजन आयोगाचे सदस्य होते आणि इतरही अनेक तऱ्हेने त्यांनी शासनाला सहकार्य व मार्गदर्शन केले पण सत्तेच्या राजकारणापासून ते कायम दूर राहिले. हा त्यांचा एक फार मोठा गुणविशेष आहे. पण त्याहीपेक्षा मोठा गुण म्हणजे त्यांची नम्रता आणि साधेपणा. इतकी मोठी पदे मिळूनही त्यांच्या स्वभावातली निर्मळता, प्रेम आणि दिलदारपणा अजिबात कमी झालेला नाही. दुसरी एक थक्क करणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या स्वभावात कटूता किंवा वाकडेपणाचा लवलेशही नाही. सामाजिक कार्यकर्ता हा एकाच वेळी बुद्धीमान, चारित्र्यसंपन्न, विनयी आणि सेवाभावी कसा असू शकतो ह्याचे डॉ. जयंतराव पाटील हे मूर्तिमंत उदाहरण आहेत. उच्च

दर्जाचे सामाजिक कार्य व्हायचे असेल तर हे सर्व गुण कार्यकर्त्यांजवळ असणे आवश्यक असते.

मात्र संस्था म्हणून आपल्याला काम करायचे असेल तर शेतीसंदर्भात नुसता योग्य दृष्टीकोन असून भागणार नाही तर संबंधित तांत्रिक क्षमताही असायला पाहिजे हे जयंतरावांनी जाणले. त्यामुळे कोसबाडला असताना केंद्रीय शासनाकडून कृषी विज्ञान केंद्राची स्थापना त्यांनी केली तर प्रतिष्ठानची स्थापना केल्यानंतर प्रात्यक्षिके करण्यासाठी संस्थेची शेती आणि रोपवाटिका करण्यावर भर दिला. आदिवासींमध्ये चिक्कूचा प्रसार करायचा तर त्यांना खात्रीची कलमे स्वस्त दरात मिळाली पाहिजेत आणि ते काम इतर कुणीही करणार नसल्याने संस्थेलाच करावे लागेल हे त्यांनी सुरवातीपासून ओळखले. ही क्षमता त्यांनी संस्थेत आणली नसती तर फळबाग प्रसाराचे कोणतेच काम झाले नसते. आज प्रतिष्ठानकडे अनेक हुषार व प्रशिक्षित अशा आदिवासी कार्यकर्त्यांचा संच आहे. ह्यातले कुणीच प्रतिष्ठानकडे नोकरीला नाहीत. आपली शेती सांभाळून ते प्रतिष्ठानचे कार्य करतात. स्वतः शास्त्रज्ञ असल्याने नुसते प्रसाराचे म्हणजे 'एक्सटेन्शनचे' काम न करता ह्या क्षेत्रात नवीन संशोधन करण्याचे कामही त्यांनी चालू ठेवले. कारण उत्पादकता वाढवायची तर हे काम शास्त्रशुद्ध होणे आवश्यक होते. ह्या संदर्भातले त्यांचे मुख्य योगदान म्हणजे खिरणीच्या झाडांवर कलमे बांधण्याची युक्ती. चिक्कूचे पुनर्रोपण कलमांच्या माध्यमातून होते. पूर्वी चिक्कूच्या फांदीवरच गुटी कलम (माती कलम) बांधत आणि तिथे मुळे फुटली की ती फांदी जमिनीत लावत. ह्या पद्धतीत विश्वासार्हता तर कमी होतीच पण वेळही पुष्कळ लागे. एकदा एका कृषी संशोधन केंद्रात गेले असताना चिक्कूचे कलम त्याच कुळातल्या दुसऱ्या झाडावर करण्याची युक्ती जयंतरावांनी पाहिली आणि त्यावरून आपल्याकडील चिक्कूसाठी तसे का करू नये असा विचार त्यांनी केला. ही कलमे करण्यासाठी खिरणी (रायण) हे झाड त्यांनी निवडले. चिक्कू, खिरणी, बकुळ, मोह ही एका कुळातली झाडे आहेत. खिरणीला लहान लहान पिवळी फळे येतात आणि गुजरातचा मेवा म्हणून ती प्रसिद्ध आहेत. सुरवातीला खिरणीचे रोप कुंडीत वाढवले जायचे आणि नंतर ती कुंडी चिकूच्या झाडाजवळ नेऊन भेट कलम बांधले जायचे. ही कलमे खात्रीची आणि लवकर होणारी असली तरी ही पद्धत बोजड होती. म्हणून मग वाफ्यात खिरणीचे बी पेरून अनेक झाडे वाढवायची आणि त्यावर चिक्कूचे पाचर कलम बांधायचे ही युक्ती शोधण्यात आली. ती अपेक्षेबाहेर यशस्वी झाली. त्यामुळे एकदम हजारो कलमे बनवता येऊ लागली आणि कलमांचा खर्चही नाममात्र झाला. फलोद्यान शास्त्रातले हे एक मोठे यश मानले जाते. आता सगळीकडे ह्याच पद्धतीने कलमे केली जातात. शासनाच्या कृषी विभागानेही हीच पद्धत स्वीकारली आहे.

चिक्कूच्या फळबागांचा प्रसार करायचा तर पायाभूत सुविधाही निर्माण कराव्या लागतील हे प्रतिष्ठानने ओळखले आणि त्याप्रमाणे पावले टाकली. हे कार्य यशस्वी करण्याकरता कोणत्या सरकारी योजना उपयोगी पडतील त्यांचा शोध घेतला आणि आदिवासींकरता त्या राबवायला सुरवात केली. मुख्य प्रश्न आदिवासींना पाण्याचे साधन उपलब्ध करून देण्याचा होता. त्यासाठी आदिवासी उपयोजना किंवा दशलक्ष विहीर योजना अशा योजनांचा उपयोग करण्यात आला. नंतर महाराष्ट्र

शासनाची फलोत्पादन योजनाही राबवली गेली. रोटरी क्लब सारख्या संस्थांकडून आणि कम्युनिटी एड ॲब्रॉड सारख्या परदेशी देणगीदार संस्थाकडूनही आदिवासींना साहाय्य मिळवून देण्यात आले. पाड्यापाड्यांना जोडणारे चांगले रस्ते तयार व्हावेत म्हणून सतत पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा पाठपुरावा करण्यात आला. आज ह्या परिसरात सर्वत्र काळेशार डांबरी रस्ते आहेत. त्यामुळे मालाची वाहतूक सुरळीत पार पडते. आस्वली धरण मंजूर करून पुरे करण्यातही डॉ. जयंतराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला. घोलवड व उंबरगाव ह्या दरम्यान 'बोर्डी रोड' हे नवे स्टेशनही त्यांच्याच प्रभावाने सुरू झाले.

प्रतिष्ठानच्या ह्या कामातून असा निष्कर्ष काढता येईल की कृषी तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, कल्याणकारी योजना, बाजारपेठेशी संबंध आणि कृषी विस्तार ह्या माध्यमातून आदिवासींची प्रगती साधण्याचे काम केले गेले. दुसऱ्या प्रकारे लिहायचे तर आदिवासींबद्दल असणारा सेवाभाव व तळमळ, शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये केलेली जाणीव जागृती आणि सुयोग्य तंत्रज्ञान वापरून केलेला विकास ह्या सर्वांचा संगम प्रतिष्ठानच्या कार्यात झाला. इथे लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे आपले इप्सीत साध्य करण्यासाठी प्रतिष्ठानने सर्व आघाड्यांवर काम केले. सरकारचा पाठपुरावा करण्यापासून ते नर्सरीत रोपे तयार करण्यापर्यंत. पण हे करत असताना त्यांचे लक्ष्य मात्र एकच होते : आदिवासींमध्ये फलोद्यानाचा प्रसार. फलोद्यान विकास हाच त्यांचा एक कलमी कार्यक्रम होता. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. सध्या स्वयंसेवीसंस्था अनेक कार्यक्रम राबवतात. त्या प्रत्येक कार्यक्रमाचे लक्ष्य वेगवेगळे असते. त्यामुळे संस्थेची शक्ती विखुरली जाते आणि कामाचा एकसंध परिणाम दिसत नाही. संस्थेसमोर आपण काय काम करायचे ह्याचे स्पष्ट उद्दिष्ट नसल्याने असे होते. प्रतिष्ठानचे उदाहरण याबाबत सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे.

ह्याला जोडूनच महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व काम प्रतिष्ठानने कोणतेही अवडंबर वा बडेजाव न माजवता अत्यंत साधेपणाने केलेले आहे. प्रतिष्ठानकडे जीप किंवा गाडी नाही. (सरकारकडून भाडेपट्ट्याने मिळालेली जमीन एवढीच मालमत्ता आधी म्हटल्याप्रमाणे सर्व कार्यकर्ते आपापला व्यवसाय सांभाळून प्रतिष्ठानचे काम करतात. कलमांची विक्री ना नफा ना तोटा ह्या तत्वावर करण्यात येते. आदिवासींना कलमे विनामूल्य दिली जातात तर इतर लोकांकरता रास्त दर आकारला जातो. प्रतिष्ठानाच्या स्वतःच्या बागेतून आणि कलमे विक्रीतून जे उत्पन्न होते त्यातून खर्च भागवला जातो. बाहेरच्या संस्थांची मदत वर्षाला ५०,००० रुपयांपेक्षा जास्त नाही.) सामाजिक कार्यकर्त्याने 'फकीरी' वृत्तीने राहिले पाहिजे अशी स्वामी आनंद यांची शिकवण होती हे जयंतराव आवर्जून सांगतात. निर्लोभी, निर्मोही आणि निरहंकारी मनाने सतत काम करत राहावे ही गांधीजींची शिकवण होती. स्वातंत्र्यपूर्व काळात ती जितकी महत्त्वाची होती त्यापेक्षा आज जास्त महत्त्वाची झाली आहे. ही वृत्ती प्रत्यक्षात आणणे शक्य आहे हे प्रतिष्ठानच्या उदाहरणावरून दिसते. (२)

ह्या सोबतच पाण्याच्या उपलब्धतेकडेही थोडेसे जागरूकतेने बघावे लागेल. हा समुद्रसपाटीकडचा सखल भाग आहे, इथे पाऊस चिकार पडतो आणि अस्वली धरणासारखे पाण्याचे साठे तयार झाल्याने सध्या इथे

पाण्याची टंचाई जाणवत नाही. पण पुढे ती येणारच नाही असे समजणे धोक्याचे ठरेल. सध्याच्या फळबागा ह्या मुख्यत: कूपनलिकांच्या जोरावर आहेत. हा सपाटीचा भाग असल्याने पावसाचे तसेच धरणात साठवलेले पाणी जमिनीत मुरत असण्याची शक्यता आहे पण त्याचा काटेकोर व शास्त्रीय अभ्यास करून अंदाज बांधावा लागेल. मुख्य म्हणजे भविष्यकाळात जर डोंगरपट्टीकडे फळबागांचा प्रसार करायचा असेल तर आधी पाण्याची शाश्वत साधने निर्माण करणे आवश्यक ठरेल. जमीन आणि पाणी ही दाने नैसर्गिक साधने जर आदिवासींना उपलब्ध करून दिली तर त्यांना सरकारच्या वा इतर कुणाच्या दयेवर अवलंबून न राहता स्वत:चा विकास साधता येईल हा ह्या अभ्यासाचा स्पष्ट निष्कर्ष आहे.

प्रतिष्ठानच्या कामाचे व्यापक महत्त्व (इंग्रजीत सिग्नीफीकन्स) असे आहे की फळबागांच्या माध्यमातून संतुलित आणि संवर्धनशील विकासाचे एक वेगळे प्रतिमान आपल्यासमोर येते. मोठमोठी शहरे, कारखानदारी, उद्योगधंदे, भरपूर वाहने, दळणवळणाची साधने हे सर्व आधुनिक विकासाचे घटक आहेतच पण या घटकांना दुसऱ्या बाजूने तोलून धरणारा नैसर्गिक साधन-संपत्तीवर आधारित, पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणारा विकासही आवश्यक आहे. शहरीकरण आणि औद्योगिकरण जेव्हा प्रमाणाबाहेर वाढते तेव्हा त्याचे कसे दुष्परिणाम होतात ते प्रदूषण, बकालीकरण, गुन्हेगारी, हिंसाचार इत्यादी माध्यमातून आपल्या नजरेसमोर येत असतात. शहरीकरण आणि औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत सर्वांना समाधानकारक रोजगार मिळेलच अशी हमी नाही. शिवाय ह्या प्रक्रियेतून निसर्गाचा न भरून येणारा विनाश होत असतो ते वेगळेच. अशावेळी समाजातील सर्व लोकांनी ह्या झुंडीमध्ये सामील व्हायचे की निदान काही लोकांनी तरी विकासाची एक वेगळी पद्धत चोखाळायची हे ठरवणे आवश्यक आहे. बोर्डी-डहाणू भागातील फळबागा ही विकासाची वेगळी पद्धत आहे. आपल्या भागातील नैसर्गिक साधन संपत्ती ओळखून, तिची योग्य त्या रितीने जोपासना करून, स्वत:चा व समाजाचा विकास साधण्याची ही रीत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असले तरी ह्यामध्ये सुबत्ता, प्रगती वा आर्थिक भरभराटीला फाटा दिलेला नाही. वारली शेतकऱ्यांच्या घरातील गॅस, टी. व्ही., फ्रीज, दुचाकी वाहने इत्यादी गोष्टी ह्याची प्रचिती देतातच पण त्यांचे मुंबईच्या बाजारपेठेशी संबंधही ह्याची खात्री पटवतात. आता जे नवीन आर्थिक परिवर्तन होऊ घातले आहे त्यामध्ये निदान हा वारली शेतकरी तरी बेसावध सापडला जाणार नाही.

ह्या संदर्भात बोर्डीच्या शेजारीच पण उंबरगाव तालुक्यात चाललेले श्री. भास्करराव सावे ह्यांचे नैसर्गिक शेतीचे प्रयोग महत्त्वाचे आहेत. जपानी शेतीतज्ञ फुकुओका ह्यांच्या तत्त्वज्ञानाशी समांतर पण स्वत:ची एक वेगळी शैली असणारे भास्करराव साव्यांचे नैसर्गिक शेतीचे प्रयोग भारतभर विख्यात आहेत. भारताच्या कानाकोपऱ्यातून केवळ शेतकरीच नव्हे तर शेतीतज्ञही ते प्रयोग बघायला आणि भास्कररावांचे मार्गदर्शन घ्यायला येत असतात. भास्कररावांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की रासायनिक खते, औषधे व कीटकनाशकांचा वापर न करताही भरपूर उत्पादन घेता येते आणि निसर्गाचा विध्वंस न करता आर्थिक सुबत्ता

आणता व टिकवता येते. हे प्रयोग बोर्डीच्या आसपास होत आहेत आणि भास्करराव सावे हे सोमवंशी क्षत्रिय समाजातले असून डॉ. जयंतराव पाटलांचे नातेसंबंधी आहेत हा निव्वळ योगायोग नव्हे. एका व्यापक कृषी परंपरेचेच ते प्रकटीकरण आहे.

\- ६ -

फलोद्यानाच्या माध्यमातून आदिवासी विकासाचे हे अतिशय उल्लेखनीय काम झाले असले तरी त्याच्यामध्ये एक मुख्य अडचण आहे, मुख्यत: ह्या कामाची व्याप्ती वाढवण्याच्याबाबतीत. ती आहे जमिनीची.

फळझाडे लावायची असली तर सगळ्यात पहिली आवश्यकता म्हणजे स्वत:च्या मालकीची जमीन पाहिजे. भाजीपाला किंवा एखादे हंगामी पीक घ्यायचे असेल तर तात्पुरती, भाडेपट्याने जमीन घेता येते पण फळझाडातील गुंतवणूक अनेक वर्षांसाठी करायची असल्याने जमिनीची स्पष्ट मालकी आणि ताबा असणे आवश्यक असते. ज्या आदिवासींकडे स्वत:च्या मालकीच्या जमिनी आहेत त्यांच्याबद्दल प्रश्न नाही. परंतु ह्या भागातील (आणि एकूणच ठाणे जिल्ह्यातील) अनेक आदिवासी जंगलखात्याकडून भाडेपट्ट्याने मिळालेल्या एकसाली जमिनी कसतात. त्यांच्या बाबतीत जमीन मालकीचा प्रश्न उभा राहतो.

एकसाली जमिनीबाबतची समस्या काय आहे ? ब्रिटिश सरकारने भारत ताब्यात घेतल्यानंतर सर्वत्र जमीन हक्कांची निश्चिती केली. ज्या जमिनी खाजगी मालकीच्या, ताब्याच्या वा वहिवाटीच्या होत्या त्यावर त्यांनी खाजगी मालकी मान्य करून महसूलाची आकारणी केली. मात्र ज्या जमिनीवर खाजगी मालकी शाबित झाली नाही अशा सर्व जमिनी सरकारजमा केल्या. जंगलाचे क्षेत्र हे अशा तऱ्हेने सरकारी मालकीचे झाले. बहुसंख्य आदिवासी शेतकरी ह्या जंगलात राहात आणि डोंगरउताराच्या वा सपाटीवरच्या जमिनीत वरी-नागली-भात ह्यासारखी पिके काढत. सरकारने जंगले ताब्यात घेतल्यानंतर हे आदिवासी भूमीहीन झाले आणि त्यांच्यावर देशोधडीला लागण्याची पाळी आली. सरकारच्या ह्या धोरणाविरूद्ध सर्वत्र असंतोष प्रकट होऊ लागला तेव्हा आदिवासींना जगण्याचे काहीतरी साधन असावे म्हणून सरकारने जंगलजमिनींचे तुकडे (प्लॉट्स) आदिवासींना वार्षिक भाडेपट्ट्याने द्यायचे ठरवले. त्यामागे अर्थात आदिवासींनी जंगल-संरक्षणाच्या कार्यात सरकारची मदत करावी हाही हेतू होता. हे जमिनीचे तुकडे एक वर्षाच्या कराराने असल्याने त्यांना एकसाली प्लॉट्स म्हणत. असे प्लॉट्स वैयक्तिक नावावर दिले जात. रायगड जिल्ह्यात ते आदिवासींच्या समूहाला दिलेले होते आणि तिथे त्यांना दळी प्लॉट्स म्हणत. ह्या जमिनींचे भाडे नाममात्र असले तरी कराराची अंमलबजावणी ब्रिटिश शासन अतिशय काटेकोर पद्धतीने करी.

एकसाली प्लॉट्सची पद्धत ब्रिटिश सत्ता असेपर्यंत तर होतीच पण स्वातंत्र्य मिळून निरनिराळी राज्ये तयार झाली तेव्हाही चालू राहिली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर जमीन सुधारणा करण्यात आल्या. ह्या सुधारणांमागचे मुख्य सूत्र 'कसेल त्याची जमीन' हे होते. त्यासाठी कूळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, अतिरिक्त जमीन वाटप योजना इत्यादी कार्यक्रम राबवले गेले. ह्याच धोरणाला अनुसरून आदिवासींनी सरकारी

जमिनींवर केलेली अतिक्रमणेही नियमित करून त्या खाजगी मालकीच्या करून देण्यात आल्या. त्याप्रमाणेच एकसाली जमिनीही खाजगी मालकीच्या करून द्याव्यात ही मागणी पुढे आली. ही मागणी रास्त होती आणि सरकारी धोरण व सामाजिक न्यायाच्या कल्पनेत बसणारी होती म्हणून २२ मार्च १९६९ रोजी एक निर्णय घेऊन सरकारने ती मान्य केली.

हा निर्णय जरी घेतला तरी त्याची अंमलबजावणी झाली नाही. ह्याचे कारण वनखात्याला ही जमीन लोकांच्या मालकीची होऊ द्यायची नव्हती. त्यामुळे ह्या खात्याने त्याबाबत निरनिराळ्या शंका व हरकती काढून वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारले. काही ठराविक ठिकाणीच एकसाली जमिनी खातेदारांच्या मालकीच्या करून देण्यात आल्या. अंतर्गत आणीबाणीच्या काळात हे काम थंडावले. नंतर १९७६ साली 'वने' हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीतून राज्य व केंद्र सरकारच्या संयुक्त सूचीमध्ये गेला. तेव्हा तर वनखात्याचे चांगलेच फावले आणि १९८० साली केंद्रीय वन संवर्धन कायदा मंजूर झाल्यावर तर वनखात्याने ह्या जमिनी लोकांच्या नावावर करायचेच नाकारले. वन संवर्धन कायद्यामधली एक तरतूद अशी होती की कोणतीही वन जमीन जर वनाव्यतिरिक्त इतर उपयोगासाठी वापरायची असेल तर त्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यायला पाहिजे. ह्या तरतूदीच्या मागे दडून वनखात्याने एकसाली संबंधातली अंमलबजावणी रोखून धरली.

ह्या अन्यायकारक सरकारी धोरणाविरुद्ध विश्वनाथ किसन जाधव या सोलापूर जिल्ह्यातल्या एकसाली जमीन धारकाने मुंबई उच्च न्यायालयात १९८४ साली रीट अर्ज केला. ह्या अर्जावर १३ फेब्रुवारी १९८७ रोजी निर्णय देताना उच्च न्यायालयाने असे म्हटले की २२ मार्च १९६९ चा सरकारी निर्णय हा १९८० च्या कायद्याच्या अगोदरचा असल्याने वन संवर्धन कायद्याच्या तरतूदी त्यावर बंधनकारक नाहीत आणि म्हणून सरकारने त्वरित आपल्या निर्णयाप्रमाणे जाधव ह्यांना खाजगी मालकी द्यावी.

हा निर्णय ऐतिहासिक होता आणि त्या आधारे इतरही एकसाली जमीन धारकांना खाजगी मालकी द्यायला हवी होती. पण सरकारने तसे केले नाही. ह्या मागणीसाठी आदिवासी संघटना व कार्यकर्त्यांनी सातत्याने लढे दिले व प्रखर आंदोलन उभारले. आंदोलनाचाच भाग म्हणून मुरबाड तालुक्यात कार्य करणाऱ्या श्रमिक मुक्ती संघटनेने १९९५ साली मुंबई उच्च न्यायालयात एक रीट अर्ज दाखल करून सरकारने न्यायालयाच्या १९८७ च्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही ह्याकडे लक्ष वेधले. ह्या अर्जावर १९ नोव्हेंबर १९९८ रोजी निर्णय देताना न्यायालयाने सरकारच्या दिरंगाईची गंभीर दखल घेतली आणि सरकारला एक वर्षाच्या आत म्हणजे १९ नोव्हेंबर १९९९ च्या आत सर्व एकसाली जमिनी वैयक्तिक खातेदारांच्या नावे करण्यास तर फर्मावलेच पण निर्णयाच्या तारखेदिवशी ह्या जमिनी वनखात्यांच्या कबजातून मोकळ्या झाल्याचे जाहीर केले.

एकसाली जमिनीसंदर्भात अशा तऱ्हेने स्वच्छ निर्णय असले आणि जमिनी लोकांच्या कबजात असल्या तरी कागदोपत्री मालकी आदिवासींकडे नसल्याने त्यांना जमिनीचा निश्चित उपभोग घेता येत नाही. फलोद्यान केलेल्या आदिवासींपैकी काही जणांनी एकसाली जमिनीतही झाडे लावली आहेत आणि इतर अनेक तसे

करायला इच्छुक आहेत. पण जमीनमालकीचे खाते उतारे देता येत नसल्याने त्यांना कोणतीही भांडवली गुंतवणूक करता येत नाही. अशाच प्रकारची समस्या कूळ कायदा वा कमाल जमीन कायद्याअंतर्गत जमिनी मिळालेल्यांपुढे आहे. कायदेशीर प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने त्यांना मालकी हक्क शाबीत करता येत नाही. स्वत:च्याच जमिनीत ते चोर ठरतात. ह्याबाबतीतले सरकारी धोरण अत्यंत बेफिकीर आणि सहानुभूतीशून्य असल्याने इच्छा असली आणि प्रतिष्ठानचे साहाय्य असले तरी त्यांचा विकासाचा मार्ग बंद होतो. हा प्रश्न अर्थातच ठाणे जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. संबंध राज्यात, एवढेच नाही तर संबंध देशात आदिवासी जमिनीसंदर्भात सरकारी धोरण गलथानपणाचे आहे. आता तर आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली आदिवासी जमिनींचे संरक्षण करण्याच्या भूमिकेपासून सरकार मागे हटतंय. आदिवासींच्या जमिनी आदिवासींकडे राहिल्या तरच त्यांचे अस्तित्व टिकेल आणि विकास करण्याचा मार्ग मोकळा होईल.

– ७ –

बोर्डी परिसरातल्या ह्या कामातून सामाजिक विकासाच्या बाबतीत काय शिकायला मिळते ?

बोर्डी डहाणू परिसरात सामाजिक कार्याच्या विविध परंपरांचा संगम झाला आहे. बोर्डीमध्ये आचार्य भिसे ह्यांच्या धुरीणत्त्वाखाली १९२० मध्ये पहिली शाळा सुरू करण्यात आली ह्याचा उल्लेख आधी आलाच आहे. ह्या शाळेला फार तळमळीचे आणि सेवाभावी शिक्षक लाभले. हे सर्व शिक्षक गांधीजींच्या प्रभावाखालचे असल्याने राष्ट्रवादी जीवन शिक्षण देण्याचे ध्येय त्यांनी मनाशी बाळगले. विद्यार्थ्यांना नुसती चार अक्षरे वा अंक शिकवणे किंवा पोपटपंची करून परीक्षा पास करायला लावणे इतके मर्यादित उद्दिष्ट ह्या शिक्षकांसमोर नव्हते. तर शिक्षणाच्या माध्यमातून एक सुसंस्कारित, चारित्र्यवान व उत्पादनशील असा देशभक्त तयार करण्याचा मनसुबा होता. बोर्डीची शाळा हे स्वातंत्र्यचळवळीचे एक महत्त्वाचे केंद्र होते. कस्तुरबा गांधी, रामदास गांधी, काकासाहेब कालेलकर, साने गुरुजी, स्वामी आनंद अशी मोठमोठी मंडळी त्या काळात बोर्डीस राहून गेली. स्वातंत्र्य चळवळीतील असा एकही उपक्रम नव्हता जो बोर्डीस झाला नाही. मग ती दारूबंदी असो, मिठाचा सत्याग्रह असो, सविनय कायदेभंग असो वा छोडो भारत चळवळ असो. १९२० ते १९४७ ह्या काळात बोर्डीमधले वातावरण ज्वलंत राष्ट्रप्रेमाने भारलेले होते. त्या काळात बोर्डी आणि आसपासच्या गावातून स्वातंत्र्य सैनिकांची एक प्रभावळच उभी राहिली. नुसता संख्येचा विचार केल्यास शंभराहून अधिक स्वातंत्र्यसैनिकांची नोंद बोर्डी परिसरात झाली आहे (अधिक माहितीसाठी 'बोर्डीचे स्वातंत्र्य सैनिक' आणि 'आदर्श गाव बोर्डी' ही पुस्तके पाहावीत.)

ह्या गांधीवादी सर्वोदयी विचारातून स्फूर्ती घेऊन आचार्य भिसे ह्यांनी १९४० साली आदिवासी सेवा मंडळाची स्थापना केली आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासी विकासासाठी वाहून घेतले. हे काम करत असताना औपचारिक शिक्षणाचे काम नेटाने चालूच होते.

१९२० साली काढलेल्या शाळेचे माध्यमिक विद्यालय तर निघालेच पण मुलांसाठी वसतिगृह, अध्यापक विद्यालय, पदवीधर अध्यापक कॉलेज अशा संस्था सुरू करून त्याला गुरूकुलाचे स्वरूप आणले

गेले. पण आचार्यांची दूरदृष्टी अशी की त्यांनी जवळच्याच कोसबाड टेकडीवर कृषी संस्थेची स्थापना केली आणि कृषीशिक्षण आणि कृषीतंत्रज्ञानाच्या प्रसाराची मुहूर्तमेढ रोवली. ह्या ठिकाणी कृषी विद्यालय तर सुरू झालेच पण नंतर आश्रम विद्यालय, माध्यमिक विद्यालय, आदिवासी तरूणांना शेतीचे शिक्षण देणारे महात्मा गांधी जनता विद्यालय, पंचायत राज्य प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र आणि नंतर कृषी विज्ञान केंद्र अशा संस्था निर्माण केल्या गेल्या. ह्या संस्थांमधूनच श्री. हरिश्चंद्र पाटील आणि डॉ. जयंतराव पाटील ह्या कृषीतज्ञांचे कर्तृत्व साकारले.

बोर्डी कोसबाडच्या औपचारिक शिक्षणाला जोड मिळाली ती ताराबाई मोडक ह्यांनी सुरू केलेल्या बाल शिक्षणाची. आपली बालवाडीची संकल्पना ताराबाईंनी कोसबाडच्या टेकडीवर सिद्ध केली आणि त्यांच्या पश्चात अनुताई वाघ ह्यांनी तिला पूर्णरूप दिले. बालवाडीची ही संकल्पना इतकी क्रांतिकारक होती की तिने सबंध बालशिक्षणालाच वेगळे वळण दिले. किंबहूना बालशिक्षण नावाचे असे काही शिक्षण असते ही जाणीव महाराष्ट्राला ताराबाई व अनुताईंच्या कोसबाडच्या कामामुळे झाली.

कोसबाड ज्या कैनाड गावाचा भाग होते तिथेच वसंत नारगोळकर आणि कुसुम नारगोळकर ह्या ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्यांनी आपल्या आश्रमाची स्थापना केली. त्यांचे 'जंगलचे राजे' हे पुस्तक त्या काळातील वारली समाजाचे इत्यंभूत चित्रण घडवते (१९५५). अशाच प्रकारचे मुलभूत मानवशास्त्रीय काम श्री. खंडेराव सावे ह्यांनी केले. एक कार्यक्षम सरकारी अधिकारी म्हणून तर त्यांनी आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण केलेच पण वारली समाजावर उत्तम प्रतीचा प्रबंध लिहून अभ्यासकांची कायमची गरज भागवली. हा प्रबंध पुढे 'द वारलीज' ह्या नावाने पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाला. त्याचे मराठी भाषांतर कॉन्टीनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे (१९९६).

हे शैक्षणिक आणि रचनात्मक काम होत असताना बोर्डी डहाणू भागात संघर्षात्मक कामही मोठ्या प्रमाणावर झाले. ब्रिटिश सरकारकडून आणि सावकार-जमीनदारांकडून होणाऱ्या शोषणाविरूद्ध आदिवासींचा असंतोष फक्त दबल्या हुंदक्यांच्या स्वरूपातच प्रकट होत असे. पण त्या असंतोषाला १९४० च्या दशकात कॉम्रेड शामराव परूळेकर आणि गोदावरी परूळेकर ह्यांनी वाट करून दिली. कम्युनिस्ट विचारांच्या ह्या कार्यकर्त्यांनी आदिवासी माणूस जागा करण्याचे काम केले जो आदिवासी समाज अनेक वर्षे अन्यायाची शिकार होत होता त्याला जागृत आणि संघटित करून अन्यायाविरूद्ध ताठ उभे राहायला ह्या कार्यकर्त्यांनी शिकवले. ह्या परंपरेचा धागा, नंतर डहाणू-पालघर तालुक्यात उभ्या राहिलेल्या भूमीसेना, कष्टकरी संघटना ह्या आदिवासींच्या लढाऊ संघटनांनी उचलला. शासन, पोलीस, स्थानिक पुढारी आणि जमीनदार ह्यांच्या दडपशाहीला सामोरे जाऊन आणि अत्यंत हालअपेष्टा सोसून आदिवासींना जागृत करण्याचे फार मोठे काम ह्या संघटनांनी केले. त्यांचे मुख्य योगदान म्हणजे त्यांनी जमिनीसारखा मुलभूत मुद्दा ऐरणीवर आणला. आज ह्या भागातला वारली समाज जो ताठ मानेने चालतो आणि स्वत:चा विकास करायला धडपडतो त्याचे मुख्य कारण ह्या संघर्षात्मक कामाने केलेली जागृती हे आहे. सुरवातीला कार्यकर्त्यांच्या पातळीवर ह्या लढाऊ

कामाचा आणि गांधीवादी रचनात्मक कार्याचा संघर्ष जरूर झाला. पण वारली जनतेने मात्र आपल्या जीवनात ह्या दोन्ही प्रवाहांची सांगड घालून त्यांना एकमेकांच्या पूरक बनवले.

अशा रितीने राष्ट्रभक्तीची, औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाची, सर्वोदयाची, रचनात्मक कार्याची, कृषी विकासाची आणि संघर्षाची अशा विविध परंपरा बोर्डी परिसरांत निर्माण झाल्या आणि कालांतराने त्या एकमेकांत मिसळून त्यांचा एक ताकदवान प्रवाह निर्माण झाला. सामाजिक कार्याच्या अभ्यासकाला स्तिमित करणारे हे दृश्य आहे. अशा विविध परंपरा एखाद्या ठिकाणी निर्माण होतात, वाढतात आणि एकमेकांना पूरक ठरतात ही एकाच वेळी अतिशय आश्चर्यकारक आणि आश्वासक घटना आहे.

म्हणून बोर्डीच्या किनाऱ्यावर जो कल्पवृक्ष उभा आहे तो म्हणजे चिक्कूचे झाड नाही. त्या झाडापेक्षा विशाल, त्यापेक्षा दणकट आणि त्यापेक्षा कनवाळू असा तो समाजवृक्ष आहे. त्या समाजवृक्षाची जोपासना अनेक ज्ञात आणि अज्ञात कार्यकर्त्यांनी आपला घाम, अश्रू आणि प्रसंगी रक्त शिंपून केली आहे. चिक्कूचे झाड पाच - दहा वर्षात तयार होते पण समाजवृक्षाची जोपासना मात्र पिढ्यान्‌पिढ्या करावी लागते. तेव्हा कुठे एखादे लहानसे फळ त्याला लागते. बोर्डीमधल्या कार्याचा हाच निष्कर्ष आहे.

● ● ●

## - संदर्भ -


१. देशपांडे, स. ह.; शरद कुलकर्णी, वसंत देशपांडे, (१९७८). **'कोसबाडच्या आसपास'** मौज **दिवाळी अंक.**

२. नारगोळकर, कुसम वसंत नारगोळकर (१९५५). **'जंगलचे राजे'** श्री. मौनी विद्यापीठ, गारगोटी (जि. कोल्हापूर)

३. परूळेकर, गोदावरी (१९९२). **'जेव्हा माणूस जागा होतो'** (पाचवी आवृत्ती) मौज प्रकाशन, मुंबई.

४. पाटील, जयंत (१९९२). **'माझे ग्रामपुनर्रचनेचे प्रयोग'** कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

५. पाटील, जयंत (१९९७). **'बोर्डीचे स्वातंत्र्य सैनिक'** (संयोजित) स्वातंत्र्य सैनिक पुस्तक प्रकाशन समिती, बोर्डी (जि. ठाणे).

६. पाटील, जयंत (१९७८). **'आदर्श गाव बोर्डी'** प्रकाशक डॉ. जयंतराव पाटील, बोर्डी.

७. भिसे, शं. रा. (१९७१). **'जंगलातील छाया'** साधना प्रकाशन, पुणे.

८. सावे, खंडेराव (१९९६). **'वारली'** कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

# कोसबाड आणि आसपास

स. ह. देशपांडे, शरद कुलकर्णी, वसंत देशपांडे

कोसबाडच्या टेकडीवर उभं राहून एखाद्या शांत वेळी पश्चिम बाजूच्या खालाटीकडं पाहिलं तर तिथं फक्त समुद्रापर्यंत पसरत गेलेली तुरळक झाडी दिसते. वारली त्या झाडीमागं लपलेले आहेत.

एका जगड्व्याल आर्थिक परिवर्तनानं बेसावध वारल्याला शोषणाच्या कराल चक्रात ओढून घेतलं आहे. असं झालं नसतं तर तो लपलेलाच राहिला असता. अजूनही तो लपायचाच प्रयत्न करतो.


हा 'लपलेला' वारली माणूस शोधायचा आम्ही तिघांनी थोडासा प्रयत्न केला. त्याच्या शोधात केव्हा कोसबाडची टेकडी, तर केव्हा तळाशी चौफेर पसरलेले आजूबाजूचे पाडे पाहिले. अनेक वेळा खालचे प्रश्न डोक्यात घेऊन आम्ही टेकडीवर येत असू आणि काही उत्तरं आणि बरेचसे नवे प्रश्न पुन्हा डोक्यात वागवीत खाली पाड्यांमध्ये उतरत असू. तसा कुठला माणूस कुणाला कळतो ? मग वारली आम्हांला गवसला नाही याचं आश्चर्य वाटायला नको. पण त्या शोधाचीच आम्हांला चटक लागल्यासारखी झाली.

## १. 'जंगलचे राजे' (!)

आम्ही आमचे प्रश्न घेऊन ज्यांच्याकडं जातो त्या ह्या भागात बद्धमूल झालेल्या दोन संस्था आहेत. आणि आमचेच नव्हे, तर सभोवारच्या आदिवासी जनतेचे सनातन आणि चिवट प्रश्न सोडवण्याचा त्यांचा निरंतराचा प्रयत्न चालू आहे. गोखले एज्युकेशन सोसायटीची 'कृषि-शिक्षण संस्था' गेली एकोणतीस वर्षं आधुनिक शेतीशास्त्राचा प्रसार करण्यासाठी ह्या टेकडीवर उभी आहे आणि तिच्याच शेजारी, वरच्या अंगाला, नूतन बाल शिक्षण संघाचं 'ग्राम बाल शिक्षा केंद्र' बालवाड्या आणि संलग्न विद्यालयं चालवीत विसांहून अधिक वर्षं आदिवासी बालकांच्या शिक्षणाचं काम करीत आहे.

'ग्राम बाल शिक्षा केंद्रा' च्या अनुताई वाघ आणि त्यांचे सहकारी आप्पा कोसके, कदम गुरुजी, वासंतीताई शेट्टी, वसंत पाटील, शकूताई फाटक, द्वारकाताई पाटील, आप्पा अमृते, त्याचप्रमाणं 'कृषि-शिक्षण संस्थे'चे जयंतराव पाटील, अविनाश चौधरी, एम. एम. गुप्ते, डॉ. एन. व्ही. मोडक, अनिल चौधरी, अर्जुन सिडवा उराड्या, भिकाजी सापटे, अनंत हरिश्चंद्र सखे - हे आणि अनेक, यांवर आम्ही वेळोवेळी प्रश्नांच्या फैरी झाडल्या, वारली शेतकऱ्यांशी बोललो, त्यांची शेतं पाहिली. संस्थांची दप्तरं चाळली, त्यांचे इतिहास धुंडाळले, प्रेरणा अजमावल्या, वारल्यांविषयीचं वाङ्मय नजरेखालून घातलं, वारली कसा आहे, बदलतो आहे का, कसा बदलतो आहे हे पाहायचा एक छोटासा यत्न केला.

''बामणाच्या जन्माला जाशी,
त लिखु लिखु मरशी;
महारवाडी होशी,
त तोलु तोलु मरशी,
चमार होशी,
त नाड्या-जोती करू मरशी;
पन वारल्याच्या जन्माला जाशी,
त जंगलाचा राजा होशी !''



असं वारल्यांचं एक प्रसिद्ध लोकगीत आहे. पण ह्या गीतात ध्वनित होणारा उन्माद फसवा आहे. आजचा वारली कसा आहे ? हाडं पोखरणारी गरिबी, रोगराई, भयानक अज्ञान, अंधश्रद्धा, सदोदित धास्तावलेलं मन, अविवेक, आपल्या उन्नतीच्या विचारांची संपूर्ण उपेक्षा, कसल्याच उभारीचा अभाव ह्या त्याच्या जन्मखुणा ठरल्यासारख्या झाल्या आहेत. त्याच्या मनुष्यपणाचा जीवनरसच आटला आहे.

हा तथाकथित 'जंगलचा राजा' खरं म्हणजे 'चिंध्या-चिरगुटांचा राजा' आहे. पारलौकिक जीवनात तो उग्र आणि तऱ्हेवाईक दैवतांचा, भुतांचा आणि भुताळ्यांचा - चेटकिणींचा - गुलाम आहे; ऐहिक जीवनात तो जमीनदार, सावकार, व्यापारी, पोलीस मुलकी अधिकारी ह्यांचा - थोडक्यात, तुम्हाआम्हा सर्व (त्याच्याच शब्दात सांगायचं तर) 'ढवळ्या' माणसांचा, म्हणजे त्याच्या अर्थानं 'सुसंस्कृत' समाजाचा, गुलाम आहे.

महाराष्ट्रात आज घटकेला सुमारे चाळीस लाख म्हणजे लोकसंख्येच्या सहा टक्के आदिवासी आहेत. ह्या चाळीस लाखांपैकी सुमारे आठ लाख म्हणजे वीस टक्के ठाणे जिल्ह्यात आहेत. ठाणे जिल्ह्यातले मुख्य आदिवासी म्हणजे वारली, मल्हार कोळी, ठाकूर आणि काथोडी. हे सर्व मिळून ठाणे जिल्ह्याच्या सुमारे बत्तीस लाखांपैकी पंचवीस टक्के होतात. ह्यांतले चाळीस टक्के म्हणजे तीन-सव्वातीन लाख वारली आहेत.

कोसबांड हा कैनाड गावाचा एक पाडा आहे आणि कैनाड पश्चिम किनारपट्टीला लागून असलेल्या डहाणू तालुक्यात आहे. डहाणू तालुक्यात आदिवासींची वस्ती साठ टक्के आहे, तर कैनाड गाव व पाडे मिळूनच्या प्रदेशात ऐंशी टक्के आहे. हे बहुतेक जण वारली आहेत. काथोडी आणि माडिया सोडले तर वारली सर्व आदिवासी जमातीत मागासलेले समजले जातात.

सर्वसाधारण वारली कुटुंब, वरकस धरून साडेतीन-चार एकरांच्या तुकड्यांवर भाताचं खरीपात एक पीक घेतं. हे चारसहा महिने पुरतं. एरव्ही बहुधा भाताची किंवा नागलीची पातळ आंबील, जमिनीतले अर्धविषारी, कडू कंद, बारीकसारीक शिकार, क्वचित उंदीर-घुशी-घोरपडी, एखाद्या वेळी झाडपाला यांवर निर्वाह. बियांसाठी भातही सावकाराकडून. सावकारीचा विळखा भुजंगासारखा. पावसाळ्यात सुरूवातीस एक पोतं घेतलं तर भात निघाल्यावर दोन, अडीच, वेळेस तीन पोती परत द्यायची. व्याजाचा हा दर मोजला तर दरसाल दरशेकडा सहाशे पर्यंतही एखाद्या वेळी जातो ! लग्नासाठी पिढ्यान् पिढ्या सावकाराच्या शेतावर नवरा-बायकोंनी राबून ते फिटायची वाट पाहायची. फिटत नाहीच. वीस-वीस वर्ष झाली तरी बाकी उरतेच. सावकार लुबाडणार, व्यापारी लुबाडणार, पोलीस लुबाडणार, जंगलखात्याचे आणि इतर मुलकी अधिकारी लुबाडणार, कोळशाच्या भट्ट्यांचे कंत्राटदार लुबाडणार. सावकार-जमिनदार एखाद्यावेळी बांधून ठेवणार, मारहाण करणार. बायकांची अब्रू तर वेशीवरच टांगलेली.

आता बहुतेक वारली पुरूष अर्धी चड्डी आणि सदरा घालतात; पूर्वी लंगोटी आणि बंडी असे. बायका लांडं लुगडं नेसतात, चोळी घालतात. राहायला कुडाची शेणानं सारवलेली अंधारी झोपडी, तीतच (असल्यास) जनावरं.

शिक्षणाच्या नावानं जवळजवळ अंधार. सर्वसाधारण आदिवासीपेक्षाही वारल्यांमध्ये साक्षरतेचं प्रमाण कमी आहे. एकूण आदिवासी सुमारे बारा टक्के तर वारली सुमारे आठ टक्के (पुरूष चौदा टक्के, स्त्रिया दीड टक्का) अगोदर शाळांची संख्या कमी. बहुतेक शाळा एक-शिक्षकी. वर्षभर शिक्षक आणि विद्यार्थी यांचा लपंडाव चाललेला असतो.

वारल्यांना मोजणं, हिशेबठिशेब याचं ज्ञान नाही. फार तर वीसपर्यंत मोजायला येतं. कुणालाही आपली जमीन किती हे सांगता येत नाही, अनेकांना 'मुलं किती' विचारलं तर पटकन सांगता येत नाही. ह्या गणनहीनतेचा फायदा व्यापारी आणि सावकार बरोबर उठवतात.

मुलांची पोटं फुगलेली आणि हातापायाच्या काड्या. अंग खरजेनं लडबडलेली मुलं, साठ टक्के तरी असावीत. आजारावरचा वारल्याचा उपाय म्हणजे 'भगता'कडं जाणं.

एकूणच आदिवासी इतका भयग्रस्त असतो की तो तुमच्याआमच्या थाऱ्याला सहसा उभा राहणार नाही. आदिवासींविषयी बोलताना एक गोष्ट नेहमी सांगितली जाते : एक सरकारी अधिकारी एका पाड्यावर गेला असताना एक माणूस धूम पळत जाताना त्याला दिसला. तो का पळतो आहे हे अधिकाऱ्याला कळेना. बरोबरच्या माणसांना त्यानं त्याला पकडून आणायला सांगितलं. त्यांनी त्याला पकडून आणून अधिकाऱ्यापुढं उभा केला. चौकशी केल्यावर असं निष्पन्न झालं की, केवळ सरकारी अधिकारी बघताच तो पळून चालला होता, पण हाच माणूस एरवी वाघ मारण्यात पटाईत होता !

ही भीती हाडीमांशी इतकी खिळलेली आहे की मुलांचं नाव ठेवण्याच्या वेळी त्याला झोळीत घालून वारली आई गाणं म्हणते : ''सरकार-दरबारा बिहजा

नोको.'' - 'सरकार-दरबारला भिऊ नको.' आणि एरवीही लहान मुलाला भीती दाखवताना आई त्याला 'ढवळ्या' माणसाचीच भीती दाखवते.

एका काळी, वेळप्रसंगी एखाद्या वारल्याला कोळशाच्या भट्टीत फेकून देण्याइतपत सावकार-कंत्राटदार वारल्यांवर अत्याचार करीत. शंभर-सवाशे वर्षांपूर्वी सगळ्या जमिनी वारल्यांच्याच ताब्यात होत्या, त्या सावकारांनी गिळंकृत केल्या. जबर व्याज उकळलं. आदिवासींची अन्नान्नदशा केली आणि त्यांच्या बायका मुली हव्या तशा वापरल्या.

असं झालं म्हणजे बिगर-आदिवासी गावांत एखाद्या वेळी तरी एखाद्याचा हात वर जातो किंवा तो जरा गुरकावू लागतो. किंवा चार जण संगनमत करतात आणि कायदा हातात घेतात. भारतातल्या इतर भागांत मधूनमधून होणाऱ्या एखाददुसऱ्या सावकाराच्या खुनामुळं सावकार थोडे तरी वचकून असत असं आर्थिक इतिहासात लिहिलेलं असतं. पण वारल्यांची मान अनेक पिढ्यात एकदाही वर झाली नाही - मग हात तर राहू द्याच. वाट्याला येईल ते शांतपणे भोगणं एवढंच त्याला माहीत.

हा वारली स्वत्व विसरला आहे. असं तरी कसं म्हणावं ? व्हेरिअर एल्विननं आदिवासींना 'धैर्याला आचवलेले' असं म्हटलं आहे, आणि ही धैर्यहानी तथाकथित सुसंस्कृतांनी केलेल्या शोषणातून निर्माण झाली, असं त्याचं म्हणणं आहे. पण ह्याचा अर्थ एके काळी त्यांच्यात तडफ होती, धैर्य होतं, स्वाभिमान होता असा होतो. पण ह्या गृहीत कृत्याचीच शंका वाटते.

'जंगलचे राजे' ह्या पुस्तकात वसंत नारगोळकर तर म्हणतात की, वारल्यांना स्फूर्तिदायक इतिहासच नाही. त्यांची एक लोककथा अशी आहे : वारल्यांचं एका काळी मोठं राज्य होत. तिथं एक ब्राह्मण आला तेव्हा वारली राजानं त्याचा सत्कार केला आणि ''तुला काय दक्षिणा देऊ ?'' असं विचारलं. ''फक्त बैलाच्या कातड्याएवढी जमीन दे'' असं ब्राह्मणानं सांगितलं. राजा ''हो'' म्हणाला. पण ब्राह्मणाचं बैलाचं कातडं एवढं वाढत गेलं की त्यात वारली राजाची सगळीच जमीन ओढली गेली. फसवलं जाऊन जमीन हरवून बसणं हा वारल्यांचा, त्यांच्याच लोककथांत ग्रथित झालेला पुरातन इतिहास आहे आणि ह्या इतिहासाची पुनरावृत्ती तर वारंवार झालेली आहे.

आणि एकूणच वारली माणसाची स्वत:बद्दलची कल्पना त्याच्या जन्माला उभारी देणारी नाही असं अनेकदा जाणवतं. खंडेराव सावे 'वारलीज*' ह्या ग्रंथांत लिहितात की, आपण सर्वांत निकृष्ट जमात असून परमेश्वरानं आपल्याला सगळ्यांत शेवटी निर्माण केलं अशी त्यांची समजूत आहे. ''आम्हांला करून देवानं पीडा 'वारून' टाकली म्हणून आम्ही 'वारली.''

हा कमीपणाचा भाव वारल्यांच्या किती रोमरोमी भिनलेला आहे याचं जणू प्रत्यंतरच म्हणजे त्यांची नावं. नाव ठेवणं म्हणजे व्यक्तित्वाचा गौरव करणं असा काही प्रकार इथं नाही. किंवा 'हा इतरांपासून वेगळा' अशा विशिष्टीकरणाचा त्यात भाग नाही. दिसायला बारीक म्हणून 'बारक्या', पातळ म्हणून 'पतल्या', नवसानं झालेलं मूल म्हणून 'नवशा' किंवा 'नवशी', मंगळवारी झालं म्हणून 'मंगळ्या' किंवा 'मंगळी', चैत्रात झाली म्हणून 'चैती', ज्येष्ठात झाली म्हणून 'जेठी'. आणि ही जवळजवळ सामान्य नामंच असल्यानं एखाद्या पाड्यात एकाच नावाची अनेक माणसं दिसून येतात. खंडेराव साव्यांनी मुलामुलींना सर्वसाधारणपणे देण्यात येणाऱ्या नावांच्या याद्या दिल्या आहेत. या याद्या पान-अर्धा पान भरतील एवढ्याच आहेत. या तुटपुंज्या नामावळीवरच वारली पिढ्यान्‌पिढ्या निर्वाह करीत आले

आहेत. मजा अशी की, देव-देवतांची नावं ठेवायची सार्वत्रिक पद्धतही वारल्यांच्यामध्ये नाही.

बहुतेक आदिवासी जमाती आळशी आहेत अशी त्यांच्याविषयीची तक्रार आहे. 'मडक्यात दाणा तर भील उताणा' अशी त्यांच्याविषयीची म्हण आहे. वारल्यांविषयी त्यांच्यात काम करणारी मंडळी असंच सांगतात.

असं का हे सांगणं कठीण आहे. कदाचित असं असेल की देवदेवता, भुतंखेतं आणि हडळी ह्यांनी नियंत्रित असलेल्या जगात माणसाच्या प्रयत्नाला कसली प्रतिष्ठा ?

कदाचित एके काळच्या स्वतंत्र वन्य जीवनाचं वारंही त्यांच्या रक्तात अजून खेळत असावं. शिकार सोडून स्थायी शेतकी पत्करल्याला वारल्यांना खरं म्हणजे खूप काळ झाला असला पाहिजे. त्यांच्या लेखी धरतरी (धरित्री), गावतरी (गायत्री) आणि कणसरी (भाताची लोंबी) ही देवतत्त्वांची रूपं आहेत. भात त्यांना पवित्र आहे. भूमीतून उत्पन्न झालेलं 'नवं' खाणं हे ते दर हंगामात समारंभानं करतात. तरीही एकच पीक देणाऱ्या जमिनीशी जितकं त्यांचं नातं तितकंच डोंगरदऱ्या आणि जंगलांशीही आहे. आता शिकार करायला प्राणी फारसे उरले नाहीत. पण अजूनही एखाद्या उडत्या पाखराला दगड मारून खाली पाडण्याच्या उद्योगात वारली पोरगा रानावनातून तासनतास वणवण हिंडतो; एखाद-दुसरा मासा पकडण्यात हवा तेवढा वेळ घालवतो; पण एकाच ठिकाणी मन लावून काम करायला त्याचं मन घेत नाही. पारध संस्कृतीच्या ह्या खुणा अजूनही दृग्गोचर होतात. एखादा उंदीर वसतिगृहात दिसला की आदिवासी विद्यार्थी वीरश्रीनं त्याच्यावर तुटून पडतात आणि त्याला मारला की जल्लोष करतात.

वारल्यांच्या आळसामागं त्यांची युगायुगांची उपासमारही असू शकेल. किंबहुना य:कश्चित उंदरावर हल्ला करताना 'हा आपलं धान्य पळवणारा शत्रू' अशीही त्यांची वृत्ती असेल.

पण वारली काम करीत नाही त्याचं आणखीही कारण आहे, ते म्हणजे 'सूर' - म्हणजेच दारू.

सर्वच आदिवासी जमाती पितात, आणि भरपूर पितात. सिमिंग्टन म्हणतात, ''दे ड्रिंक ॲज ए रेस !'' दारू त्यांचं विश्व व्यापून दशांगुळं उरलेली आहे. लग्न दारूशिवाय होत नाही. जातपंचायत दारूशिवाय बसत नाही, मर्तिक दारूशिवाय पार पडत नाही. मूल जन्माला आलं की त्याच्या तोंडात दारूचे थेंब घालतात - आणि माणूस मेलं म्हणजे त्याच्याही.

पूर्वी दारू म्हणजे बहुधा नुसतीच ताडी असे. ती फार मादक नसते आणि तिच्यात पोषणाचा काही अंश असतो. पण आता काळा गूळ आणि नवसागर ह्यांच्या मिश्रणातून अनेक पाड्यांवर घरगुती भट्ट्या चालतात. ही दारू खरं म्हणजे विषारीच आहे. त्यातून आदिवासींच्या आरोग्याला घोर अपाय निर्माण झाला आहे. हा काळा गूळ कायद्यानं माणसाला 'अखाद्य' म्हणून ठरवला आहे, पण वाणसामानाच्या दुकानांमधून तो 'जनावरांचं खाद्य' अशी पाटी लावून विकला जातो आणि गूळ घेतल्याबरोबर मागणीची वाट न पाहताच वाणी नवसागराची आधीच बांधून ठेवलेली पुडी गिऱ्हाईकाच्या स्वाधीन करतो.

हे विष किती भिनलं आहे ह्याचा प्रत्यय आम्हांला एका विदारक रीतीनं यायचा होता. चिंबाव्याच्या बालवाडीत एक दोन-अडीच वर्षांची मुलगी चूल, पातेलं, चिमटा अशी छोटी-छोटी खेळणी घेऊन त्यांच्याशी खेळत होती. तिच्या जवळ जाऊन आम्ही

लाडिकपणानं विचारलं, "काय करतेस ?" ती म्हणाली, "दारू करती."

अनुताई म्हणाल्या, हे काहीच नाही. सातवीच्या परीक्षेला बसलेल्या एका हुशार वारली मुलीनं 'परीक्षा झाल्यावर काय करणार ?" ह्या विषयावरचा निबंध म्हणून आपण दारूची भट्टी कशी चालवू याचं साग्रसंगीत वर्णन केलं होतं.

अनेक आदिवासींप्रमाणं वारलीही क्षणजीवन जगणारा आहे. त्याला उद्याची चिंता नाही. वाघ जसा एकदा शिकार मिळाल्यावर खाऊन पुन्हा भूक लागेपर्यंत सुस्त राहतो तशीच काहीशी स्थिती या वन्य जमातीची आहे असे साव्यांचे उद्गार ऐकले. एकदा भात आलं की ते खूप खातात. पुढं त्यांना अनकेदा फाके मारावे लागतात. पण वारली निष्काळजी. तो गातो : "मार मसाला न पे सूर, पाणी (पाऊस) आहे घणा दूर."

पण भूक पोटात वागवूनही तो आनंदी असतो असं ह्या भागाचं ज्ञान असणारे अनेक लोक सांगतात. मनोर तालुक्यात गरवाशेत गावी दीड वर्ष राहिलेला मुंबई विद्यापीठाचा स्वयंसेवक रंगराव गिरिगोसावी एकदा म्हणाला होता, " सर, हे लोक इतके आनंदी आहेत की आपणच त्याच्यामागं शुक्लकाष्ठ लावून देतोयत की काय असं वाटायला लागतं."

मागं वारल्यांच्या मर्यादित गणनशक्तीचा उल्लेख आला आहे. वारल्यांना भात मोजता येत नाही, जमीन मोजता येत नाही, मग ते काळ तरी कसा मोजणार ? ह्या कालमापनाच्या अभावाचा आणि त्यांच्या निष्काळजी वृत्तीचा संबंध असेल काय ?

आपण सुशिक्षित लोक कुठल्या वर्षी आपण निवृत्त होणार, त्या वेळी मुलाला नोकरी लागलेली असेल काय, मुलगी अमक्या साली लग्नाला येईल,इत्यादी प्रकारचे हिशेब करून आपल्या गृहस्थितीचं नियोजन करतो. समाज म्हणूनही आपण आपल्या भविष्याचा वेध घेतो आणि पंचवार्षिक, पारिप्रेक्षिक (परस्पेक्टिव) इत्यादी योजना तयार करतो; पेट्रोलियमचे किंवा दगडी कोळशाचे साठे कोणत्या साली संपुष्टात येणार आहेत, पर्यायी ऊर्जा कशी मिळवावी याचा आज विचार करू लागतो. आपली ही सर्व विचारप्रक्रिया 'विवेकी' (रॅशनल) आहे आणि तिला प्रेरणा देणारा मूळ घटक म्हणजे आपणाला बराच प्रखरपणानं भासमान होणारा, क्वचित आपल्या आशा उद्दीपित करणारा, क्वचित आपणाला चिंताग्रस्त करणारा पुढचा 'काळ' असतो. आदिवासींना हा भविष्यकाळ फारच अंधुकपणानं दिसतो. त्यांच्यावर त्याचं दडपण नसतं. आनंदी असतात, रात्ररात्र तारप्याच्या सुरावर नाचू शकतात. पण त्यांच्याजवळ कालमापन नाही, म्हणून विकासाची प्रेरणा नाही. पडत्या काळासाठी बेगमी करावी, चार घास अधिक खावे, अंगभर बरा कपडा ल्यावा, मुलांना शाळेत घालावं - इत्यादी संदेश त्यांच्यापर्यंत अजून पोचत नाही. विकास-कार्यकर्ता इथं हतबुद्ध होतो. की ह्या आनंदाचा उगम व्यक्तित्वहीनतेत आहे ? आपण 'कुणीतरी' आहोत असं वाटायसारखी भोवतालची परिस्थिती नाही आणि अभिमानानं वागवावं असं नाव ही नाही ! 'बरा बिचारा ठणठणपाळ' असं झालं की उरलंसुरलं दडपणही गेलं. मग आला क्षण पकडावा आणि नाचनाचून कैफ चढवून घ्यावा किंवा 'सूर' पिऊन बेहोष व्हावं.

विकासाचा विचार करताना असं ध्यानात येतं की संघटित प्रयत्नांनाही वारली भूमी प्रतिकूल असावी. इतर जातीत आपल्या समाजाशी जी बांधिलकी आढळते तीही त्यांच्यात दिसत नाही. ह्याचं एक कारण असं की,

बहुतेक वारली पंधरावीस झोपड्यांच्या लहानलहान पाड्यांवरून राहतात. देशावरच्या जिल्ह्यातून गावकऱ्यांचे अनेक भावपुंज 'गाव' ह्या संकल्पनेशी जोडलेले असतात. गाव हा सामूहिक अभिमानाचा विषय असतो आणि हे एकात्म्य कधीकधी संघटनेसाठी, विधायक कामासाठी उपयोगात आणता येतं. उलट वारली समाज फार फुटकळ आहे. दोन जवळजवळच्या पाड्यांवरच्या माणसांचाही एकमेकांशी फारसा संबंध नसतो. अनुताईंच्या बालवाडीत एका पाड्यावरची मुलं आली तर दुसऱ्या पाड्यावरची नाहीशी होत, हा नेहमीचा देखावा होता.

कुटुंबातले परस्परसंबंधही कोरडे असतात. लग्न झाल्याबरोबर मुलगा वेगळं बिऱ्हाड थाटतो, निदान वेगळी चूल मांडतो. म्हाताऱ्या आई-बापांची काळजी फारशी कुणी करत नाही.

१९३४ साली वारल्यांच्या संबंधी काही संघटित चलनवलन सुरू झालं अशी साक्ष इतिहास देतो. कोसबाडजवळच्या वाकीपाड्यावर पन्नास गावांमधल्या वारल्यांची एक सभा झाली असं खंडेराव सावे लिहितात. सभेत झालेल्या ठरावांची यादी त्यांनी दिली आहे. गंमत अशी की त्यात एकही ठराव आर्थिक दुःस्थितीबद्दलचा नाही ! लग्न करताना ब्राह्मणाकडून मुहूर्त पाहावा, 'धवलेरी' ही लग्नाचं पारंपारिक पौरोहित्य करणारी वारली स्त्री बाजूला सारून तिच्याऐवजी ब्राम्हणाकरवी लग्न लावावं, अशा गोष्टी त्यात आहेत. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास म्हणतात त्याप्रमाणं बदल होताना खालच्या जातीचं 'ब्राह्मणीकरण' (संस्कृतायझेशन') होतं, त्याचं हे दृश्य प्रत्यंतर.

पण १९४४ साली एक वेगळ्या प्रकारची घटना घडून आली. आपण ज्यांचा उल्लेख केला आहे ते खंडेराव सावे ह्या भागात 'विशेष आदिवासी अधिकारी' होते. सरकारनं नेमून दिलेली मजुरी दिली जाते की नाही हे पाहणं त्यांचं काम होतं. आणि ती दिली जात नाही अशी तक्रार वारली जेव्हा घेऊन आले, तेव्हा ह्या सरकारी अधिकारी झालेल्या (पण मुळात बोर्डीच्या आचार्य भिश्यांच्या शाळेचा सुपुत्र असलेल्या) सरळ माणसानं सागितलं, ''काम न करण्याचा तुम्हांला हक्क आहे.'' संप ! चार गावांत संप झाला आणि हजार वारली त्यात सामील झाले. गोदावरी परुळेकरांनी आपल्या 'जेव्हा माणूस जागा होतो' पुस्तकात साव्यांविषयी अतिशय अनुदार आणि अशोभनीय उद्‌गार काढलेले आहेत. पण नारगोळकर पतिपत्नींच्या पुस्तकात साव्यांच्या प्रेरणेनं झालेल्या ह्या संपाची नोंद आहे. आणि आम्ही प्रत्यक्ष साव्यांकडून ह्या घटनेची खातरजमा करून घेतली. तेव्हा दिसतं असं की माणूस जागा झाला त्याची खरी घटका १९४४ ही आहे, १९४५ नव्हे. वारल्यांचा हा संप लहान होता, पण संपच होता आणि वारली रागवायला शिकू लागला याची ती खूण होती.

जादूची कांडी फिरावी तसं एक परिवर्तन ह्या वारल्यांमध्ये १९४५ साली घडून आलं. आणि रानावनांत एक वणवा पेटला. गोदावरी परूळेकरांच्या नेतृत्वाखाली त्यांनी उठाव केला. वारल्यानं मान तर वर केलीच, पण हातही उगारला. वारल्यांच्याच नव्हे, तर भारतातील आदिवासींच्या इतिहासात हा क्षण अत्यंत मोलाचा आहे.

आपण हिंसक प्रचार केल्याचं गोदावरीबाई नाकारतात; तसे प्रत्यक्षात झाले हेही खरं; पण आदिवासींवर पिढ्यानूपिढ्या झालेल्या अत्याचारांच्या तुलनेनं ते नगण्य समजले पाहिजेत. आज मागं वळून पाहता गोदावरीबाईंनी केलेलं कार्य, त्याच्या मर्यादा मान्य

करूनसुद्धा, मूलभूत स्वरूपाचं आहे याबद्दल आम्हांला शंका नाही. ते कार्य म्हणजे मनानं मृतवत झालेल्या वारल्यांमध्ये प्राणांची फुंक घालून त्याला सचेतन करणं, त्याची हीन आत्मप्रतिमा पुसणं आणि त्याला आत्मप्रतिष्ठा अर्पण करणं. आर्थिक विकासाचा मूलस्त्रोतही मानवी उभारीमध्येच असतो. गोदावरीबाईही आपलं देणं हेच समजतात. ''आदिवासींनी मजुरीवाढीसाठी व त्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी इतके लढे दिल्यानंतर आज आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे, उपासमार टळली आहे, असा जर समज झाला तर तो चुकीचा होईल... वारल्यांमध्ये झालेला मुख्य फरक म्हणजे त्यांची अस्मिता जागी झाली आहे... त्यांच्यातील भेदरटपणा, न्यूनगंड नष्ट झाला आहे.'' हेही परिवर्तन त्या म्हणतात इतकं आमूलाग्र आणि स्थिर स्वरूपाचं झालं आहे, असं आमच्या (मर्यादित) अनुभवावरून आम्हांला वाटत नाही. पण जे झालं ते एका अर्थानं मूलभूत स्वरूपाचं आहे.

गोदाराणीच्या बंडानं मजुरी सुधारली आणि अमानुष अत्याचारांना बराचसा पायबंद बसला. पुढं कूळ कायद्यानं आदिवासींना जमिनी मिळाल्या. पण नुसती जमीन दिल्यानं काय होतं, किंवा खरं म्हणजे काहीच कसं होत नाही, ह्याचा उत्तम पुरावा म्हणजे वारल्यांची शेती. ती गेली हजारो वर्ष जशी असावी तशीच आज आहे. बऱ्याचश्या जमिनी नाममात्र वारल्यांकडं आहेत; पीक सावकारच घेऊन जातो. गवताच्या व्यापारातील लुबाडणूक जोरात चालू आहे. 'कंट्रोली'तील म्हणजे रेशन दुकानातील फसवणूक चालूच आहे.. सात-बाराच्या रेकॉर्डमधली अनागोंदी चालूच आहे. अजूनही बांधून मारण्याचा एखाद-दुसरा प्रकार मधूनमधून होतोच. खडकोली गावात बांधून ठेवलेल्या आदिवासीला सोडवायला गेलेल्या मुंबई विद्यापीठाच्या भीमसिंग गिरसेला सावकारानं मारल्याची घटना तीनच वर्षापूर्वीची. अजूनही एखादी मुलगी अत्याचाराला बळी पडते आणि ह्याचा बोभाटा होत नाही. अजूनही खोट्या फिर्यादित वारली अडकवले जातात. अजूनही 'शासन' अस्तित्वात असल्याच्या खुणा क्वचितच दिसतात.

शंभर वर्षापूर्वी लोकहितवादींनी एकूण आदिवासींच्या गरिबीविषयी पुढीलप्रमाणं लिहिलं आहे : '' हिंदुस्थानात काही एकच प्रकारचे लोक (नाहीत.) .. त्या सर्वात अत्यंत निकृष्टावस्थेत असलेले, सदैव पराङ्मुख आणि पूर्ण दैवदुर्विलासी असे हिंदुस्थानातले भील, कोळी, कातकरी, रामोशी, कातवडी, दुबळे, ठाकूर, वारली वगैरे जातींचे रानटी व मूढ लोक आहेत. ते बिचारे मोलमजुरी किंवा शिकार वगैरे करून पोट भरतात. या लोकांची स्थिती बघितली म्हणजे दारिद्र्यदेवतेचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखे होते. त्या बिचाऱ्यांचे दारिद्र्यवर्णनास आपली भाषा कोती किंवा असमर्थ आहे असे म्हटले तरी चालेल. ते बापडे बोलतात, चालतात, यावरून त्यांस मनुष्य म्हणावे इतकेच, बाकी त्यांची अवस्था निव्वळ जनावरांप्रमाणे आहे... मनुष्यपणाची सुखे, विलास, मजा, करमणुकी, विविध कलाकौशल्यनिरीक्षणजन्य महानंद, चार लोकांत ये-जा, यांचे त्यास नाव तरी कशाला पाहिजे ? बारा महिने तिन्ही काळ हे ईश्वराचे जीव बिनवस्त्रांनी आणि अन्नाने दिवस काढतात ! ...''

हे अजूनही खरं आहे, किंवा अधिकच खरं असावं.

ज्याचा विश्वविचार, ज्याची दैवतं, ज्याचा जगाकडं पाहण्याचा दृष्टिकोन अदिम आहे; शोषणानं ज्याची दैना उडवलेली आहे, भयाण दारिद्र्याच्या खाईत जो पडलेला आहे आणि तिच्यातून उठण्याची शक्यताच नव्हे तर इच्छाही ज्याला जाणवली नाही, ज्याच्यावर काही काळ

नवं तेज फटफटलं, पण जो पुन्हा एकदा कबऱ्या अंधाराच्या कुशीत समाविष्ट झाला आहे - असा वारली हे एक आव्हान घेऊन दोन संस्थांनी कोसबाड टेकडीवर पदार्पण केलं : १९४९ साली 'कृषि शिक्षण संस्था' आली आणि १९५७ साली 'ग्राम बाल शिक्षा केंद्र' आलं.

## २. कोसबाडची मुळं


बोर्डीला सूनाबाई पेस्तनजी हकीमजी नावाचं हायस्कूल आणि त्याच्या शेजारी शारदाश्रम नावाचं वसतिगृह आहे. समोरून डहाणू-बोर्डी मोटर-रस्ता जातो. रस्त्याच्या पलीकडं दृष्टी पोचेल तिथपर्यंत पसरत गेलेली लांबच लांब चिंचोळ पुळणीची पट्टी आणि तिच्या पलीकडं आकाशाच्या निळाईत अभिन्नपणे मिळालेला अथांग समुद्र.

पुळणीच्या रस्त्याच्या कडेच्या भागाला एक पार आहे. त्यावर संध्याकाळच्या वेळी दोन म्हातारे बसलेले दिसतील. हायस्कूल आणि शारदाश्रम ह्या इमारतींकडेच त्यांच्या नजरा असतात. ह्या इमारती वार्धक्यात त्यांच्या चित्तात कृतकृत्यतेचा गारवा निर्माण करीत असतील यात संशय नाही.

त्यांच्याच मागे, समुद्राच्या बाजूला एक समाधी आहे आणि जिची समाधी आहे त्या व्यक्तीच्या काळ्या पाषाणातला पूर्णाकृती पुतळा शेजारीच उभारलेला आहे. ह्या पुतळ्याची नजरही सू. पे. ह. हायस्कूल व शारदाश्रम ह्यांवर खिळलेली आहे.

ह्या दोन इमारती, हे दोन म्हातारे, हा पुतळा, ही पुळण, हा समुद्र, ही सर्व अठ्ठावन्न वर्षांपूर्वी सुरू झालेल्या इतिहासाच्या साक्षी आहेत.

दोन म्हाताऱ्यांपैकी जे अधिक वृद्ध आहेत ते अजून



कृष्णराव महादेव चित्रे

सतेज आणि तरतरीत आहेत. हे कृष्णराव महादेव चित्रे. गोरे, सडसडीत, अजूनही देखणे म्हणावेत असे. वय वर्षे ब्याऐंशी. आवाज खणखणीत. बोलणं स्पष्ट, रेखीव, मुद्देसूद.

दुसरे वृद्ध गृहस्थ म्हणजे पद्मश्री हरिश्चंद्र गोपाळ पाटील. वय सत्तर, म्हणजे तसं फार नाही. पण श्रांत दिसतात. हे तर समोरच्या शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, पुढे शाळा चालवणाऱ्या संस्थेचे आजीव सेवक.

पुतळा शंकर रामचंद्र भिसे यांचा. ही शाळाच नव्हे तर हा सर्व परिसर, ह्यातले विद्यार्थी व बिनविद्यार्थी, वाडवळ व मांगेले, दुबळे-ठाकूर-वारली-कातकरी, डहाणू तालुका, पालघर-उंबरगाव तालुके, सर्व ठाणे जिल्हाच इत्यादी परिसरावर पाखर घालणारा शंकर रामचंद्र भिसे हा निर्मम, निरहंकारी सर्वोदयी यती.

हे सर्व पाहायचं याचं कारण कोसबाडची मुळं इथं आहेत. शाळा १९२० साली निघाली. चित्रे पुढच्याच वर्षी, त्यांच्या वयाच्या चोविसाव्या वर्षात असताना इथं आले आणि मुख्यत: वसतिगृहाला त्यांनी इतकं वाहून घेतलं की अजूनही ते तिथंच आहेत. विद्यार्थ्यांच्या पिढ्यान् पिढ्यांना त्यांचा मायेचा हात अजूनही आठवतो, पण त्या हेही सांगतात की, चित्रेगुरुजी शिस्तीलाही चोख होते.

पारशी नाव असलेली ही शाळा स्वातंत्र्य चळवळीच्या काळात धगधगत होती. चित्रे गुरूजींना मनानं त्या काळात जायला फार आवडतं. ''बेचाळीसच्या लढ्यात या शाळेचे निम्मे शिक्षक आणि शंभर विद्यार्थी तुरुंगात होते. पन्नास हत्यारी पोलिसांचा कित्येक महिने शाळेवर कडक पहारा होता.'' बोलता बोलता चित्र्यांचा डावा हात आवेशाने पुढं येऊ लागतो. 'एल्गार', 'हमला' ह्या शब्दांनी जसं आपण मध्ययुगीन लढाईच्या गदारोळीत जातो तशी चित्र्यांच्या तोंडच्या 'वॉरंट', 'डिटेन्शन' ह्या शब्दांनी अर्वाचीन काळच्या स्वातंत्र्ययुद्धाची चित्रं आपल्या मनात उमटू लागतात.

चित्रे म्हणाले, आचार्यांना मी विचारलं, ''आपण सगळेच तुरुंगात गेलो तर शाळेचं काय ? आचार्यांनी सांगितलं, 'हा शेवटचा लढा आहे. शाळा बंद पडली तर दुसरी काढू !''

चित्रे इतके ज्येष्ठ, की संस्थापकांपैकीच एक म्हणायला हरकत नाही. हरिश्चंद्रराव (जन्म : १९०८) शाळेचे, चित्र्यांचे व भिश्यांचे विद्यार्थी. हरिश्चंद्ररावांना वकील व्हायचं होतं, पण आचार्यांनी सांगितलं, आपल्या शाळेला शेतीशिक्षकाची जरूर आहे. झालं. हरिश्चंद्रराव १९३१ साली कृषी पदवी घेऊन शाळेतल्या मुलांना शेतीचे धडे देऊ लागले.

आचार्य भिसे शाळेचे शिक्षक आणि प्राचार्य होते त्या काळात मुलांना हरिजन वस्तीत, आदिवासी वस्तीत हिंडवून आणीत. कोसबाडच्या आसपासचे आदिवासी हेच पुढं हरिश्चंद्ररावांचंही जीवितकार्य झालं. १९४९ साली ते कृषिशिक्षण संस्थेचे संचालक झाले. १९६८ साली निवृत्त झाले. कोसबाडच्या कृषिसंशोधनाचा आणि विकासकार्याचा पाया यांनी घातला.

हरिश्चंद्र पाटलांची महत्त्वाची देणगी म्हणजे जपानी भातशेती. १९५२ साली भारत सरकारच्या एका शिष्टमंडळात अण्णासाहेब सहस्रबुद्धे आणि प्राणलाल कापडिया ह्यांच्या समवेत ते जपानला गेले आणि तिथल्या भातशेतीचं तंत्र त्यांनी आत्मसात केलं. परत आल्यावर पायाला भिंगरी लावल्यासारखं हिंडून ह्या नव्या तंत्राच्या प्रसारासाठी त्यांनी भारतभर दौरा केला. हरिश्चंद्रराव म्हणाले, ''त्या वेळी मला हे वेडच लागलं होत.''

समुद्रकिनारा सोडून बोर्डी गावाच्या अंतर्भागात गेलं की आणखी एक म्हातारे आपल्याला भेटतात : खंडेराव ज० सावे किंवा 'दादा'. जन्म १९०७. सू. पे. ह. विद्यालयाचे विद्यार्थी. सावे सरकारी अधिकारी होऊन डेप्युटी सेक्रेटरीच्या हुद्यापर्यंत चढले, पण त्यांनी सेवा केली ती जनतेची. खराखुरा सरकारी अधिकारी कसा असावा ह्याचा आदर्श त्यांनी घालून दिला. वारली समजण्यासाठी ज्यांच्या ग्रंथाचा आपण उपयोग केला तेच हे सावे.

नितळ गोऱ्या त्वचेचे खंडेराव सावे आणि दऱ्योखोऱ्यातला आदिवासी ह्यांचा काही संबंध असेल अशी बघताक्षणी शंकासुद्धा येणार नाही. पण सावे त्यांच्याशी कायावाचामने करून एकरूप झालेले होते.

१९३० साली साव्यांनी डॉ. घुर्यांच्या हाताखाली


समाजशास्त्राचं अध्ययन सुरु केलं आणि 'वारली' ह्या विषयावर प्रबंध लिहून एम० ए० मिळवली. मुंबई इलाख्यातील आदिवासींच्या भयानक शोषणाकडं आणि दारिद्र्याकडं लक्ष वेधून घेणारा जो स्पष्ट आणि सडेतोड रिपोर्ट डी० सिमिंग्टन ह्या आय० सी० एस० अधिकाऱ्यानं लिहिला त्याची पूर्वतयारी साव्यांनी केली होती. १९४१ साली 'स्पेशल ऑफिसर, ट्रायबल्स' म्हणून कुलाबा आणि ठाणे जिल्ह्यासाठी त्यांची नेमणूक झाली. जंगलातील 'कुपां'त काम करणाऱ्या कातकऱ्यांच्या हिताचं रक्षण करणं, सरकारनं ठरवून दिलेली मजुरी त्यांना मिळते की नाही यावर नज़र ठेवणं, ही त्यांची कामं होती. १९४२ साली 'स्पेशल आफिसर फॉर अबॉरिजिनल ट्राइब्ज' म्हणून नासिक, ठाणे आणि कुलाबा ह्या तीन जिल्ह्यांचं काम त्यांच्याकडं आलं.

सावे म्हणाले, ''मी कुपांना भेट देत असे आणि वारली-कातकरी कामगारांना ठरलेली मजुरी मिळते की नाही हे पाहत असे. त्यासाठी मी करारनामे, रेकॉर्डचे फॉर्म व वह्या यांची व्यवस्था केली. आदिवासींच्या तक्रारी मी प्रांत ऑफिसरच्या 'दरबारा'त मांडत असे. पण वरच्या अधिकाऱ्यांना हे आवडत नसे.

''मी जवळजवळ प्रत्येक गावात गेलो आहे. डाक बंगल्यावर राहण्याऐवजी मी वारल्यांच्या झोपडीत मुक्काम करायचा. बंगल्यावर किंवा घरी राहिलो तरी माझ्या घरी आदिवासींना मुक्तद्वार असायचं. वारली मला 'हामचा साहेब' म्हणायचे.''

१९४४ चा संप झाल्यावर रीतीप्रमाणं साव्यांची ह्या भागातून बदली करण्यात आली.

सावे हे वारल्यांचं समाजशास्त्र आणि संस्कृती ह्यांची विशेष तज्ज्ञता असलेले एकमात्र विद्वान आहेत. त्यांनी पुस्तक लिहिल्याला आज चाळीस वर्ष झाली आहेत.



**आचार्य शंकर रामचंद्र भिसे**

साव्यांना आम्ही म्हटलं, ''गेल्या चाळीस वर्षात जे काही झालं ते समाविष्ट करून आपण आपला ग्रंथ अद्ययावत करायला हवा.'' सावे म्हणाले, ''मी आता वृद्ध झालो आहे. दुसऱ्या कुणीतरी हे करायला हवं.''

कोसबाडचं मूळ पाहत आम्ही बोर्डीला गेलो होतो. ह्या तीन वृद्धांच्या रूपानं तिथला साठ वर्षांचा इतिहास अजून हयात आहे. पण ह्या मंडळींच्या प्रेरणांचा मूलस्रोत पाहायचा तर आणखी मागं गेलं पाहिजे. ह्यासाठी आपल्याला शंकर रामचंद्र भिसे आणि त्रिंबक आप्पाजी कुलकर्णी ह्यांच्या प्रतिमांचं दर्शन घ्यायला हवं.

भिसे १९१८ साली त्रिंबक अप्पाजी कुलकर्णी यांच्या गोखले शिक्षण संस्थेचे आजीव सेवक झाले. त्रिंबक अप्पाजी उर्फ काकासाहेब ह्यांनी बोर्डीला शाळा काढली. भिश्यांना तिथं जायला सांगितलं. पण भिश्यांना वाटत होतं की, आपलं कार्यक्षेत्र मुंबईच.

१९२० सालच्या सुट्टीत ते महाड-पोलादपूर भागात मजेने हिंडत असताना विसाव्यासाठी एका झाडाखाली बसले तेव्हा जवळच्याच एका थडग्याकडं त्यांचं लक्ष गेलं. ह्या भागातल्या कुष्ठरोग्यांसाठी झगडणाऱ्या एका मिशनऱ्याची समाधी होती. भिश्यांना वाटलं, हजारो मैलांवरून आलेला हा माणूस डोंगरकपारीतल्या जंगली माणसांसाठी झिजून देहत्याग करतो आणि मीं केवळ मुंबईतून उठून बोर्डीला ग्रामीण भागात जायला कचरतोय! भिश्यांनी त्याच क्षणी बोर्डीला जायचा निर्णय घेतला.

आणि आचार्यांच्या स्पर्शानं हा सगळा परिसर तरारून आला. ह्या भागातली 'वाडवळां'ची ('वाडीवाले = शेतकरी) जमात-सोमवंशी क्षत्रिय प्रभू-जवळजवळ आदिवासींइतकीच मागासलेली आणि व्यसनग्रस्त होती. पण भिश्यांनी त्याला शिक्षणाची चव लावली. हा समाजच्या समाज शिक्षणसंपन्न आणि विकसित होण्यात भिश्यांचा फार मोठा हात होता हे त्याचं ऋण अजूनही मानलं जातं. हरिश्चंद्रराव म्हणाले, ''भिसे आमच्या गावी आले हे आमचं भाग्य !'' दादा साव्यांची कन्या आणि कृषि शिक्षण संस्थेचे आजचे प्रमुख जयंतराव पाटील ह्यांच्या पत्नी मीनाताई म्हणतात, ''आचार्य नसते तर मागासलेले राहिलो असतो.''

भिश्यांचं कर्तृत्व बहुस्पर्शी होतं. सू० पे० ह० विद्यालयामधील औपचारिक शिक्षणाबरोबर १९२० सालापासून चालू केलेलं आदिवासी शिक्षण, जंगल कामगारांच्या सहकारी सोसायट्या, १९४० पासून आदिवासी सेवा मंडळाचं कार्य, शेती आणि मूलोद्योग ह्यांचा शिक्षणात अंतर्भाव अशा विविध रूपांनी ते बहरलं. त्यांच्या प्रेरणांची फलितं म्हणजे चित्रे, हरिश्चंद्रराव, सावे, जयंतराव, आणि इतर अनेक.

भिश्यांनी साठीचा सत्कार नाकारला, 'पद्मविभूषण' नाकारलं, पंचाहत्तराव्या वाढदिवशी एकटेच जंगलात निघून गेले. कोसबाडचे अविनाश चौधरी सांगतात, ''भिसे म्हातारपणीही स्वत:ची पिशवी वा वळकटी कोणास घेऊ देत नसत. 'मला तुमची जीप नको' म्हणत व शक्यतो पायी किंवा बसने जात.''

१९७१ साली 'ॐ तत्सत्' हे शब्द म्हणत भिश्यांनी आपला सत्त्याहत्तर वर्ष समाजासाठी कष्टवलेला देह ठेवला.

भिश्यांनी एका पत्रात लिहिलं होतं :

''मी बोर्डीत आलो तेव्हा एक बिछाना व कपड्यांची एक लहानशी पेटी घेऊन आलो... हे जग सोडण्याचा प्रसंग येईल तेव्हा मजजवळची जड संपत्ती वरच्याएवढीसुद्धा नसेल. पण मी मातबर आहे की, दैवी संपत्तीची फार मोठी कमाई मी करून ठेवली आहे. तिचा वारसा मी मागीलांसाठी ठेवून जाणार.''

-भिश्यांनी खरोखरच फार मोठा वारसा मागं ठेवला.

बोर्डीचा फुलोरा म्हणजेच कोसबाड. गोखले एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक त्रिंबक अप्पाजी कुलकर्णी ह्यांचा ग्रामीण भाग, शेती, हस्त व्यवसाय यांवर जोर होता. प्रथम मुंबईच्या डी० जी० टी० हायस्कूलमध्ये आणि नंतर स० पे० ह० विद्यालयात हे विषय अभ्यासक्रमात आले. १९३९ साली आचार्यांनी खेडेगावाच्या पातळीवर शेती आणि सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करण्याची योजना चालू केली. आजच्या भारतभर पसरलेल्या 'ग्रामसेवक'चा पहिला पूर्वज बोर्डीचा म्हटला पाहिजे. राष्ट्रीय बाणा, कृषिविकास आणि गरीब व आदिवासी यांची प्रामुख्यानं कदर करण्याची वृत्ती ह्या गोष्टी आचार्यांच्या नेतृत्वाखाली जोपासण्याचं वातावरण सू० पे० ह० विद्यालयामध्ये तयार झालं. त्याचाच अविष्कार

अधिक संघटित आणि व्यापक प्रमाणावर कोसबाडच्या कृषि शिक्षण संस्थेत झाला.

भिश्यांच्या मागं गेलं की कै० त्रिंबक अप्पाजी कुलकर्णी हे थोराड बांध्याचे, उंचपुरे, देखणे, पगडीने विभूषित गृहस्थ गोखले संस्थेच्या शाखाशाखांतून तैलचित्राच्या रूपानं दिसतात. दीनदु:खितांची स्वाभाविक कणव, निरागस धार्मिक भावनेशी सदृश समाजप्रेरणा, ग्रामीण भागाकडं, शेतकीकडं आणि हस्तव्यवसायाकडं ओढ ह्या आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंचा छाप अनेक अंगांनी पसरलेल्या गोखले शिक्षण संस्थेवर त्यांनी उमटविला.

काकासाहेब कुलकर्ण्यांनी स्फूर्ती घेतली ती गोपाळ कृष्ण गोखल्यांकडून.

कृषि शिक्षण संस्थेच्या संचालकत्वाची धुरा गेली दहा वर्षं जयंतराव पाटील ह्यांच्याकडं आहे. पण जयंतरावही रोवलेलेच आहेत - एकोणतीस वर्ष, संस्थेच्या प्रारंभापासून.

जयंतराव सू० पे० ह० विद्यालयाचेच विद्यार्थी आणि हरिश्चंद्रावांप्रमाणेच वकिलीत कर्तबगारी दाखवण्याची त्यांची इच्छा. पण वडील शामराव पाटील, एके काळचे मुंबईचे मंत्री यांनी शेतीशिक्षणाकडं मन वळवलं. जयंतराव बी० एस्सी० (अॅग्री०) झाले, एम० एस्सी० पहिल्या वर्गात पास झाले. १९६२ साली 'फुलब्राईट स्कॉलर' म्हणून कान्सास स्टेट विद्यापीठात त्यांनी कृषिविस्तारशास्त्राचा व बागायती शेतीचा अभ्यास केला, १९७१ साली ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेनला त्यांनी गवत-संशोधनावर काम केलं, १९७६ साली इंग्लंडात तीन महिने तेच केलं आणि त्या गवतांच्या चाळण्या इकडं करून चार प्रकारची गवतं त्यांनी इकडच्या मातीत रुजवली.

आधुनिक ज्ञान, भिसे-हरिश्चंद्रराव-स्वामी आनंद ह्यांचे संस्कार व त्यांतून प्राप्त झालेली ध्येयदृष्टी, विलक्षण तडफ आणि संघटनकौशल्य ह्यांचा एकत्रित समुदाय म्हणजे जयंतराव.


कोसबाड ही 'महाराष्ट्रातल्या शेतीची पंढरी' आहे असं वसंतराव नाईकांनी म्हटलं होतं. अनेक अंगोपांगांनी बहरलेल्या कृषि शिक्षण संस्थेच्या ह्या रूपात जयंतरावांचा फार मोठा वाटा आहे.

आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे फार मोठ्या मानाच्या अनेक जागा साभार नाकारून हाही माणूस इथं उभा आहे.

गोपाळ कृष्ण गोखले -काकासाहेब कुळकर्णी-भिसे-हरिश्चंद्रराव-जयंतराव अशी ही वंशावळ आहे. गोखल्यांनी स्थापिलेल्या 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' मार्फतच ठक्करबाप्पांनी भारतभर आदिवासी कल्याणकार्याचा पाया घातला आणि ठाणे जिल्ह्यात ह्या दोन धारा पुन्हा एकत्र येऊन मिळाल्या. अशा रीतीनं कोसबाडच्या नैतिक संचिताचा एक भाग गोखल्यांच्या विधायक सामाजिक कर्तुत्वातून जन्म पावलेला आहे.

गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या स्फूर्तीतून निघालेल्या शैक्षणिक-सामजिक प्रवाहाला १९४५ साली प्रार्थनासमाजाच्या पार्श्वभूमीतून उगम पावलेला दुसरा एक समर्थ प्रवाह बोर्डी येथे येऊन मिळाला तो ताराबाई मोडकांच्या रूपानं. हे दोन्ही प्रवाह पुढं कोसबाडला खळाळू लागले.

कोसबाड टेकडीच्या उत्तरेच्या सगळ्यात मोठ्या उंचवट्यावर ताराबाईंची समाधी आहे. ताराबाई १९७३ साली वयाच्या एक्याऐंशीव्या वर्षी निधन पावल्या. त्यांची स्मृती ग्राम बाल शिक्षण केंद्राच्या सर्व इमारतींमधून, अकरा पाड्यांवरच्या बालवाड्यांतून



**ताराबाई मोडक**

दरवळत असते. कोसबाडच्या सभागृहात अनेक लाकडी फळ्यांवर ताराबाईंचा जीवनपट रंगवलेला आहे.

आम्ही ताराबाईंना पाहू शकलो नाही. त्यांची अनुताईंच्या आल्बममधली असंख्य चित्रं पाहिली. विजय परुळकरांनी तर इथला सगळा इतिहासच रंगीत छायाचित्रांनी साकार केला आहे. वार्धक्यात टेप केलेली ताराबाईंची भाषणं ऐकली. एका भाषणात फॅसिस्ट राजवटीत मादाम मॉटेसोरीचे कसे हाल झाले, तिनं भूमिगत राहून बालवाड्या कशा चालवल्या ह्याचं वर्णन त्या रुद्ध कंठानं करीत होत्या. दुसरं भाषण त्यांच्या सत्काराचं उत्तर म्हणून केलेलं होतं. वृद्ध ताराबाईंचा आवाज कंपित झालेला होता. लोकांनी केलेल्या प्रेमामुळं त्यांना वारंवार भरतं येत होतं. सहकाऱ्यांच्या आठवणी सांगता त्या इतक्या सद्गदित होतं होत्या की बोलता बोलता बराच वेळ थाबंत आणि पुन्हा मनाचा हिय्या करून बोलू लागत.

एवढं ऐकूनही आम्हांला धन्य झालं आणि ह्या प्रचंड कर्तृत्वाच्या तपस्विनीला आम्ही कधी पाहिलंही नाही ही रुखरूख आमच्या मनातून थोडीशी कमी झाली.

ताराबाई म्हणजे प्रार्थना समाजाचे पहिले पूर्णवेळ प्रचारक आणि 'सुबोध पत्रिके'चे संपादक सदाशिव पांडुरंग केळकर ह्यांची कन्या (जन्म : १८९२). आई उमा ही पुनर्विवाहित आणि प्रार्थना समाजाची पहिली स्त्री-सदस्या. न्यायमूर्ती रानडे, डॉक्टर भांडारकर, वामन आबाजी मोडक ही घरच्यासारखी माणसं. ओटीवर ज्यांच्या कथा निघत किंवा ज्या जवळून पहायला मिळत त्या पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ० आनंदीबाई जोशी, डॉ० रखमाबाई ह्या थोर स्त्रिया. ताराबाईंचा प्रीतविवाह झाला तोही प्रार्थनासमाजी कुटुंबात, वामन आबाजी यांचे चिरंजीव कृष्णाजी ह्यांच्याशी.

पण ताराबाईंचं वैवाहिक जीवन सुखाचं ठरलं नाही. अनेक वर्ष भयानक मानसिक यातना सहन करून अडीच वर्षांच्या छोट्या प्रभेसह ताराबाईंनी अमरावतीचं समृद्ध घर सोडलं, आणि भंगी, महार, दुबळे आणि वारली यांच्या भवितव्याशी आपल्या भग्न आयुष्याची मेख मारून टाकली.

१९१६ सालापासून क्रमाक्रमानं अमरावतीच्या गर्ल्स हायस्कूलमध्ये फर्स्ट असिस्टंट, राजकोटच्या बार्टन फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या भारतीय प्राचार्या, भावनगरजवळ दक्षिणामूर्तीला नऊ वर्ष बालशिक्षण, परत अमरावतीला हमालपुरा-चपरासीपुरा-हरिजनवाडा यांत बालशिक्षण, व प्रौढ शिक्षण, त्यानंतर बांसद्याच्या राजकुमाराला खाजगी शिक्षण, मुंबईला भंगी कॉलनीत शिशुशिक्षण, १९३६ साली दादरचा मध्यमवर्गीय 'शिशुविहार' असा प्रवास करीत करीत ताराबाईंनी १९४५ साली बोर्डी आणि १९५७ साली कोसबाड गाठलं.

ह्या प्रवासातला दक्षिणामूर्तीमधला काळ हा ताराबाईंच्या संपूर्ण परिवर्तनाचा काळ. अडीच-तीन वर्षांच्या प्रभेच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी त्या इथं आल्या आणि यजमानांची पैशानं तुडुंब वाहणारी यशस्वी वकिली व आपला भरघोस पगार सोडून नव्वद रुपयांवर त्या नऊ वर्षं इथं राहिल्या. दक्षिणमूर्तीची त्यांची प्रेरणा म्हणजे गिरिजाशंकर किंवा गिजुभाई बधेका.

ह्या तरूण वकिलानं प्रवासात मॉंटेसोरीचं बालशिक्षणविषयक पुस्तक वाचलं आणि वकिली सोडून तो मुलांत शिरला. त्यांच्याबरोबर नाचला, गायला; त्यानं चित्रं काढली, नाटकं केली, झांजा वाजवल्या, बाल गोपाळांच्या दिंड्या काढल्या. गुजराथेत लोक त्याला ''मूछवाली माँ'' म्हणू लागले.

मॉंटेसरीचा भारतातला हा पहिला उद्गाता. दक्षिणामूर्तीविषयी ताराबाईंनी लिहिलं आहे : ''इथंच मला असाध्य 'बाल' रोग जडला.''

एक दिवस दक्षिणामूर्तीच्या टेकडीवर सुखवस्तू कुटुंबातल्या शिशूंना शिकवून खाली उतरता उतरता आजूबाजूच्या दीनवाण्या झोपड्यांकडं हात करून गिजुभाई म्हणाले होते, ''ताराबेन, हजीपण आपणुं घणुं काम बाकी छे.''

दादरला असतानाच त्यांचं मन आवेगानं त्यांना ग्रामीण भागात ओढून नेऊ लागलं होतं. बोर्डीला गोखले शिक्षणसंस्था पंचवीस वर्षं काम करीत होती. तिथलं वातावरण राष्ट्रीय आणि सामाजिक चैतन्यानं तेजाळलेलं होतं. तिथं भिसे होते, चित्रे होते, आत्मारामपंत सावे होते, हरिश्चंद्ररावांचे वडील गोपाळराव पाटील होते.

२५ डिसेंबर १९४५ रोजी बोर्डीला नूतन बाल शिक्षण संघाच्या 'ग्राम बालशिक्षा केंद्रा'चं उद्घाटन झालं.

ग्रामीण आणि आदिवासी भागाला उपयुक्त असा शैक्षणिक आशय, त्याची साधनं, त्यांच्या पद्धती यांवर विचार व अव्याहत प्रयोग ह्यांत ताराबाईंची पुढची अठ्ठावीस वर्षं गेली. 'मराठी शिक्षणपत्रिका' १९३२ सालीच त्यांनी सुरू केली होती तिचं संपादन १९५२ पर्यंत केलं. १९५२ साली त्यांना पहिला हृदयविकाराचा झटका आला. त्याच साली एकुलती एक प्रभा निधन पावली. १९५५ साली यजमान कालवश झाले.

बोर्डी मध्यम स्वरूपाचं नगर. आदिवासी नुसतेच परिघावर होते. ताराबाईंच्या दृष्टीनं हेही काम खरं नव्हतं. आदिवासी त्यांना साद घालीत होते. म्हणून १९५७ साली - वयाच्या ६५ व्या वर्षी - बोर्डीचा सगळा संसार आवरून त्यांनी कोसबाडला ''ही शेवटची कठीण खेळी'' खेळण्यासाठी प्रस्थान ठेवलं.

ताराबाईंनी आपल्या कामाचा मोहरा ग्रामीण व आदिवासी भागांकडं वळवला तरी एकूण बालशिक्षणाची चळवळही त्यांच्याच मुख्य आधारावर चालू होती. खरं म्हणजे मुंबई राज्यात बालशिक्षणाचा पाया त्यांनीच घातला व त्याचं संगोपन आणि संवर्धन केलं. १९६२ साली 'पद्मभूषण' देऊन भारत सरकारनं त्यांचा सन्मान केला. १९७३ साली ताराबाई कॅन्सरनं मृत्यू पावल्या.

मन विदीर्ण करणाऱ्या विपत्तीशी झगडा करीत ताराबाईंनी आपल्या कामाचा गाडा ओढला. त्यांच्याबरोबर अठ्ठावीस वर्ष राहिलेल्या अनुताई वाघ सांगतात की ह्या काळात एकदाही त्यांनी खाजगी दुःखाचा उच्चार केला नाही. ह्या मनस्विनीची दुःखांविषयीची वृत्ती तिच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे प्रकट झाली आहे :

''... दुःखांनी मला घडविलं, तेव्हा त्यांचीही मी ऋणी आहे.''

ताराबाई बोर्डीला आल्या त्या अनुताई वाघ यांना घेऊन - नव्हे, पुढे घालून.

अनुताईही आता वृद्ध झालेल्या आहेत. तुमच्याशी बोलताना त्या दुखरे गुडघे चोळीतच बोलत असतात.

ह्या पायांनी डोंगरदऱ्यांमधून, वहाळा-वाकणांतून वारल्यांच्या मुलांबरोबर पळापळ केली आहे. हेच पाय आज अडुसष्टाव्या वर्षी मुंबई, पुणे, दिल्ली इत्यादी ठिकाणी प्रचारासाठी, वर्गण्या देणग्या जमवण्यासाठी, सरकारी कामासाठी भ्रमण करीत असतात. पाय आता जड झालेले आहेत. पण अनुताई दुसऱ्या कोणाच्या हातात आधार घ्यायचा शक्यतो टाळतात. म्हणातत , ''मला आधार लागला म्हणजे सांगेन.''

१९४५ साली कस्तुरबा ट्रस्टनं बोरिवलीला आयोजित केलेल्या शैक्षणिक शिबिरात अनुताईंनी ताराबाईंची व्याख्यानं ऐकली. ''ग्रामीण भागात काम करायला माझ्याबरोबर कोण येणार ?'' ह्या प्रश्नाला अनुताईंनी उत्तर दिलं - ''मी.''

तेव्हापासून बोर्डीला व नंतर कोसबाडला अनुताईंचे पाय गेली तेहतीस वर्ष रोवलेले आहेत.

बोलताना प्रत्येक वाक्याच्या शेवटी बालसुलभ हास्याचा एक लहानसा हुंकार काढायचा अशी अनुताईंची एक लकब आहे. आम्ही ताराबाईंना कधीच पाहिलं नाही, त्यामुळं बोर्डीच्या व कोसबाडच्या कामाच्या प्रत्यक्ष वर्तावात दोघींचं नेमकं अंशदान कोणतं हे आम्हाला तपशिलात सांगता येणार नाही. पण तर्क असा होतो की बालशिक्षणातल्या तज्ज्ञतेबरोबरच आपल्या ह्या निर्व्याजतेचा, अंतःकरणाच्या गाभाऱ्यातून आलेल्या निर्मळ आणि असीम वात्सल्याचा झरा अनुताईंनी इथं आणून सोडला नसता तर वारल्यांच्या सहस्रावधी बाळांना जेवढं मिळालं तेवढं खचित मिळालं नसतं.



अनुताई वाघ

## ३. शेतं आणि शाळा

हरिश्चंद्रराव जेव्हा कृषि शिक्षण संस्थेचे प्रमुख झाले त्या वेळी जवळच्या भोनारपाड्यावर त्यांच्या कार्यकर्त्यांना एक चमत्कारिक दृश्य दिसलं. एका लहान डबक्यात एक आदिवासी मुलगी पाणी भरीत होती आणि त्याच डबक्यात एक वासरू पाणी पिता पिता तिथंच मुतलं. सारा पाडा ह्याच डबक्यातलं पाणी पीत होता आणि परिणामी हिवताप, त्वचारोग ह्यांनी गांजला होता.

दुसऱ्याच दिवशी संस्थेचे विद्यार्थी व कार्यकर्ते पहारी, टिकाव, फावडी, घमेली घेऊन गेले आणि चमार भोनरच्या शेतात त्यांनी विहीर खणायला सुरवात केली.

कृषि शिक्षण संस्थेच्या विकासकार्याची पहिली कुदळ इथं पडली. त्यानंतर पिण्याच्या पाण्याच्या अठरा आणि शेतीच्या पाण्याच्या एकशेआठ विहरी यथावकाश अस्तित्वात आल्या.

कोकणात पाऊस भरपूर पण पाणीपुरवठा नाही. ठाणे जिल्ह्यातली दोनच टक्के जमीन कृत्रिम सिंचनाखाली आहे. पाऊस संपला की पाण्याची रड पुन्हा पुढच्या वर्षी पाऊस पडेपर्यंत. मग गुरांना पाणी नाही आणि माणसांनाही नाही. वारली चारचार दिवस आंघोळ करीत नाही. मुलांच्या खरजेत आणि एकूण रोगराईत ह्या पाण्याच्या दुष्काळाचा फार मोठा वाटा आहे.

विहिरीमागचं तत्त्वज्ञान असं की पाणी पुरवठा उपलब्ध करून दिला तर ह्या एकपिकी जमिनीचं दुबार किंवा तिबार पीक देणाऱ्या जमिनीत रूपांतं होईल आणि वारली दारिद्र्याच्या कर्दमातून वर येईल. त्याची अडीच-तीन एकरांची जमीन त्याच्या कुटुंबाला वर्षभर पोसण्याइतकी समर्थ होईल. खरीपामध्ये वारली कुडा, डांगी, रिबोटी, कोळपी वगैरे दर एकरी चारपाच क्विंटल उत्पन्न देणाऱ्या स्थानिक जाती लावतात, त्याऐवजी चार ते पाच पट अधिक उत्पादन देणाऱ्या जया, तायचुंग नेटिव्ह वन्, रत्नागिरी-आठ अशा जाती लावता येतील. नव्या जातींना खत फार लागतं आणि खत फार म्हणून पाणीही फार लागतं. पावसाचं पाणी भरपूर, पण केव्हा दगा देईल याचा नेम नाही. अशा अवस्थेत रासायनिक खतांचा दुष्परिणाम होण्याचाच संभव जास्त; म्हणून खरिपात नव्या जातींची लगावड करायला शेतकरी फारसा उत्सुक नसतो, असा सगळीकडचा अनुभव आहे. विहीर असली म्हणजे हा प्रश्न उद्भवत नाही. पावसाचं पाणी कमी पडलं तर विहिरीचं देता येतं. अशा रीतीनं विहीर ही अधिकोत्पादी जातींच्या 'हरित क्रांती'ची जननी ठरते. दुसरं पीक गव्हाचं घ्यायचं आणि उन्हाळ्यात वैशाखी मूग घ्यायचा अशी कृषि शिक्षण संस्थेची सुरुवातीची योजना होती. पण गव्हाऐवजी मिरची व भाजीपाला हाच जास्त सोयीस्कर ठरतो असं दिसून यायला लागलं आहे.

त्याशिवाय आंबा, चिक्कू, पपई, बोर, केळी ह्यांची झाडं लावली म्हणजे उत्पन्नात अधिक भर पडते.

ह्यासाठी संस्थेनं दहाबारा पाड्यांवर मिळून शेतीच्या शंभर वैयक्तिक विहिरी खोदल्या आहेत. शिवाय दहादहा-बाराबारा शेतकऱ्यांना एकत्रितपणे वापरता याव्यात अशा आठ 'सामुदायिक' विहिरी खोदल्या आहेत.

पण संस्थेनं नुसत्याच विहिरी दिल्या नाहित. किंबहुना, विहिरी आणि त्यांच्याशी संबंधित शेतीविकास हा संस्थेच्या एकूण व्याप क कार्यक्रमाचा लहानसा भाग आहे. मूलभूत कृषिसंशोधन, इतरत्र उपलब्ध झालेल्या संशोधनाची स्थानिक परिस्थितीला जुळणी, अनेक प्रकारच्या भातांच्या नव्या जातींचं, कलमी फळझाडांचं, भाजीपाल्याच्या अनंत सुधारलेल्या जातींचं, नव्या प्रथिनयुक्त गवतांचं उत्पादन आणि पुरवठा, शेतीबद्दलचं शिक्षण आणि प्रशिक्षण, प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण, बालवाडी व पाळणाघर, शरीरपोषणाचं शिक्षण आणि प्रशिक्षण, लघुउद्योग, पूरक उद्योग-त्यासाठी कुक्कुटपालन, वराहपालन, मधुमक्षिकापालन, बेकरी, - गृहजीवन सुधारणेसाठी गोबर गॅस प्लांट, बिनधुराच्या मगन चुली, शोषखड्डे आणि मुताऱ्या, घरात उजेड यावा म्हणून छपरात काचेच्या चौकटी बसवणं आदिवासी प्रौढ सापडतील त्या वेळी म्हणजे कुठं दुपारी, कुठं संध्याकाळी, तर कुठं रात्री असे कार्यानुगामी साक्षरतेचे वर्ग चालवणं इतकं सगळं दोन्ही हातांनी देत संस्था उभी आहे. शिवाय निवडक आदिवासी तरुणांच्या उच्च शिक्षणाची सोय आणि अडलेल्या बाईला जीपमधून डहाणूच्या इस्पितळात पाठवणं हीही कामं जयंतराव प्रसंगानुसार करीत असतात.

वारली शेतीचंच नव्हे तर जीवनाचंही एकसुद्धा अंग असं दिसत नाही की ज्याला संस्थेनं स्पर्श केला नाही. तळमळीनं काम करण्याचा वारसाही संस्थेनं जतन करून ठेवला आहे आणि अनेक वर्ष स्थिरपणानं काम करणारी माणसंही जयंतरावांनी जवळ केली आहेत.

पण कोसबाड टेकडीवरच्या सेवाप्रवण नैतिकेची आणि आधुनिक विज्ञानाची उंची आणि खालच्या पाड्यांमधली हटून बसलेली गरिबी व अज्ञान यांच्यामधली दरी अजून फारशी सांधली गेलेली नाही. जयंतरावांची आजची मन:स्थिती काहीशी संभ्रमित आहे. ते कसून विचार करताहेत आणि नव्या वाटा शोधताहेत.

तसं पाह्यलं तर एका दृष्टीनं चित्र वाईट नाही. किंबहुना चांगलंच आहे असं विहीरवाल्या वारल्यांची शेती पाहताना वाटेल.

विहिरींच्या कार्यक्रमाचा सभोवतालच्या आदिवासी जीवनावर काय परिणाम झाला हे पाहण्यासाठी एका छोट्या प्रश्नावलीच्या आधारे आम्ही वैयक्तिक आणि सामुदायिक विहीर असणाऱ्या शेतकऱ्यांची १९७७-७८ सालापुरती माहिती जमा केली आणि सुमारे वीस वारली शेतकऱ्यांच्या तपशिलात मुलाखती घेतल्या.

वापरात असलेल्या पंचेचाळीस विहिरी १९६६ ते १९७१ साली सुरू झाल्या. म्हणजे आम्ही पाहणी करीपर्यंत वापर सुरू झाल्यापासून सर्वसाधारणपणे दहा वर्ष झाली होती.

पाण्याचा वापर करणाऱ्या पंचेचाळीस शेतकऱ्यांची दर कुटुंबामागं सरासरी एकूण जमीन साडेचार एकर आहे. ह्यातली वरकस सोडली तर ती पावणेतीन एकर भरते. सगळ्यांची मिळून एकूण भातजमीन एकशेसत्तावीस एकर आहे.

ह्या विहिरी वीस ते पंचवीस फूट खोल खणलेल्या आहेत. त्यांमधून कोरड्या हंगामात पावणेतीनपैकी दीड एकरापेक्षा कमी (१.३९) जमिनीला पुरेल एवढं पाणी मिळतं. आणि तेही साधारण फेब्रुवारीअखेर. ह्याचाच अर्थ असा की काही थोडे शेतकरी सोडले तर इतरांच्या बाबतीत तीन पिकं घेण्याची शक्यता फारशी उरत नाही.

गेल्या काही वर्षात आजूबाजूला चिक्कू वगैरेंच्या मोठ्या बागा तयार झाल्या आहेत. हे 'वाडीवाले' मोठ्या व्यासाच्या आणि ४० ते ४५ फूट खोल विहिरी खणतात. असं झालं की वारल्यांच्या विहिरींचा पाणी पुरवठा कमी होतो.

ह्या मर्यादेत असं दिसून आलं की पंचेचाळीसपैकी त्रेचाळीस वारली शेतकरी नव्या, अधिक उत्पादन देणाऱ्या भातांच्या जाती घेतात. अशा रीतीनं बहुतेक जणांपर्यंत नवे वाण पोचले आहेत असं म्हणायला हरकत नाही. पण विरोधाभास असा की पावणेतीनांपैकी सरासरी पाऊण एकरांवरच जया, तायचुंग इत्यादी नवे वाण घेतले जातात. बाकीच्या जमिनीवर स्थानिक जातींचीच लागवड चालू दिसली.

रब्बीत गहू घेणारे अठ्ठावीस शेतकरी सापडले. एकूण एकर पंचवीस, म्हणजे इथंही पुन्हा सरासरी एका एकरापेक्षा कमीच. मात्र गेल्या तीनचार वर्षात मिरची आणि भाजीपाला अधिक लोकप्रिय होत चालला आहे. छत्तीस शेतकरी मिरची घेणारे व एकतीस टोमॅटो, वांगी, कोबी, क्वचित नवलकोल आणि कॉलिफ्लॉवर घेणारे आढळले. पण मिरची आणि भाजीपाला ह्यांखाली एकूण क्षेत्र साडेसतरा एकरांपेक्षा जास्त नाही.

भाताचे भाव अलीकडे उतरले आहेत आणि मिरचीचं बी गतवर्षी पुरेसं मिळालं नाही, हे ध्यानात घेतलं तर हे चित्र थोडंस अधिक चांगलं दिसलं असतं असं म्हणता येईल.

मात्र जवळजवळ प्रत्येक शेतकऱ्यांकडे कलमी आंबे, पपई, केळी, बोरे ह्यांची नवीन लागवड केलेली झाडं आढळली.

थोडक्यात असं की, ह्या शेतकऱ्यांच्या पीक-संरचनेत (क्रॉपिंग पॅटर्न) लक्षात येण्यासारखा बदल झालेला दिसतो. एकच पीक जाऊन अनेक आणि नव्या पद्धतीची पिकं आली आहेत. पण त्याचबरोबर हेही खरं की, एकूण क्षेत्र पाहता नव्या गोष्टींचा व्याप अतिशय मर्यादित आहे.

पंचेचाळीपैकी चाळीस जण सांगतात की, आम्ही भाजीपाला विकतो. सोळा जणांनी सांगितलं की, आम्ही वर्षाला तीनशे रुपयांपेक्षा अधिक भाजीपाला व फळं यांची विक्री केली. सहा जणांना हजारापेक्षा अधिक रुपये मिळाले.

सतरा शेतकऱ्यांचे ठोक उत्पन्न पन्नास टक्क्यांनी वाढलं. नवांचं दुप्पट किंवा त्याहून अधिक झालं. निव्वळ उत्पन्न मोजलं तर ह्या संख्या अनुक्रमे दहा व पाच अशा होतील.

थोडीशी पितळेची भांडीकुंडी, थोडेसे बरे कपडे, थोडंसं अधिक चांगलं अन्न आणि जमिनीला निवडुंगाचं कुंपण असं चित्र दिसून आलं.

बारा शेतकरी, 'शेतकरी' म्हणून बरे वाटले. सहाजण बहुधा 'उत्तम' म्हणता येतील. कृषि शिक्षण संस्थेच्या आठदहा वर्षांच्या प्रयत्नांचा हा गोळाबेरीज परिणाम म्हणायला हरकत नाही.

पण ही एक बाजू झाली. शंभरांपैकी अठ्ठेचाळीस विहिरींना वीज-पंप नाही म्हणून त्यांचा विचार सोडून देऊ. उरल्या बावन्न. पण वापरात पंचेचाळीसच. सातांची कथा अशी : ह्या सर्वांना वीज-पंप, पाईपलाईन आहे. पण दळवीपाड्यावरचे दोघेजण शेती सोडून मुंबईला गेले आहेत. लिलकपाड्यावरचा एक व्यसनी आहे. चिंबाव्याचा एक व्यसनी आहे. बाकीच्या तिघांपैकी एकजण काम करीत नाही व दोघांच्या विहिरी घरगुती भांडणामुळं बंद आहेत.

जे शेतकरी 'बरे' किंवा 'उत्तम' वाटले त्यांच्यापैकी किती जणांत नव्या शेतीनं मूळ धरलं आहे याची शंका येते. संस्थेचे कार्यकर्ते सांगतात की, काही अपवाद सोडले तर ह्यांपैकी बहुतेकांच्या मागं लागावं लागतं. कार्यकर्ते आणि संस्थेच्या बहुविध शाखांचे विद्यार्थी (आपल्या शिक्षणाचा भाग म्हणून) पाड्यापाड्यांवर हिंडत असतात. 'अमुक लाव, तमुक लाव', सांगतात. खताचा पुरवठा करतात. कीड पडली तर स्वतःच पाहतात आणि औषध मारायला सांगतात किंवा ते स्वतःच मारतात. ह्यामुळं ही जी प्रगती दिसते ती स्थिरपणानं रुजलेली आहे असं म्हणणं कठीण आहे. ''आम्ही येथून गेलो तर कितपत काम शिल्लक राहील याची शंका आहे.'' असं जयंतराव म्हणतात.

जे शेतकरी आम्हांला चांगले वाटले त्यांची काही वैशिष्ट्यंही ध्यानात घेतली पाहिजेत. जानू रावजी दळवी तीन पिकं घेतो, पण तो संस्थेच्याच दुग्धशाळेत नोकरीला आहे. त्याचा मुलगा अनुताईंच्या छापखान्यात व मुलगी अनुताईंच्या विकासवाडीत नोकरीला आहे. बारक्या चैत्या इभाड अनुताईंच्या सुतारकामाच्या कारखान्यात नोकरीला आहे. रघ्या काकड्या ढाक अनेक वर्ष मुंबईला राहिलेला आहे. बाबू उधऱ्या बुजड हे स्वतः शेतकीचे पदवीधर, अध्यापनशास्त्राचे पदवीधर आणि शिक्षक आहेत. गोविंद लक्ष्मण वळवी सहावीपर्यंत शिकलेला आहे, शिवाय आदिवासी जनता विद्यालयात त्यानं शेतीचं शिक्षण घेतलं आहे. देवजी बारक्या हाडळ हा अठरा वर्ष कम्युनिस्ट पार्टीचं काम केलेला जुना

कार्यकर्ता आहे आणि त्या निमित्तानं केरळ, मद्रास, बंगाल इथपर्यंत हिंडून आलेला आहे. दत्तात्रय चैत्या वरठा एस. एस. सी. झाला आहे. संस्थेतच त्यानं शेतकीचा डिप्लोमा घेतला आहे. रडक्या वाढाणचे आजोबा प्रथम कम्युनिस्ट होते, नंतर भिश्यांच्या सहवासात आले, वडील मुंबईला मिस्त्री होते. स्वतः रडक्या, त्याच्या दोन बहिणी व दोन भाऊ बालवाडीपासून अनुताईंच्या शाळेत शिकले आहेत. रडक्यानं जनता विद्यालयाचा शिक्षणक्रम पुरा केला आहे. त्याच्या बहिणी बालवाडीच्या शिक्षिका म्हणून नोकरीला आहेत.

ह्या सगळ्याचा अर्थ असा की ह्यांपैकी बहुतेकांना शेती सोडून इतर उत्पन्नाचा आधार आहे. शिवाय त्यांच्यावर बाहेरच्या जगाचा, शिक्षणाचा, विशेषतः प्रस्तुत दोन संस्थांमधील शिक्षणाचा व संस्कारांचा प्रभाव पडलेला आहे.

ही माहिती अनेक दृष्टींनी बोलकी आहे. तर उत्पन्नाचा आधार ही गोष्ट शेतीला लागणाऱ्या वित्तपुरवठ्याच्या दृष्टीनं महत्त्वाची आहे. दुसरी गोष्ट, ज्यांच्यावर शिक्षणाचे किंवा बाहेरच्या जगाचे संस्कार झालेले नाहीत त्यांच्यात प्रगती घडवून आणायला संस्था समर्थ झालेली नाही. आणि सर्वसाधारण वारली शिक्षणापासून नव्हे, तर साक्षरतेपासूनही वंचित आहे. ह्याचा अर्थ असा की, शिक्षणाचा संस्कार थोडाफार तरी झाल्याशिवाय वारली शेतकरी, शेतकरी म्हणून नव्या ज्ञानाला सामोरा जाणार नाही. हीच गोष्ट आणखी एका रीतीनं मनात अधिक ठसते. आमच्या प्रश्नपत्रिकांत आलेल्या पंचेचाळीस शेतकऱ्यांपैकी फक्त सोळाच निरक्षर आहेत. म्हणजे साक्षरतेचं प्रमाण सुमारे पासष्ट टक्के पडतं. पंधरा जण दुसऱ्या इयत्तेपर्यंत शिकले आहेत. आणि बाकीचे पंधरा तिसरी ते सातवी झालेले आहेत. म्हणजे हा गटही वारल्यांचा प्रातिनिधिक म्हणता येणार नाही, कारण त्यांची साक्षरता फक्त आठ टक्के आहे.

सामुदायिक विहीरींची कथा याहून वाईट आहे. चालू विहिरी पाच असून त्यांचे पन्नासांहून अधिक सदस्य आहेत. पण त्यातले पाण्याचा थोडाफार वापर करणारे पंधरापेक्षा अधिक नाहीत. सामुदायिक विहिरींच्या क्षेत्रात येणारा वारल्यांचा गट खराखुरा प्रातिनिधिक म्हणता येईल. कारण इथं विहिरींच्या भोवती येतील ते शेतकरी प्रकल्पात घ्यावे लागतात. उलट वैयक्तिक विहिरींचे शेतकरी निवड करून घेता येतात व तसे ते निवडूनच घेतले होते.

थोडक्यात, झालं आहे ते अल्प झालं आहे आणि जे शेतांवर दिसतं ते खरोखरीच रुजलेलं आहे असं म्हणणं कठीण आहे. गेल्या दहा वर्षात नव्या शेतात जे आता मनानं गुंतले आहेत. त्यांची संख्या एकूण शंभर-सवाशे शेतकऱ्यांत सुमारे पंधरा म्हणता येईल.

हे असं का ?

वारली शेतकरी म्हणतात की, आम्ही नवे वाण फार लावीत नाही, कारण बहुतेक जमीन हळवी आहे; तिच्यावर नव्या, जास्त पाणी लागणाऱ्या, जाती टिकत नाहीत. जयंतराव म्हणतात, हळव्या जमिनीला योग्य अशा ब्लू बेल, कर्जत-१८४ अशा जाती आमच्याकडं आहेत, त्याही ते लावीत नाहीत. वारली म्हणतात, खत टाकलं तर वाहून जाईल; संस्थेचे अधिकारी म्हणतात, हे खरं नाही. वारली म्हणतात, विहिरीचं पाणी पुरत नाही. उलट अनुभव असा आहे की, आहे तेवढं पाणीसुद्धा सगळे वापरीत नाहीत. दोघे वारली आग्रहानं सांगत होते की, नव्या वाणाचा पेंढा आखूड असतो म्हणून चारा कमी तर भरतोच, पण गुरांनाही तो आवडत

नाही. कार्यकर्ते सांगतात, आणि आम्हांलाही पटतं, की हे सगळं लक्षात घेऊनदेखील नव्या जाती जास्त फायदेशीर आहेत.

वारल्यांची शेती लहान आहे म्हणून विहीर त्यांना बिनकिफायतशीर वाटत असेल, अशी शंका कुणाच्या मनात येईल. एरवी असं झालं असतं, पण इथं गोष्ट वेगळी आहे. सतरा विहिरी पूर्णपणे फुकट बांधून दिल्या आहेत आणि बाकीच्यांना सरकारी व संस्थेचं मिळून ऐंशीनव्वद टक्के अर्थसहाय्य (सबसिडी) आहे. मुख्य कारण आम्हांला 'सामाजिक' दिसतं आणि ह्या 'सामाजिका'त अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. काही प्रवृत्तींचं निदर्शन एकदोन उदाहरणांवरून येईल.

आम्ही ज्यांना भेटलो त्यौपकी सहाजण तरी पक्के दारुडे होते. लहू लाडक्या बरफ आणि मोहन राघ्या करबट ही ह्या प्रकारची टोकाची उदाहरणं. लहूला कर्त्या वयाचे दोन मुलगे आहेत, त्यामुळं श्रमशक्ती कमी नाही. जमीन सहा एकर आहे. पण लहूशी आम्ही सकाळी अकरा वाजता बोलत होतो त्याच वेळी तो प्यालेला होता. विहिरीच्या धावेवर उभा राहून तो तोल सावरत बोलत होता आणि 'हा विहिरीत पडेल की काय' असा धसका आम्हांला वाटत होता. शेतात गवत माजलं होतं. विजेची मोटर बिलं थकल्यामुळं बंद पडली होती. सुरवातीला लहू फार हुशार आणि कष्टाळू शेतकरी होता. संस्थेच्या नव्या पद्धतींचे प्रयोग त्याच्या शेतावर होत. पाहुणे मंडळींना त्याचं शेत दाखवलं जाई. आता त्याच्या जमिनीची दशा झाली आहे. कारण दारूनं त्याचा पूर्ण कब्जा घेतला आहे.

दोनअडीच महिन्यांनी एका संध्याकाळी त्रिंबाल्याहून परत येताना लहू आम्हांला पुन्हा भेटला, तो झोकांड्या खातच येत होता.

लहूनं आपली काही जमीन दुसऱ्या एकाला खंडानं दिली असावी, अशीही अविनाश चौधरींना शंका आहे.

खरबट पाड्यावरच्या मोहन राघ्या करबटची जमीन पाच एकर त्यांतली तीन एकर उपजाऊ आहे. घरी सहा माणसं कामाची आहेत. संस्थेनं १९६६ साली त्याला विहीर बांधून दिली. ७२ साली इंजिन-पंप बसवून दिला. पृष्ठभाग विहीर अगोदरच खणून दिली होती सर्व शेताला तारांचं कुंपण करून दिलं होतं. पूर्वी गव्हाचे प्रयोग त्याच्या शेतावर करीत. आज मोहननं वीस-पंचवीस हजारांची गुंतवणूक मातीत घातली आहे. बरीचशी जमीन गवताच्या प्रेससाठीच सावकाराला भाड्यानं दिली आहे. कारण मोहन दारू पितो.

मोहन हे कबूल करीत नाही. बोलताना म्हणाला, ''आज थोडा प्याला आहे; तसं मधूनमधून एखाद्या वेळी मी पितो.'' आम्हांला थरथरता नमस्कार करून म्हणाला, ''तुमच्यासमोर खोटं सांगणार नाही. माझ्या विहिरीला पाणीच कमी आहे. पाणीपुरवठा वाढवा.''

मोहनला सोडून परत येताना आम्ही दोन तासांनी काळोखात त्यांच्या घरावरून परत आलो आणि आमच्या कानावर अचानक शब्द आले, ''पाणीपुरवठा !'' वळून पाहिलं तर तर्र झालेला मोहन आम्हांला हा संदेश देण्यासाठी अजून उभा होता असं दिसलं.

ज्या मानवी 'संपत्ती'चा उपयोग कृषि शिक्षण संस्थेला करायचा आहे त्यातली बरीचशी ह्या प्रकारची आहे.

चौधरी सांगतात, बऱ्याचशा विहिरीसुद्धा लोकांच्या मागं लागूनच काढायला लागल्या. 'हे विहीर काढणारे लोक तुमच्या जमिनीच घेऊन बसतील' असा प्रचारही हितसंबधीयांनी केला आणि जमीन हातातून जाण्याचाच ज्याचा इतिहास आहे त्या वारल्याला तो पटलाही. मनोर

तालुक्यात दामखिंड आणि आसपासच्या भागात बँकांकडून कर्ज मिळवून देण्याची आबा करमरकरांनी व्यवस्था केली, तेव्हाही 'हा तर नवा सावकार आला आहे' असं 'जुन्या' सावकारांनी सांगितलं होतंच. पण आता जमीन जात नाही, एवढंच नाही तर संस्था आपल्या कल्याणासाठी तीस वर्ष उभी आहे हे स्पष्ट दिसतं आहे, तरीही फारसा फरक पडला नाही. जयंतराव म्हणतात, 'आम्हांला विहीर पाडून द्या' असं आपण होऊन म्हणणारा अजून एकही भेटत नाही. चौधरी म्हणतात, पिकावर रोग पडला तर औषध कुठलं मारायचं हे विचारायला अजून एखाद दुसराच येतो. नेहमीचा शिरस्ता असा की, कार्यकर्त्यांनीच आपण होऊन त्याला सुचवायचं, किंवा स्वत: पावडर किंवा फवारा मारायचा.

अडचणींचा काही भाग 'सांस्कृतिक' म्हणता येईल असा आहे. संस्थेची दुग्धशाळा आहे आणि तिथं शिक्षणही मिळतं, पण आदिवासी माणूस दुधाचा जोडधंदा करणार नाही. त्याला गाय इतर हिंदूपेक्षाही पवित्र. म्हणून दूध वासरालाच मिळालं पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. मुलांनाही दूध पाजणार नाहीत.

डॉ. मोडकांनी कुक्कुटपालनाची हकिकत सांगितली ती अजब सारखीच आहे. व्हाइट लेगहॉर्न, ऱ्होड आयलंड रेड, ब्लॅक ऑस्ट्रॅलार्प आणि न्यू हॅम्पशायर या चार जाती स्थानिक कोंबड्यांशी संकरित करून जास्त आणि त्वरित उत्पादन देणारी, रोगाला चिवटपणानं टक्कर देणारी, आणि स्थानिक परिस्थितीला योग्य अशी जात संस्थेनं शोधून काढली. पण वारल्यांना ती पसंत नाही; कारण ती रंगानं पाढरी आहे, आणि पांढरं कोंबडं तर वारल्यांच्या देवाला चालत नाही. (संस्थेनं ह्यानंतर पुन्हा प्रयोग करून काळ्या रंगाचे कोंबडं तयार करण्यापर्यंत मजल आणली आहे !)

वारली मनुष्य स्वतंत्र शेतकऱ्यापेक्षा 'मजूर' म्हणून अधिक चांगला आहे असं सर्वच सांगतात. एक तर असं की पिढ्यान्-पिढ्या सावकार सांगेल तेच करायचं आणि त्याच्या शेतावर राबायचं एवढंच त्याच्या रक्तात भिनलं आहे. 'स्वतंत्र शेतकरी' तो अलीकडं, 'कसेल त्याची जमीन' ह्या कायद्यानं झाला. पण त्याच्या पूर्वीच्या सवयी अजून गेल्या नाहीत. दुसरं पीक लावायच्या ऐवजी तो वाडीवाल्यांकडं मजुरीला पळतो. मजुरीचं आकर्षण असायची बरीच कारणं आहेत. एकतर रोज रोख रक्कम हातात पडते. शेतीत खर्च आणि श्रम करून फळ पदरात पडायला वाट पाहावी लागते. आणि वारली हा माणूस कशाचीही 'वाट पाहायला' तयार असत नाही. मजुरीतही महिना-पंधरा दिवसांनी एकदम मिळणाऱ्या रकमेपेक्षा दररोज मिळणारी रक्कम अधिक चांगली. संस्था आपल्या शेतावर व इतर कामात रोजमुरा देत नाही म्हणून 'जैंत सरां'वर राग. गव्हापेक्षा मिरची बरी, कारण आठदहा दिवसांनी तोडा होतो आणि रोख पैसे मिळतात. भाताtही शंभर-एकशेवीस दिवसांनी तयार होणाऱ्या अधिकोत्पादी जातीपेक्षा जवाऱ्या, हरी, दोडक्या इत्यादी ऐंशी-नव्वद दिवसांत हाताशी येणाऱ्या जाती त्याला अधिक पसंत. वारल्याची तत्कालसुखाची प्रवृत्ती अशा रीतीनं त्याच्या सर्व आर्थिक व्यवहारात प्रतिबिंबित झालेली आहे. अर्थात ही वृत्ती जोपासली जाण्यामागंही, वाट पाहण्यासाठी जी आर्थिक शक्ती लागते ती त्याच्याजवळ कधीच नव्हती हेही एक कारण असणार. रोज दारू प्यायची तर रोकड पाहिजे, हेही आणखी एक. पूरक उद्योगांना प्रतिसाद नाही. काचेच्या चौकटी, गोबर गॅस, शोष खड्डे या बाबतीत मागं लागणं चालूच आहे. दोन मगनचुली पाहिल्या, पण त्या वापरल्या जात आहेत असं चिन्ह दिसलं नाही.

विकासाला पराङ्मुख करणारा हा सांस्कृतिक वारसा नाकारून जो एखाद-दुसरा शेतकरी पुढं जायचा यत्न करतो त्याला इतर लोक मागं खेचतात. त्याच्याशी दारू पिऊन भांडण करणं, त्याचा शेतमाल पळवून नेणं अशा पद्धतींनी त्यांचा राग व्यक्त होतो.

कृषि शिक्षण संस्थेच्या मानानं ग्राम बाल शिक्षा केंद्राचा व्याप लहान आहे आणि त्याचं कार्य मुख्यत: चिमुकल्यांसाठीच आहे.

आपणही आपली मुलं बालवाडयांतून घालतो, पण त्यामागचा थोर विचार आपल्या सहसा कधी ध्यानात येत नाही. मुलांची ज्ञानेंद्रियं उद्दीपित आणि तीक्ष्ण करून त्यांचा अनुभव समृद्ध करणं आणि स्वतंत्र व्यक्ती म्हणून त्याला प्रतिष्ठा अर्पण करणं हे बालशिक्षणाचं सारसर्वस्व आहे. आपल्याला कुठून धोका आहे हे हुकूमशहांना बरोबर कळतं; म्हणूनच मुसलिनीनं मॉंटेसोरींना देशातून हद्दपार केलं. वारली मनाच्या पार्श्वभूमीवर हा विचार आणखीच थोर भासू लागतो.

गिजूभाईंनी मॉंटेसोरी पद्धतीचं 'भारतीयीकरण' केलं असं म्हटलं तर ताराबाईंनी त्यांचं 'ग्रामीणीकरण' केलं असं म्हटलं पाहिजे. निरनिराळ्या समस्यांना तोंड देत देत, त्यांच्यावर उत्तरं शोधून काढीत काढीत ताराबाईंच्या पद्धती कशा फुलत गेल्या हा भारतातीलच नव्हे, तर जगातील बालशिक्षणाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय ठरण्यासारखा आहे. एका बाजूनं शिक्षणाचा आशय आणि शैक्षणिक पद्धती ह्यामध्ये सारखं इथल्या परिस्थितीशी कल्पकतेनं नातं जोडण्याच्या प्रयत्नाचा आणि दुसऱ्या बाजूनं संकटांशी आणि निराशांशी निकरानं झुंज घेत केलेल्या मानवी पराक्रमाचा तो इतिहास आहे.


बोर्डीला भंग्यांची मुलं बालवाडीत येतात म्हणून इतर हरिजनांची यायची थांबली, आणि ही सगळी येतात म्हणून सर्वांची थांबली. एक दिवस शाळेची संख्या शून्यावर आली म्हणून शेलातभाईंनी धसका घेतला आणि पुढं ते हृदयविकारानं निधन पावले.

'मुलं येत नाहीत, तर आपणच मुलांकडं जाऊ' म्हणून संस्थेचे कार्यकर्ते आणि कार्यकर्त्या पिशवीत शिक्षण साधनं घेऊन वस्त्यावस्त्यांवर जाऊन बालवाड्या मांडू लागली. ह्यातून 'अंगण बालवाडी' किंवा 'अंगणवाडी' जन्माला आली.

शाळेत लांबच्या वस्तीतली मुलं येत नाहीत म्हणून बैलगाडी सुरू केली आणि टाळ-झांजा वाजवीत ही मिरवणूक रोज शाळेकडं येऊ लागली. मग हळू हळू पुन्हा संख्या वाढू लागली. शंभर मुलं झाली तर 'सत्यनारायण करू' असं अनुताई बोलल्या आणि लवकरच धडाक्यानं सत्यनारायण साजरा झाला.

बोर्डी काही म्हटलं तरी ग्रामीण भागातलं पण नागर वस्तीचं गाव. 'घणुं काम बाकी छे' हे ताराबाई विसरल्या नव्हत्या. गावाच्या लगतच्या आदिवासी वस्तीकडे त्यांचं मन धाव घेत होतं. एका पारशाच्या दरजीवाडी नावाच्या वस्तीवर, 'दुबळा' मुलांसाठी बालवाडी सुरू झाली.

पण अडीच ते सहा वर्ष ह्या नेमक्या वयोमर्यादेतली मुलं इथं थोडीच येणार ? आईबाप कामाला गेल्यावर लहान मुलांनी तान्ह्यांना संभाळायचं आणि प्राथमिक शाळेच्या वयाच्या मुलांनीही तेच करायचं. ही अतूट जोड शहरी कृत्रिम पद्धतीनं तोडण्यासारखी नव्हती. ह्या परिस्थितीत एक आव्हान होतं आणि दुर्मिळ अशी संधीही होती. तोडगा असा निघाला की, बालवाडीला जोडूनच पाळणाघर ठेवायचं, बालवाडीतल्या मुलांनी आपले खेळ खेळता खेळता, गाणी म्हणता म्हणता, मध्येच लहानग्याकडे पाहून यायला हरकत नाही अशी सोय. बालवाडीच्या वरच्या वयाच्या मुलांसाठी जवळच प्राथमिक शिक्षणाचा वेगळा वर्ग सुरू करायचा.



ह्या तीन गोष्टी मिळून 'विकासवाडी' तयार होते. ग्रामीण बालशिक्षणाचा प्रश्न ह्या त्रिकुटाशिवाय सुटूच शकत नाही हे आता तत्वतः तरी मान्य झालं आहे. ताराबाईंच हे मोठं देणं.

पण संधीही केवढी अचानक उपस्थित झाली. ह्या तान्ह्यांना वेगळ्या हालचाली दिसायला लागल्या, वेगळे रंग दिसायला लागले, वेगळे नाद आणि शब्द त्यांच्या कानावर पडायला लागले. त्यांना औषधं मिळू लागली, दूध मिळू लागलं. सर्व भावंडंही एकत्र असल्यानं विकासवाडी घरातूनच सावयवी रीतीनं फुलल्यासारखी झाली आणि तिन्ही मार्गांनी आदिवासींच्या अंधाऱ्या फोपटांतून हे कोवळे ज्ञानकिरण खेळू लागले. "शाळा म्हणजे मुलांच्या अंगणातलं झाड बनलं पाहिजे," ही अनुताईंची उक्ती खरी ठरली.

थोड्याशा सवयीनं आईबापांनाही ही व्यवस्था पसंत पडली. आया सुरुवातीला थोड्या शंकित मनानं मुलांना पाहायला येत. त्यांना बंदी तर केली गेली नाहीच, उलट उत्तेजन दिलं गेलं. मुलांची निगा कशी राखावी ह्याची प्रात्यक्षिकं त्यांना दिसायला लागली. अशा रीतीनं नव्या जाणिवांच्या कक्षेत आयाही आल्या. कमीत कमी अर्धं आदिवासी कुटुंब तरी बालवाडीच्या प्रभावळीत सामील झालं.

कोसबाडच्या प्राथमिक शाळेत प्रथम खूपच मुलं-मुली आल्या, पण पुढं मोठ्या वयाचे मुलगे कमी झाले. ह्या मुलांना चार पैसे मिळविण्यासाठी गुरं राखायला रानावनातून हिंडावं लागे. शिवाय रानचा वारा पिणाऱ्या या पोरांना एका ठिकाणी बसून शिकण्याचा कंटाळा येई. ह्या आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीवर उपाय म्हणून 'कुरणशाळा' निर्माण झाली.

ह्या मुलांना पकडणं म्हणजे अक्षरशः वारा मुठीत पकडून ठेवण्याचंच काम होतं. आणि ही धावपळ अनुताईंनी केली. "मास्तर, मास्तर ! पळा, पळा !" असं म्हणणारी ही मुलं त्यांनी शेवटी यशस्वीपणानं आपल्या रेशमाच्या दावणीत बांधली.

शिक्षणाला वंचित झालेल्या, एवढंच नव्हे तर त्याच्याशी शत्रुत्व करणाऱ्या ह्या मुलांना 'आपण शिकत आहोत' हे समजू न देता त्यांच्या गळी शिक्षण उतरविण्याचा हा लोकविलक्षण खटाटोप होता. औपचारिक शालेय शिक्षण आणि त्याच्या पद्धती ह्यांचा ह्या मुलांच्या जीवनाशी व गरजांशी कसलाच संबंध नव्हता. त्यामुळं त्यांना ती शिक्षा वाटे. उलट, हा अनौपचारिक अभ्यासक्रम गाणी, गप्पा, खेळ, ओढ्यात आंघोळी, फुलं जमा करणं, पानं जमा करणं, मारलेल्या सापाचं निरीक्षण करणं, भाजलेल्या पाखराचं मांस सगळ्यांनी वाटून खाणं, जमिनीवर पडलेली झाडाची सावली मोजणं इत्यादी मार्गांनी आपोआप फुलत गेला आणि त्यामधून सृष्टिज्ञान, भूगोल, स्वच्छता, सहकार, जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, अंकगणित ह्यांचे प्राथमिक धडे मुलांना मिळत गेले. त्यांच्या स्वाभाविक कुतूहलाची गळचेपी न होता त्यांच्या परिचित वातावरणातच त्याला अंकुर फुटले. मग केंद्र प्राथमिक शाळा व तिच्यातलं मुलांनीच बनविलेलं वस्तुसंग्रहालय त्यांना दाखवण्यात आलं. शाळेचं महत्त्व पटू लागलं. कुरणंही लांब हटत गेली. शेवटी कुरणशाळा बंद करणं शक्य झालं.

बालशिक्षणाची स्वस्त आणि स्थानिक निसर्गसंपत्तीतून तयार केलेली साधनं ही केंद्राची शिक्षणशास्त्रात आणखी एक भर. ह्यात तत्त्व तर होतंच, पण गरजही होती. दरजीवाडीमधल्या बालवाडीवर करायच्या खर्चाचं १९४६ चं अनुताईंना मंजूर झालेलं बजेट दरमहा तीन रुपयांचं होतं ! त्यामुळे त्या कोळशानं भिंतीवर अक्षरं काढित. पण इथंही त्यांची आणि मुलांची कल्पनाशक्ती कामाला आली. ताराबाईंनी लिहिलं आहे:

"... आजूबाजूच्या झाड, पान, फूल, सुरूची फळे, समुद्रकिनारीचे शंख, शिंपले, वा गुंजा इत्यादींचा उपयोग करून सुंदर कलाकृती निर्माण केल्या... मातीकामासाठी माती गाळण्याची येथील कुंभारांची पद्धती आम्हांला फार अभिनव वाटली; ती आम्ही आमच्या बालवाड्यांत दाखल केली. त्याचप्रमाणे मागास विभागातील लोक लग्नकार्यात आपापल्या झोपड्यांच्या भिंती सारवून त्यावर सुंदर असे चित्रकाम करीत असतात, त्याच धर्तीवर मुलांना काम करता यावं म्हणून आम्ही चित्रकामासाठी सारवलेल्या तट्ट्यांचे लहान फळे तयार केले व त्यावर मुले मातीच्या ओल्या रंगाने चित्रकाम करतात. चित्रकामासाठी कागद-पेन्सिल अधिक महाग पडते. त्यावाचून अडून न राहता जमिनी, भिंती, दारे, मातीची मडकी, तवे, पणत्या, ुडकुली वगैरे पदार्थांचा पार्श्वभूमी म्हणून उपयोग करून गेरू, चुनखडी, पिवळी माती व चुनखडीत रंग मिसळून निळे-हिरवे रंग तयार करू लागलो व वडाच्या कोवळ्या पारंब्यांपासून ठेचून केलेले ब्रश वापरून रंगकामास उत्तेजन दिले..."

पण मागास भागातील शिक्षणाची सर्वात मध्यवर्ती समस्या बोर्डीलाच ताराबाईंच्या ध्यानात आली आणि तिच्यावरही त्या तुटून पडल्या.

बोर्डीतल्या आदिवासी वस्तीत एकदा मुलांची संख्या गडावू लागली. ही मुलं कुठं गेली असतील म्हणून त्यांनी शोध घेतला तेव्हा ती पहारीनं काहीतरी खणीत असल्याचं दिसलं. बोराएवढे लहानसे कंद मुलं मोठ्या प्रयासानं खणून काढीत होती आणि मातीनं भरलेले ते कंद तसेच्या तसेच खात होती.

ताराबाई लिहितात की, " हे पाहून माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडलं... ती मंडळी आमच्या गाण्याचा तिरस्कार करतात, त्यांना आमचा कार्यक्रम आवडत नाही यात काय नवल ? भुकेने त्यांचे प्राण कासावीस होत आहेत ! 'खायला कोठे मिळेल ? खायला कोठे मिळेल ?' त्यांचे डोळे चारी बाजूंस भिरभिर फिरून

शोधीत आहेत... अशा वेळी त्यांच्या भुकेची काहीही व्यवस्था न करता आम्ही त्यांच्यासाठी 'आमची मोटार पों पों करते, ड्रायव्हर बंदरावर घेऊन फिरायला जातो' अशांसारखी गाणी म्हणायची म्हणजे त्यांची आम्ही निर्दयपणे थट्टाच करतो असे नाही का ? माणुसकीचा अंशही आमच्यात नसल्याचे हे दर्शक आहे...

"आम्ही त्यांच्यात जाऊन स्वच्छता आणि सामाजिक सुधारणेच्या गप्पा मारू लागतो तेव्हा ती मंडळी आमच्या अंगावर मारायसाठी धावून आली तर मला त्यात काहीसुद्धा नवल वाटायचे नाही..."

एकदा ताराबाई गांधीजींना भेटल्या होत्या आणि उत्साहानं त्यांना सांगत होत्या, मी खेडेगावात जाणार आहे, मागासलेल्या लोकांच्यात पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणार आहे. गांधीजींनी त्यांना एकच प्रश्न विचारला होता, "तुम्ही त्यांना खाण्यासरखे गवत कोठे मिळेल, कसे शिजवावे, आणि कसे खावे ते शिकवाल काय ?"

हे शब्द ताराबाईंना एकदम आठवले आणि त्यांच्या ध्यानात आलं की, बाकी सगळं शिक्षण सोडून "खाता येईल अशी वस्तू उत्पन्न करण्यास" त्यांना प्रथम शिकवलं पाहिजे.

आणि ह्यासाठी ताराबाईंनी अनेक प्रयोग केले. अनुताईंनी बोर्डीलाच एक जागा मिळवून रताळी, मुळे, मेथी लावली. कोसबाडला तेरा एकरांच्या स्वतंत्र शेतीच्या रूपानं हा प्रकल्प आता साकार झाला आहे. इथं काम करून मुलांना थोडीबहुत मजुरी मिळू शकते. कृषि शिक्षण संस्थेच्या शेतीवरही मुलं कामाला जातात. प्राथमिक शाळेच्या वरच्या वर्गांना काही शाळांतून हल्ली 'कार्यानुभाव' चे (वर्क एक्स्पीरियन्स) तास असतात. कोसबाडला सुतारकाम, शेती आणि शिवण ही कामं ठेवलेली आहेत.

शेख बशीर गुरुजी म्हणाले की मुलांना ताशी पंचवीस पैसे आम्ही देतो. त्यातून दरमहा पाचसहा रुपये मिळकत त्यांना होते. मुली शिवणकाम करतात आणि थोडेफार पैसे मिळवतात.

कोसबाडला ताराबाईंनी आणखी एक उद्योग सुरू केला तो भाताच्या पेंढ्यापासून बाटल्यांची आवरणं बनवण्याचा. मुलांनी थोडा वेळ काम आणि उरलेला वेळ अभ्यास करावा अशी योजना होती. पण थोड्याच अवधीत आजूबाजूच्या व्यापाऱ्यांनी हा धंदा उचलला आणि तिथं अभ्यासाची वगैरे अट नसल्यामुळं मुलांना जास्त पैसे मिळू लागले. (या 'कव्हरी'च्या कारखान्यात शेकडो लहान मुलं एका कव्हरीला एक पैसा ह्या मजुरीवर दिवसाचे दिवस घाम गाळीत असतात !) मग सुतार कामाची शाळा काढली. माजी विद्यार्थ्यांनी आता ती सहकारी पद्धतीनं चालवली आहे.

हा भुकेचा प्रश्न सोडवण्यात ताराबाईंना फार यश आलं नाही, यात नवल नाही. ताराबाईंपेक्षा लक्षपटीनं अधिक सत्ता, सामग्री आणि नियोजन-तज्ज्ञता असणारे 'घडेचि ना, जमेचि ना' हा मंत्र अजून जपत आहेत. पण ताराबाईंनी काय काय केलं याची मोजदाद करताना आर्थिक प्रश्नाशी हा सततचा झगडा त्यात अंतर्भूत करावा लागेल.

- आणि ह्याच ठिकाणी थोडीशी आठवण करून द्यायला हरकत नाही की, हरिश्चंद्रराव आणि जयंतराव ह्यांनी ह्या प्रश्नांला सरळच हात घालून वारल्यांची युगायुगांची भूक शांत करण्याचा निश्चय केला होता ! ग्रामीण प्रश्नाचं हे दुश्चक्र कसं भेदायचं, हा ह्या दोन संस्थांपुढचा अवाढव्य प्रश्न आहे.

पण 'साधनं', 'पद्धती' ह्यांचं कितीही ग्रामीणीकरण केलं तरी शिकवणाऱ्या व्यक्तीचं ग्रामिणीकरण

झाल्याशिवाय इथल्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटणार नव्हता. केंद्राची सगळ्यांत महत्त्वाची 'मेथड' ती ही आणि अनुताईंच्या वत्सल लोकमातृत्वातून ती आपोआप उमलत गेली.

एका बालशिक्षिकेला लिहिलेल्या जुन्या एका पत्रात अनुताईंनी लिहिलं आहे :

''लहान मुलांचे अंग ओल्या फडक्याने रोज पुसून काढते. कधीकधी त्यांनाही नदीवर घेऊन जाते. नाहीतर तळ्याचे पाणी गाळून आणून मडक्यात थोडे गरम करून आंघोळ घातले... (खरजेसाठी) लिंबाचे औषध मात्र रोज लावते.''

''वेण्यांसाठीही असाच नेट धरला आहे. रोज सगळ्यांच्या वेण्या झाल्याच पाहिजेत. तेलात कापूर घालून ठेवला आहे. मधून मधून गेल्याबरोबर शिपीचंद मुलींच्या डोक्यात घालून ठेवते आणि तासा-दोन तासांनी सगळ्यांची डोकी धुवून काढते, कधी कधी तंबाखूचे पाणी पण घालते.

''मढीला गेले होते, तेथून उवांसाठी एक औषध शिकून आले. एक रत्तल तेलात एक तोळा मायफळ कुटून घालावयाचे. हे तेल रोज लावायचे. त्याने लिखा मरतात म्हणे.''

दुसऱ्या एका पत्रात त्या म्हणतात :

''हल्ली एक नवेच संकट आमच्या या बालवाडीवर आला आहे. सगळी मुले मलेरियाने आजारी पडली आहेत. एक दिवसआड अथवा रोज थडथड थंडी भरून बिचाऱ्यांना ताप येतो तेव्हा झोपडीच्या कुठल्यातरी एका बाजूला कुडकुडत कण्हत पडून राहतात...

''त्यातल्या त्यात आमची सोमली तर खूप आजारी झाली आहे. अगदी उठत नाही, बसत नाही, की वर डोळा करीत नाही. मी वैद्यांना घेऊ आले. त्यांनी सांगितलेले औषध मी स्वतःच देत असते. आता तर जवळजवळ दिवसभर तिच्याच घरी मुक्काम आहे म्हटले तरी चालेल.''

वीस वर्षांपूर्वी लहान दुडदुडत्या पण कृश पायांनी इथं शिक्षणाचा प्रवेश झाला. कोसबाडच्या भूमीवर आणि आसपास नव्या वारली पिढ्यांची पदचिन्हं आता बरीच स्पष्टपणानं उमटायला लागली आहेत असं आमच्या ध्यानात आलं.

कोसबाडच्या प्राथमिक शाळेत येणारी काही मुलं वसतिगृहातली आणि काही कोसबाड व जवळपासच्या पाड्यांवरून येणारी असतात. सगळेच शिक्षक सांगतात की पाड्यांवरच्या बालवाडीतून आलेली मुलं अधिक चुणचुणीत, अधिक हुशार असतात. परीक्षेत त्यांना अधिक चागलं यश मिळतं. पूर्वी मुलं खिडकीतून उड्या मारून पळून जात; पालक तर उदासीनच. आता प्राथमिक शाळेत नाव घालायला पालक मुलांना स्वतः घेऊन येतात असं वसंत पाटील गुरुजींनी सांगितलं.

आता आई-वडिलांच्या वृत्तीतही फरक पडला आहे. पूर्वी मुलांना घराघरांतून घेऊन येणं, त्यांना स्वच्छ करणं इत्यादी कामं बालसेविकांना करावी लागत. आता आयांना वेळ असला तर त्याच मुलांना घेऊन येतात नाहीतर स्वच्छ करून तरी ठेवतात. करबट पाड्यावरच्या हळदीकुंकवाच्या समारंभात लाजत लाजत का होईना, तीन बायकांनी भाषणं केली आणि मुलांना शिक्षण मिळालं पाहिजे असं सांगितलं.

वारल्यांच्या ज्ञानाची आणि अनुभवाची कक्षा इतकी निरुंद आहे की, कार्यकर्ते सगळा वैयक्तिक स्वार्थ सोडून इथं आपल्या भल्यासाठी आले आहेत हेही त्यांना कळत नाही. त्यामुळे एरवी सर्वसाधारणपणे आपण जी कृतज्ञतेची अपेक्षा करतो तिचा इथं अंशसुद्धा दिसत

नाही. नव्या कार्यकर्त्याला पहिला फटका ह्याचा बसतो. ही माणसं काम करतात म्हणजे ती सरकारचीच असणार आणि मुलांना घेऊन जाणं हे त्यांचं कामच आहे अशी वारल्यांची समजूत असते. केंद्राच्या पूर्वीच्या एक सेविका श्रीमती रमाबाई पंडित मुलांना पाड्यावर घ्यायला गेल्या नाहीत म्हणजे वारली बायका म्हणत, ''चार इसा पगार घेती, पण पोयरी घ्यायला आली नाही.'' ही परिस्थिती आता बदलली आहे. म्हणजे मूळ समजूत बदलली आहे असं नाही; पण 'मुलांनी शिकायला पाहिजे' असं वाटायला लागलं आहे.

आमच्या एका मुक्कामातच एक छान घटना घडली. ढाकपाडा व घाटाळपाडा ह्या जवळच्या पाड्यांवरून अनुताईंकडं अर्ज आले होते. ढाकपाड्यावरच्या अर्जाखाली पंचवीस-तीस पाडेकऱ्यांची नावं होती आणि 'पाडव्याला बालवाडी काढा' असे लिहिलं होतं. तशीच विनंती घाटाळपाड्याकडून आली होती. पाडव्याच्या दिवशीच ह्या दोन्ही बालवाड्यांचं मोठ्या समारंभानं ''मुंबईच्या पाहुण्या''च्या हस्ते उद्‌घाटन झालं आणि त्यांनी नारळ वगैरे फोडून खुषीनं पाटीदान केलं. घाटाळपाड्यावर एका वारली बाईनं दोनतीन वाक्यांचं भाषण केलं. वीस वर्षांनी का होईना, आपणहून दोन पाडे बालवाडीची मागणी करायला आले म्हणून त्या दिवशी अनुताई फार सुखावल्या होत्या.

हे कसं झालं हे पाहिलं म्हणजे हे बी कसं रुजतं हे लक्षात येतं. ढाकपाड्यावरचे नवशा व सोमा ढाक हे दोन भाऊ अनुताईंच्या शाळेत शिकले आहेत. नवशा डी० एड० झाला आणि आता तो एका शाळेत शिक्षक आहे. या भावांनी पाड्यावर उचल केली आणि बालवाडी सुरू झाली.

पुन्हा पाच महिन्यांनी फेरी टाकली तेव्हा ह्या दोन बालवाड्यांशी नातं जुळलेल्या ''मुंबईच्या पाहुण्यां''ना त्या पुन्हा पाहाव्या असं साहजिकच वाटायला लागलं. घाटाळपाड्यावर जाण्याचा योग आला. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांपैकी ऐंशी टक्के मुलं खरजेनं लडबडलेली होती. पण बालसेविका विनोदिनी पाटील हिनं रोज औषध लावलावून खरूज जवळजवळ घालवून टाकली आहे. मुलं अधिक तजेलदार दिसत होती गाणी म्हणत होती, मजेनं हसत होती, ईर्ष्येनं खेळत होती. आम्ही केवळ अपघातानं ह्या मुलांच्यात गुंतले गेलो होतो आणि ह्या दृश्यानं आम्हांला स्वाभाविकच फार बरं वाटलं.

रडक्या वाढाणचा आणि आपला परिचय अगोदर झाला आहे. रडक्या हा एक उत्तम शेतकरी आहे. त्याचे पूर्वसंस्कार महत्त्वाचे आहेत हे आपण पाहिलंच आहे. पण त्याचं घरच्या घर, शिक्षणानं संस्कारित झालेलं आहे. ताया आणि सुंदर ह्या त्याच्या बहिणी बालवाडीपासून शिकत शिकत आता डोंगरीपाडा आणि चिखली इथं बालवाडीला स्वत: शिकवू लागल्या आहेत. धाकटे भाऊही बालवाडीपासून शिकून वर गेले आहेत. तायाला आता ग्रामसेविका म्हणून मुलाखतीला बोलावणं आलं आहे. तायाची धाकटी बहीण आजारी पडली तेव्हा तायानं तिला डॉक्टरकडं न्यायचा आग्रह धरला आणि घरच्या वडील माणसांनी भगताकडं नेण्याचा. असे संघर्ष आता व्हायला लागले आहेत. ताया, सुंदर यांनी वारली पद्धतीचं नेसणं टाकून पाचवारी साडीचा पेहराव घेतला आहे. हेही पाड्यावरच्यांना आवडत नाही. रडक्यानं कृषि शिक्षण संस्थेच्या आदिवासी जनता विद्यालयाचा अकरा महिन्यांचा शेतीचा कोर्स पुरा केला आहे आणि आपल्या छोट्या 'सरोज'ला अनुताईंच्या पाळणाघरात घालून एका पिढीच्या शैक्षणिक चक्राचे आरे पुन्हा वर वळवले आहेत.

बालवाडीतले किंवा प्राथमिक शाळेतले पाचसहाजण आता शिक्षक आहेत. शेवंती, विजया आणि विमल छापखान्यात मुद्रणाचं काम करतात. बारक्या सुतारशाळेत सुतारकाम करतो आणि घरची शेती बऱ्या तऱ्हेनं करतो. अनुताईंच्या रात्रशाळेचे विद्यार्थी डोंगरपाड्यावरचे बाबूराव वाघात हे तरूण गृहस्थ आता पंचायत समितीचे सभापती आहेत. आणि कर्तबगार आणि मुरलेल्या पुढाऱ्यासारखे दिसतात. डोंगरी पाड्यावरच्या बालवाडी-पाळणाघराला त्याचंच उत्तेजन आणि मदत कारणीभूत झाली. ताया आणि सुंदरशिवाय आणखी दोन आदिवासी बालसेविका आहेत. प्रभा ढाक दळवीपाड्यावरची 'नंदा' बालवाडी चालवते; राजू सातवी चारोटीच्या धापशीपाड्यावरची बालवाडी चालवते.

मुलांची नावं झपाट्यानं बदलत चालली आहेत. आता केंद्र बालवाडीत लावलेली मुलांच्या नावाची यादी वाचली तर ही दादरच्या शिशुविहार मधली मुलं असावीत असं वाटेल. अरुण, अजय, नीला, सुनीती सगळी इथं सापडतील.

शिक्षित वारली दारू पितात, पण कमी. त्यांचा भुतं, भगत यांवरचा विश्वास कमी झाला आहे पण पूर्ण गेला नाही. त्यांची भाषा बदलली आहे, शब्दसंख्या वाढली आहे, पण त्यांची बोलण्याची ढब अजून वारलीचा प्रभाव दाखवते - आणि त्यामुळं काही बिघडत नाही. चांगल्या राहणीचं आमिष त्यांना वाटू लागलं आहे.

मुली जास्त तेज वाटल्या. छापखान्यात काम करणारी शेवंती मन-मोकळेपणानं आणि उल्हासानं बोलत असताना उद्याच्या मुक्त आणि सुजाण वारली स्त्रीची पताकाच जणू तिच्या कपाळावर फडकत आहे असं वाटत होतं. मात्र ह्या नव्या मुलींच्या नवऱ्याविषयीच्या अपेक्षा साहजिकच उंचावल्या आहेत आणि त्यांना योग्य असे, कमीत कमी दारुडे नसणारे आणि कष्टाळू नवरे मिळणं ही समस्या आताच उभी राहिलेली आहे.

मात्र शिक्षित वारली तरुण अजून आपल्या जमातीचं नेतृत्व करू लागले नाहीत. 'शिकवलेले' म्हणून त्यांना पाड्यावर मान आहे, असं दत्तू धांगडा आणि दत्ता वरठा म्हणाले. पण अजून आपल्या जमातीचे प्रश्न समजावून घेणं, त्यांना संघटित करणं हे त्यांना जमलेलं नाही. ते आपल्या समाजापासून जरा तुटले असावेत अशी शंका येते.

पण सगळ्यात महत्त्वाची मर्यादा म्हणजे शिक्षित वारलीसुद्धा अजून फार मितभाषी आहे. अजून तो समान पातळीवर आत्मविश्वासानं तुमच्याशी बोलत नाही. बाबूराव वाघात, सभापती, हा आमच्या पाहण्यातला एकमेव अपवाद. ह्या माणसात रग आहे आणि ती त्याच्या पाहण्यात, हालचालींत सहजपणानं जाणवते. त्यांच्या चेहऱ्यावर एक आकर्षक अशी गुर्मीची सौम्य छटा आहे. पण बाबूराव पुढारीपणाच्या रुळलेल्या रस्त्यानं जातील की आपल्या समाजाला बरोबर घेऊन त्यांच्या उन्नतीसाठी स्वत:ला तोशीस लावून झटतील, हे अजून दिसायचं आहे. कृषि शिक्षण संस्थेचे अर्जुन शिडवा उराड्या, भिकाजी बारक्या सापटे आणि पूर्वी उल्लेखिलेल्या बुजड गुरुजी हे सगळे उच्चशिक्षित शेतकी पदवीधर आहेत. जयंतराव म्हणतात, ह्यांनी आपल्या समाजात अधिक मिसळलं पाहिजे.

ह्या परिस्थितीचं कारण अधिक खोल असावं असं वाटतं. वारल्यांच्या पारंपारिक राहणीत सण, आचार, लग्नं, मर्तिकं, नाच, सोडले तर संभाषण, गप्पाटप्पा, मैत्री हे भाग नाहीत. मुळात वारली भाषा तीनशे शब्दांची म्हणतात; त्याचाही हा परिणाम असावा. अशिक्षित

वारली सहसा बोलणंच टाळतो आणि शिक्षित वारली सहजासहजी सैल होत नाही. तो एका सूक्ष्म दडपणाखाली वावरतो आहे असं वाटतं. माध्यमिक शाळेच्या नववीच्या वर्गातला एक वारली विद्यार्थी अतिशय हुशार आहे. त्याच्या ऐंशी-नव्वद टक्के गुण मिळविलेल्या उत्तरपत्रिका शिक्षिकेनं आम्हांला दाखवल्या. पण ती म्हणाली की, वर्गात काही विचारलं तर हा उत्तर देणार नाही. शिक्षित वारल्यांचा बिभिस्तपणा अजून गेला नाही. त्यांच्या हालचालींतून अजून आत्मनिर्भरपणाचा आननंदायी प्रत्यय येत नाही. पण हाच वारली तीस वर्षापूर्वी सावकारांविरुद्ध मूठ वळवून आव्हान देत होता, हे कसं काय, असं जयंतरावंना आम्ही विचारलं तेव्हा ते म्हणाले, ''व्यक्ति म्हणून तो अजून भित्रा आहे.'' कम्युनिस्टांच्या लढ्यातसुद्धा नेतृत्व बाहेरच्यांचंच होतं आणि संघटनेतही दहशतीचा भाग बराच होता असं घोलवडचे वामनराव आप्पा अमृते वगैरे जुनी मंडळी सांगतात. शहाद्यात भिल्लांमध्ये अंबरसिंग सुरवंती होऊन गेले तसा लढाऊ स्थानिक पुढारी अजून वारल्यांमध्ये झालेला नाही. मनोर भागात भूमिमुक्तीचा लढा लढवणारे भूमिसेनेचे संस्थापक काळूराम दोधडे आहेत; पण त्यांचं कार्य अजून मर्यादित आहे. आणि ते या दोन्ही संस्थांच्या परिसराच्या बाहेर आहे. वारल्यांच्या मनावरचा हा गंज काढून टाकायला अजून बरीच वर्ष लागतील असं वाटतं. म्हणूनच आम्ही वारल्याला त्याची अस्मिता दिली, हा गोदावरी परुळेकरांचा दावा जरा तोलूनमापूनच घ्यायला हवा.

## ४. मागे वळून पाहताना -

अनुक्रमे तीस आणि वीस वर्ष कृषि शिक्षण संस्था आणि ग्राम बाल शिक्षा केंद्र कोसबाड टेकडीच्या उंचवट्यावरून खालच्या पाड्यांवर आपल्या विविध उपक्रमांतून आधुनिक विद्येचा पाऊस पाडीत आहेत. कोकणात पावसाळ्यात हत्तीच्या सोंडेनं पाऊस पडतो, पण डोंगर-टेकडांवरून वाहून तिथल्या नाठाळ जमिनीत फारसा न मुरता हजार वाटांनी परत समुद्राला जाऊन मिळतो. पण ह्या दोन संस्था करीत असलेला वर्षाव अगदीच वांझ जमिनीवर पडलेला नाही.

बदल अगदी मर्यादित आहे आणि मंद आहे. पण त्याचं कारण प्रयत्नांचा उणेपणा हे असण्यापेक्षा, मुख्यत: परिस्थितीची दुराराध्यता हे आहे. एखाद्या सामाजिक समस्येची जटिलता केवढी चक्रावणारी असू शकते हे कोसबाडच्या उदाहरणावरून मनावर विशेष रीतीनं ठसतं. आदिवासी भागात आणि ग्रामीण भागात गरिबांसाठी काम करणाऱ्यांना ह्या अनुभवातून खूप काही शिकण्यासारखंही आहे, आणि एकूण गरिबीविषयक धोरणांविषयी विचार करायला लावण्यासारखंही बरंच आहे.

'जो गूण बाळा, तो जन्मकळा' ह्या इंग्रजी म्हणीची सार्थता ताराबाई-अनुताईंच्या प्रयोगातून प्रत्ययाला आलेली आहे. ताराबाई तर पाळण्यातूनच मुलांना उचलत असत ! शिशुशिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे हे त्यांनी हेरलं हे त्यांचं पहिलं मोठेपण. त्यांचं दुसरं मोठेपण हे की, शिक्षणातून व्हायच्या परिवर्तनाची ज्या नेमक्या ठिकाणी आत्यंतिक गरज आहे त्याच ठिकाणी त्यांनी आपले प्रयोग सर्व शक्तीनिशी केंद्रित केले.

वारल्यांमधला चांगला शेतकरी औपचारिक किंवा अनौपचारिक शिक्षणाच्या संस्कारांमधूनच सिध्द झालेला आहे हेही आपण पाहिलं. ह्या अर्थानं ह्या दोन्ही संस्थांची कामं एकमेकांना पूरक आहेत हे खरंच. पण ह्याहून महत्वाची गोष्ट अशी की, ही पूरकता किती निगडित

आहे हे अधिक जाणतेपणानं ओळखून या संस्थांना आपापले भविष्यकालीन कार्यक्रम नियोजित करावयास हवेत. विशेषत: कृषि शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमाच्या बाबतीत हे ध्यानात येतं की, आदिवासी शेतकऱ्याला नुसती नवी कौशल्यं देणं हे पुरेसं नाही; त्याच्या प्रवृत्तींतच आमूलाग्र फरक व्हायला पाहिजे आणि प्रौढपणी हे होणं फार कठीण आहे असं ध्यानात येतं.

एक गोष्ट आम्ही अधिक तपशिलात जाऊन बघायला हवी होती. तसं केलं नाही, त्यामुळं शेरेवजा काही लिहिणं बरोबर होणार नाही. तरीही विचार महत्वाचा असल्यामुळं त्याचा निर्देश करणं अवश्य आहे. या बाबतचा आमचा एक अनुभव उद्‌बोधक आहे :

केंद्राच्या रात्रशाळेच्या वर्गात दिवाळी वगैरे सणांविषयी धडा चालला होता. आम्ही पाटीलबाईंच्या शिकवण्यात जरा आगाऊपणानं हस्तक्षेप केला आणि मुलांना विचारलं - ह्यापैकी बहुतेक मुलीच होत्या - ''आणखी कोणकोणते सण आहेत ?'' उत्तरं आली : दसरा, संक्रांत, होळी इत्यादी. मग प्रश्न विचारला, ''देव कोणते कोणते आहेत ?'' राम, कृष्ण, विष्णु, शंकर, मारुती, इत्यादी. ''आणखी कोणते देव आहेत ?'' आणखी एकदोन तसेच काही पारंपारिक हिंदू देव. मग आम्ही त्यांना म्हटलं, ''आम्ही लांबच्या भागातून आलो. तिकडं हे देव आम्ही कधी ऐकले नाहीत. आमच्याकडं देव आहेत ते म्हणजे नारण देव, हिरवा देव, हिमाई देवी, खळ्या देव, भरंभा, वाघया...'' ह्यातला विनोद ध्यानात येताच वर्गातल्या मुलींमध्ये हास्याची लाट उठली आणि एकामागून वारली देव, वारली सण, प्रत्येक सणाचा तपशील हे सांगायची चढाओढ लागली. मग आम्ही मुलींना नाचायला सांगितलं आणि एरवी लाजणाऱ्या ह्या मुली दणकून नाचल्या.

वारल्यांना मुख्य समाजात मिसळून घेण्यातली ही जटिल समस्या आहे हे खरंच. पण तिला योग्य उत्तर शोधून काढीत राहिलं पाहिजे हेही तितकंच खरं. आम्हांला शंका येत राहिली ती अशी की, हा वारली अजून डवरून येत नाही, बिभिस्तच राहिला आहे ह्याचं कारण आपल्या पारंपरिक संस्कृतीच्या आणि जीवनपध्दतीच्या उणिवा अभावितपणेच पण पदोपदी त्याच्या नजरेला आणल्या जातात, हे असेल कां ? स्वाभिमान ही कर्तृत्वाची जननी असेल तर वारल्याला आपलंही काही चांगलं आहे, मोठं आहे, असं वाटायला पाहिजे. त्याच्या संस्कृतीतल्या करणात्मक बाजूंवर भर देऊन त्याला त्याचा वंशीय आत्मगौरव बहाल करायला हवा आहे. मुळातच न्यूनगंडानं आणि भयगंडानं तो पछाडलेला आहे, पण त्याच्या अर्वाचीन इतिहासात गोदाराणीच्या बंडाचं एक दैदीप्यमान पानही आहे. अधिक विधायक रीतीनं हा त्याच्या अस्मितेचा हुंकार फुलवता येणार नाही काय ?

दुसरा ह्याच्याशीच संबंधित असा एक व्यावहारिक प्रश्न आहे आणि तो कसा सोडवावा हे सांगणं कठीण आहे. ''हे वारली, हे आदिवासी...'' ह्या शब्दांचा नाही म्हटलं तरी ह्या वातावरणात गजर होत राहतोच. हे बरंचसं अपरिहार्य आहे हेही जाणवतं. आम्हीही ह्याच प्रकारच्या चौकश्या संस्थासंस्थांमधून, वर्गावर्गांमधून करीत होतो आणि हा कोकणा, हा भील, हा वंजारी, हा भंडारी अशी माहिती मिळवीत होतो. इतर पाहुणेही हेच करीत असणार. ह्यातला ध्वनी आदिवासींना मोठा

सुखावह वाटत असेल असं नाही. अशा वर्णनाची व्यावहारिक गरज सर्वस्वी निपटून काढता येणार नाही, पण त्याच्या काहीशा अनिष्ट परिणामांची जाणीव मनात ठेवली तरीही बरंचसं काम होण्यासारखं आहे.

हेतुपूर्वक 'सुधारणा' करू पाहणाऱ्या कोणत्याही संस्थेचं लक्ष सुधारणा-विषयाच्या उणिवांकडेच मुख्यत: राहतं हे साहजिक आहे; पण हे ध्यानात घेऊनच कामाला व्यापक संदर्भ देणं अगत्याचं ठरतं.

आणखीही एक ह्यासारखाच प्रश्न. आदिवासींची एकूण गरज चांगल्या शेतीची, चांगल्या शिक्षणाची एवढीच नसून अन्यायपरिहाराची, त्यांच्या न्याय्य हक्कांबाबत त्यांना जागृत करण्याचीही आहे. किंबहुना ह्या सर्व गोष्टी एकमेकींत अविभाज्यपणे गुंतलेल्या आहेत. गोदावरींनी रचनात्मक कामाकडं संपूर्ण दुर्लक्ष केलं आणि ह्या संस्था किमान आवश्यक अशा सामाजिक जागृतीलाही वाव देत नाहीत असं आहे काय ? ह्या संस्था सरकारी मदतीवर अवलंबून आहेत हे लक्षात घेऊनही असं वाटतं की, ह्या मर्यादेतही समाजस्थितीची आणि त्यातील आदिवासींच्या स्थानाची त्यांना जाणीव करून देता येईल. उदाहरणार्थ, कृषि शिक्षण संस्थेच्या 'आदिवासी जनता विद्यालयात' पाच जिल्ह्यांमधले सुमारे चाळीस आदिवासी तरुण दरसाल शेतीशिक्षणासाठी येतात. ह्यांतले काही तरुण आमच्याशी बोलताना आपापल्या भागातल्या सामाजिक-आर्थिक स्थितीविषयी बऱ्याचशा जागरूकपणानं बोलत होते. पण ह्या चर्चांना नियमित संस्थात्मक स्वरूप देणं कृषि शिक्षण संस्थेला शक्य आहे. थोडक्यात, आपापल्या भागात परत गेल्यावर हे तरुण नव्या प्रकारचं सामाजिक नेतृत्व करू शकतील असं काही पाठबळ त्यांच्या शिक्षणक्रमाला देता येईल. मॉंटेसोरीबरोबर शिक्षणाला सामाजिक जाणिवेची धार देणारा पॉलो फ्रिअरेही त्यात थोडा दाखल करून घेता येईल.

ह्या भागात कडक दारूबंदी खरोखरच करता आली तर व्यक्तिस्वातंत्र्य बाजूला ठेवून ती अंमलात आणावी असं आम्ही म्हणू. पण आजच्या शिथिल आणि हितसंबंधांनी प्रभावित असलेल्या प्रशासनाकडून हे होणं सर्वथा असंभवनीय आहे. मग उरतो तो उपाय शिक्षणाचा व संघटित प्रचाराचा. ह्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळांतल्या मुलांना उत्तेजन देऊन आसपासच्या पाड्यांवर त्यांना ह्या उपक्रमाचं नेतृत्व करायला उद्युक्त करायला हवं. ह्याचबरोबर आरोग्य आणि लोकसंख्यानियंत्रण यांचाही पाठपुरावा करायला हवा. गृहसुधारणेच्या इतर उपाययोजना नंतर सावकाश आल्या तरी चालतील. अर्थात हा प्रश्न पैशाचा आहे आणि आत्ताच दरसाल सहस्त्रावधी रुपयांची तूट भरून काढायला दोन्ही संस्थांमधल्या कर्त्या माणसांना विवंचना आणि धावाधाव करावी लागते. पण आपल्या अनेक उपक्रमांचा पुनर्विचार करून त्यांतले अग्रक्रम अधिक जाणतेपणानं पक्के करणे कृषि शिक्षण संस्थेला तरी शक्य आहे असं वाटतं.

आणखी असं वाटतं की, कृषि शिक्षण संस्थेचा जोर आजपर्यंत तरी तांत्रिक संशोधनावर जास्त राहिलेला आहे. वारल्यांमध्ये कुठल्या गोष्टी रुजतात, कुठल्या नाकारल्या जातात, स्वीकारल्या आणि नाकारल्या जाणाऱ्या गोष्टींची कारणं काय, त्यांतली आर्थिक कोणती, सामाजिक कोणती, ह्याचं सततचं परीक्षण आणि त्या संदर्भात आपल्याच प्रयत्नांचं मूल्यमापन

व्हायला हवं. उत्कृष्ट कृषिवैज्ञानिक प्रयोगशाळा इथं नुकतीच स्थापन झाली, पण अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र ह्या विद्यांची अजून गंभीरपणानं दखल घेतली जात नाही. ह्याची जयंतरावांना जाणीव आहे. ते म्हणतात, एक अडचण आर्थिक आहे; दुसरी अडचण योग्य प्रकारच्या अभ्यासकांची. हे सगळं खरं आहे. पण प्रयत्नांना प्रारंभ तरी व्हायला पाहिजे. साव्यांचाही वारसा चालू राहिला पाहिजे. अर्थात अडचणी आहेतच पण जयंतरावांची जिद्दही आहे.

ह्या मुद्याचा विचार करताना 'खालचे पाडे' आणि 'वरची टेकडी' ह्यांमधलं अंतर प्रतीकरूपानं पुन्हा वेगळ्या संदर्भात आमच्या डोळ्यांपुढं उभं राहिलं. कैनाड गावातच तीस वर्षे आश्रम चालवीत आपल्या पध्दतीनं काम करणारे वसंतराव नारगोळकर आम्हांला म्हणाले, ''वारली बदलतो आहे. पण त्याच्यात राहून काम करायला हवं. कोसबाडचं काम चांगले आहे. पण त्यांचीही 'कॉलनी' झाली आहे.'' पण नारगोळकरांचं म्हणणं, त्यातला ग्राह्यांश धरूनही, शंभर टक्के स्वीकारणं कठीण आहे. संघटित मोठ्या प्रमाणावरचा प्रयत्न करायचा म्हणजे शंभर स्वार्थत्यागी आणि कमालीची सेवावृत्ती असणारे यती एकाच ठिकाणी उपलब्ध झाले पाहिजेत. हे अशक्य आहे. शिवाय यतित्वाच्याही मर्यादा असतात हे अनेक ठिकाणच्या प्रयोगांवरून ध्यानात येतं. अशा स्थितीत सर्वसामान्य लौकिक आकांक्षांची परिपूर्ती आणि कामावरची प्रामाणिक निष्ठा ह्यांचा संगम घडवून आणणं हाच व्यवहार्य मार्ग आहे आणि देशाची सर्वच क्षेत्रांतली आजची निकडीची गरज तीच आहे.

पण आजच्या स्थितीत आणि मर्यादेतही दोन्ही संस्थांनी अधिक शास्त्रशुध्द रीतीनं वारली समाजाच्या मनाचं अवगाहन करणं शक्य आहे आणि जरूरही आहे. तसं झालं तरच ही दरी सांधली जाईल.

लहान आदिवासी शेतकऱ्यांसाठी कृषि शिक्षण संस्था जीव तोडून काम करीत आहे. पण सर्वात चिंताग्रस्त करणारा प्रश्न असा की ह्या शेतकऱ्याचं भवितव्य काय आहे ? किंवा हा प्रश्न अधिक बोचक करूनच विचारायला पाहिजे : ह्या शेतकऱ्याला भवितव्य आहे का ?

हा प्रश्न दुहेरी गुंतागुंतीचा झालेला आहे. एक तर तो 'छोटेखानी-' पणाचा, ह्या परिसरात वरकस धरून सरासरी साडेचार एकर जमीन मालकीचा आहे. दुसरं, 'आदिवासीत्वा'मुळं तो अधिक चिंताजनक झालेला आहे.

एक गोष्ट अशी की, आताच्या विहिरी काही संपूर्ण मोफत किंवा ऐंशी-नव्वद टक्के अर्थसहाय्य मिळालेल्या असल्यामुळं आर्थिक दृष्ट्या तोटयाच्या ठरत नाहीत. बाकीची साधनंही अर्थसहाय्यासह मिळतात. पण भारतातल्या सर्वच लहान शेतकऱ्यांना अशी महाग साधनसामग्री फुकट किंवा जवळजवळ फुकट देता येणार नाही. आज दहा-पंधरा हजार रुपये गिळून बसणारी विहीर, जिथं भरघोस प्रत्याय (रिटर्न्स) देईल अशा मोठ्या शेतावरच कांढणं अधिक शहाणपणाचं, असं अर्थशास्त्र सांगेल. आणि असं व्हायला आदिवासींची जमीन वरकस सोडून पाचसहा एकर तरी असायला पाहिजे असं जयंतराव सांगतात. प्रचलित सरकारी विचारसरणीत हा विचार अर्धवटरीत्या मान्य करण्यात आला आहे. 'छोटा' शेतकरी आणि 'सीमान्त' (मार्जिनल) शेतकरी अशी विभागणी करून सीमान्त

शेतकरी केवळ शेतीवर जगू शकणार नाही ह्या विचाराला मान्यता देण्यात आली आहे. पण प्रचलित शेतीतंत्राच्या उपयोगानं किफायतशीर ठरणाऱ्या आजच्या 'छोटया' शेतीचं पुढच्या पिढीत 'मार्जिनल' मध्यें रूपांतर होणार आहे हें ध्यानात घेतलेलं नाही.

ही प्रक्रिया कशी घडणार आहे हे आताच दिसतं आहे. आपल्या पूर्वीच्या यादीतले नामवंत शेतकरी क्रमानं घेऊ. जानू दळवीचा एक एकर आहे आणि त्याला तीन मुलगे व एक मुलगी अहे. बारक्या चैत्या इभाडची जमीन तीन एकर आहे आणि त्याला चार मुलं आहेत. रघ्या काकडा ह्याची सव्वादोन एकर जमीन आणि एक मुलगा व चार मुली, बुजड गुरुजींचे दोन एकर आहेत. त्यांना दोनच मुलं आहेत. त्यांचं वय एकतीस आहे. गोविंद वळवीचे चार एकर आहेत आणि त्याला एकच मुलगा आहे. हा संसार एवढाच ठेवावा, फार तर आणखी एक मूल होऊ द्यावं, असं आम्ही गोविंदाला सांगितलं. गोविंद सहावीपर्यंत शिकला आहे, त्यानं जनता विद्यालयाचा शिक्षणक्रम पुरा केला आहे, पण म्हणाला, ''आमच्याकडं भुतं करतात. माझे दोन भाऊ गेले पाहा; कुणीतरी भुतं केली. तेव्हा पाचसहा मुलं असलेली बरी.'' गोविंद तिशीच्या आतला आहे. देवजी बारक्या हाडळचे सहा एकर आणि सहा मुलगे आहेत. दत्ता वरठाचे चार एकर आणि दोन मुलगे. रडक्याची जमीन अडीच एकर आहे, मुलं दोनच आहेत; रडक्याचं वय तेवीस आहे.

ह्या शिक्षित किंवा संस्कारित आणि सर्वसाधारण सुजाण शेतकऱ्यांपैकी बहुतेकांची मुलं शाळांत जातात. त्यांना नोकऱ्याही मिळतील. त्यामुळे शेतीवर कदाचित सगळ्यांना अवलंबूनही राहावं लागणार नाही. पण इतरांची गत काय ?

पूरक उद्योगांना आदिवासींमध्ये प्रतिसाद नाही. छोटेपणामुळंही पूरक उद्योगांत अडसर येतो हे अजून आर्थिक धोरणात ध्यानात घेतलं जात नाही. मधुमक्षिका पालनाचा प्रचार ह्या भागात कृषि शिक्षण संस्थेच्या सहकार्यानं करणारे एम० डी० चौरे म्हणाले की आमचं काम इथं पंधरा वर्ष चालू आहे. एकशेऐंशी पेटया बसवल्या आहेत. त्यात फक्त दोनतीन आदिवासींच्या आहेत. मोठे बिगर-आदिवासी शेतकरी पंधरा-पंधरा पेट्या ठेवतात. एका पेटीची किंमत रुपये ऐंशी. आडवड्यातून एकदा तपासण्याचं पंधरा-वीस मिनीटांचं काम. पण उत्पन्न दरसाल सवाशे ते दीडशे रुपये. पण पेटी संभाळायची म्हणजे राखणदार हवा. मोठ्या मळेवाल्याकडं राखणदार असतोच त्यामुळे त्याला वेगळा खर्च नाही. लहान माणूस काय करणार ? शिवाय आदिवासी शेतजमिनीवर माशांना हंगामीच फुलं मिळतात, त्यामुळं वर्षभर मध मिळत नाही. याउलट चिक्कूचे मळे करणाऱ्यांची स्थिती आहे. सतरा टक्के प्रथिने देणारं स्टायलो गवत काढायचं तर त्याला वेगळा प्लॉट हवा. मग दुभत्याची भाषा. लहान तुकड्यावर निर्वाहशेती करणारा माणूस हातचं भात सोडून गवताच्या मागं लागेल कसा ? बांधावर चारसहा कलमं असली तर आंब्याचा व्यापार म्हणून फारसा उपयोग नसतो, त्याला मोठाल्या बागाच हव्यात. नवल नाही की, कृषिशिक्षण संस्थेच्या अनेक नुतनीकरणांचा फायदा मोठे (बिगर-आदिवासी) शेतकरीच घेतात. शिवाय आदिवासींचे लोकभ्रम आणि पारंपरिक स्थितिशीलता ह्या गोष्टींमुळे हा प्रश्न अधिक तीव्र होतो.

प्रा० वि० म० दांडेकर आणि नीलकंठ रथ ह्यांनी आपल्या 'भारतातील दारिद्र्य' ह्या पुस्तकात प्रचलित धोरणाचं वैय्यर्थ्य प्रभावी रीतीनं विशद केल्याला आता आठ वर्ष झाली. लहान शेतकऱ्यांना भवितव्य नाही हे त्यांनी पुरेशा तपशिलानं स्पष्ट केलं आणि हमीयुक्त ग्रामीण रोजगारी देऊन ह्या मंडळींना शेतीबाहेर निर्वाहसाधन उपलब्ध करून देणं हा एक मार्ग आपल्याला उपलब्ध आहे असं सांगितलं. कोसबाडचा अनुभव पाहून आमचाही हाच ग्रह बळावला. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रातल्या सुमारे शंभर ग्रामसेवकांच्या सभेत आदिवासी व इतर भागात काम करणाऱ्या अनेक ग्रामसेवकांनी आम्हांला स्पष्टपणानं सांगितलं की ह्यांच्यासाठी काम करणं व्यर्थ आहे; मध्यम शेतकऱ्यांकडं मदतीचा ओघ वळवला पाहिजे. ह्या भागात अनेक वर्ष काम केलेले फादर मिरांडा ह्यांनी जयंतरावंना सल्ला दिला होता, ''ह्यांच्या जमिनी तुम्ही घ्या आणि त्यांना मजूर म्हणून लावा,'' तो आम्हांला आठवला. आदिवासी हे 'मजूर' म्हणून अधिक चांगले आहेत हे सार्वत्रिक निरीक्षणही ह्या सल्ल्याला साथ देणारंच आहे हेही ध्यानात आलं.

पण ह्या गोष्टी एकूण राष्ट्रीय धोरणाच्या-म्हणजेच जयंतराव आणि अनुताई ह्यांच्या कार्यकक्षेच्या पलीकडच्या आहे. प्रचलित विचार प्रणालीच्या मर्यादेत ते आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. पण कदाचित दांडेकर-रथ ह्यांच्या वैचारिक चौकटीला राष्ट्रीय पातळीवर उठाव मिळाला तर अनुताईंच्या बालवाडीतल्या मुलांचा खाऊचा प्रश्न सुटेल, 'खाता येईल अशी वस्तू निर्माण' करण्याचं शिक्षण कसं द्यायचं ही ताराबाईंना भेडसावणारी समस्या परस्पर सुटेल आणि जयंतरावांना अर्जुन सिडवा उराड्या, हडक्या परशुराम वाढाण, गोविंद लक्ष्मण वळवी ह्यांच्यासारखा अधिक सुस्थितीतल्या आणि कमी संचित पिढ्या निर्माण करण्याकडं अधिक मोकळेपणानं लक्ष देता येईल.

सहकारी शेतीचा विचार मधूनमधून डोळ्यापुढं येतो, पण सामुदायिक विहिरींच्या अनुभवानं तो मनातल्या मनात विरघळून जातो.

ह्या विषयांचा जास्त ऊहापोह ह्या लेखाच्या मर्यादेत अशक्य आहे म्हणून अगदी ढोबळपणानं आम्ही आमचा निष्कर्ष मांडलेला आहे. पण 'आम्ही काय म्हणतो' ह्यापेक्षा 'कोसबाड काय करीत आहे' ह्याकडं वाचकांचं आणि अभ्यासूंचं लक्ष वेधणं हे आमचं खरं उद्दिष्ट आहे.

थोड्याशा दूरान्वयानं का होईना, गोखल्यांचा भारत सेवक समाज आणि रानडे-भांडारकरांचा प्रार्थना समाज ह्यांच्या नैतिक ऊर्मी तीनचार पिढ्या टिकवून धरण्याचा चमत्कार करणाऱ्या ह्या दोन संस्थांनी एक समृद्ध सामाजिक प्रयोगशाळा इथं उघडलेली आहे आणि वर्षानुवर्ष चालवलेली आहे. ती मुंबईपासून फक्त ऐंशी मैलांवर आहे. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की तिथं मदतगारांची आणि दात्यांची जशी बूज आहे, तशीच वस्तुनिष्ठ अभ्यास करणाऱ्यांची कदर आहे. आपल्या प्रयोगाचं परीक्षण आणि मूल्यमापन होत राहाणं ही आपलीच एक गरज आहे असं वाटण्याएवढा विरळाच प्रगल्भपणा त्यांच्यात आहे आणि असं करणाऱ्या व्यक्तींना त्याचं पूर्ण सहकार्य आहे. ह्या उर्मीपुढे विनम्र

होऊन आणि ह्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून आम्ही हा लाबंलेला लेख पुरा करतो.

(**खुलासे आणि ऋणनिर्देश :** फिलिप कूब्ज ह्यांच्या 'इंटरनॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट' ह्या संस्थेसाठी आम्ही तयार करीत असलेल्या अहवालाचा एक भाग ह्या लेखात समाविष्ट आहे. कूंब्ज ह्यांच्या प्रतिनिधी प्रतिमा काळे आणि स्वत: कूंब्ज ह्यांनीच अशा तऱ्हेचा लेख वाचकांपुढे ठेवण्याची सूचना केली. तळटिपा वाचकांना विक्षेपकारक झाल्या असत्या म्हणून टाळल्या आहेत, पण मुख्यत: पुढील वाङ्मयाचा उपयोग केला आहे. डी० सिमिंग्टन : 'रिपोर्ट ऑन द ॲबॉरिजिनल अँड हिल ट्राइब्ज'; के० जे० सावे : 'वारलीज्'; कुसुम नारगोळकर, वसंत नारगोळकर : 'जंगलचे राजे'; शं० रा० भिसे : 'जंगलातील छाया' (कादंबरी) व या कादंबरीला जोडलेले यदुनाथ थत्ते लिखित आचार्यांचे चरित्र; कर्णिक : 'वाडघीण' (कादंबरी); गोदावरी परुळेकर : 'जेव्हा माणूस जागा होतो'; स० आ० केळकर : 'ताराबाई व बालशिक्षण', ग्रामीण बालशिक्षणाचे प्रश्न.' ताराबाईंची भाचेनात पद्मजा फाटक यांनी लिहिलेले व प्रकाशनाच्या मार्गावर असलेले ताराबाईंचे चरित्र पद्मजाबाईंनी मोठ्या उदारपणे आम्हाला वाचायला दिले. गो० ए० सोसायटीच्या आर० एम० भट हायस्कूलचे प्राचार्य ना० गो० जोशी व सू० पे० ह० विद्यालयाचे प्राचार्य एन्० के० पाटील यांनी संस्थेविषयी वाङ्मय उपलब्ध करून दिले. लोकहितवादींचा उतारा सरोजिनी वैद्य लिखित 'गोपाळराव हरि' या पुस्तकामधून घेतला आहे. पार्ले महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा० विद्याधर अमृते यांनी नकाशा तयार करून दिला. ज्या लेखकांनी दिलेल्या माहितीचा पुरेशा तपशिलासह संदर्भ आम्हांला देता आला नाही त्यांनी आम्हांला क्षमा करावी. आम्हांला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केलेल्या ह्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. ज्यांनी आमचं आदारातिथ्य केलं त्या दोन्ही संस्था, त्यांचे अनेक कार्यकर्ते, ज्यांनी मुलाखती दिल्या ते सर्व, आणि मुख्यत: आम्हांला ज्यांच्या सहकार्याशिवाय काहीच करता आलं नसतं ते वारली शेतकरी आणि इतर स्त्रीपुरुष ह्यांचं आमच्च्यावर फार मोठं ऋण आहे. लेख वाचून सूचना केल्याबद्दल विजय तेंडुलकर यांचे आभार.)

('मौज' दिवाळी १९७८ मधून साभार)

● ● ●



ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते आचार्य शंकर रामचंद्र भिसे यांनी दिनांक १०/२/१९६६ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या शोषणाबद्दल कैफियत मांडली होती. ते पत्र आम्ही येथे पुनर्मुद्रित करत आहोत.

Bordi, 10.2.66.

Dear Shri Mutatkar I am in receipt of your letter of 7th. It is a painful fact that the exploitation of the Adivasis in Thana is terrible. We are trying though in a very humble way to stop this exploitation. A note on this subject by people who are studying the subject would be very useful.

Can you give us some suggestions as to how this exploitation should be stopped? Have you heard that Govt have taken a bold step in stopping this by providing Rs 25 lakhs last year for this very important work?

Yours Sincly

S R Bhise

पोस्ट कार्ड POST CARD

केवल पता ADDRESS ONLY

INDIA भारत

POONA

THANA

Shri R. K. Mutatkar,

Deccan College,

Poona 6.

# जगदीश : एक कलंदर अभ्यासक

*- रा. के. मुटाटकर*

बऱ्याच दिवसांनंतर गेल्या महिन्यात जगदीश धुमकेतूसारखा पुणे विद्यापीठात मला भेटायला आला. त्याने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या प्रकल्पांची व मानसपुत्र नियतकालिक 'हाकारा'ची आस्थापूर्वक विचारपूस केली. परिषदेच्या कार्यात परत सक्रिय होण्याची त्याची इच्छा दिसली. परंतु एकाएकी, पुढच्याच आठवड्यात त्याला हर्डीकर हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे, ही धक्कादायक बातमी समजली. डॉक्टरांनी त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले. त्यामुळे गेल्या वीस वर्षांचा स्नेहमय ऋणानुबंध डोळ्यासमोर उभा राहिला.

> *महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे उत्साही व धडाडीचे कार्यकर्ते, 'हाकारा' चे पहिले कार्यकारी संपादक, पर्यावरण क्षेत्रातील तळमळीचे व अभ्यासू कार्यकर्ते*
>
> ***जगदीश गोडबोले***
>
> *यांचे दिनांक १५ जुलै १९९९ रोजी निधन झाले. या हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला मागोवा.*

जगदीश माझ्याकडे प्रथम १९७७ च्या ऑगस्ट महिन्यात कुलगुरू दाभोळकरांची चिठ्ठी घेऊन आला. मानवशास्त्राचा विभागप्रमुख म्हणून मी जगदीशला काही मदत करावी, अशी त्यांची इच्छा होती. त्याने बस्तरमधील आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी एका कंपनीची देणगी मागितली होती, त्यासाठी त्याला माझे शिफारसपत्र हवे होते. काहीही प्रश्न न विचारता तत्काळ शिफारसपत्र मिळाल्याबद्दल त्याने अनेक सभासमारंभांतून माझे कौतुक केले. मी त्याला त्याचे कारण सांगितले, की शहरी माणूस आदिवासी भागात शोषण करायला तरी जातो किंवा अभ्यास करण्याकरिता जातो. एरवी त्रास सोसून आदिवासी प्रदेशात जाणारा माणूस विरळाच. नोव्हेंबर-डिसेंबर ७७ मध्ये मानवशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी विभागाला अक्षरशः टाळे लावून जगदीश व त्याचा मित्र पापा पाटील यांच्यासह बस्तरला गेले होते, त्यानंतर तो परत काही कार्यकर्ते व अभ्यासकांना घेऊन इंद्रावतीच्या मोहिमेवर गेला व त्यातून त्याचे इंद्रावतीवरचे पुस्तक

जन्माला आले. अलीकडच्या काळात 'पारध' पुस्तकासाठी व सई परांजप्यांच्या 'पपिहा' चित्रपटासाठी माझी शिफरसपत्रे घेऊन त्याने बस्तरच्या वाऱ्या केल्या.

१९७९ च्या फेब्रुवारी महिन्यात परिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्रातील आदिवासींच्या समस्या' या विषयावर पुणे विद्यार्थिगृहात एक चर्चासत्र घेण्यात आले.त्यात जगदीशने जंगल जमिनीच्या प्रश्नावर आपले विचार मांडले. या चर्चासत्राच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध विभागांतील आदिवासी कार्यकर्ते प्रथमच एकत्र आले. त्यांनी, परिषदेने आदिवासींच्या प्रश्नाला वाहिलेले एखादे नियतकालिक काढावे, अशी मागणी केली, प्रा. सरदारांनी नामकरण केलेल्या 'हाकारा' नियतकालिकाची धुरा संभाळण्याची जबाबदारी जगदीशने आनंदाने स्वीकारली. कार्यकारी संपादक म्हणून काम करताना त्याने थोड्याच काळात 'हाकारा'ला झळाळी प्राप्त करून दिली. आजही तळागाळातील आदिवासी कार्यकर्त्यांना 'हाकारा'चे व्यासपीठ स्वत:चे विचार मांडण्यासाठी व मार्गदर्शनासाठी उपयुक्त ठरत आहे.

'हाकारा'च्या माध्यमातून जगदीशने अदिवासींच्या जंगल जमिनीचे हक्क व प्रश्न आणि पर्यावरणाविषयक समस्या यांवर परखड व सर्वंकष चर्चा घडविली. मोठ्या धरणांमुळे निर्माण झालेला आदिवासी विस्थापितांचा प्रश्न तेवढ्याच हिरिरीने मांडला. श्री. सुंदरलाल बहुगुणा व श्री. चंडिप्रसाद भट यांच्याशी चर्चा करून 'चिपको आंदोलना'ची माहिती 'हाकारा'च्या माध्यमातून लोकापर्यंत पोचविली. मार्च ८२ मध्ये महाराष्ट्रातील आदिवासी व सामाजिक कार्यकर्त्यांचा ५७ जणांचा गट घेऊन चिपको आंदोलनाचा अभ्यास करण्यासाठी जगदीशने उत्तराखंड मोहीम काढली. हाकारातील जंगल व जंगल विकासाच्या प्रश्नांना बिचकून महाराष्ट्रातील नाशिक येथील वन विकास महामंडळाने परिषदेच्या कार्यकर्त्यांना स्वखर्चाने पेठ तालुक्यातील वन विकासाचे कार्य तीन दिवसांच्या भेटीत दाखविले. आदिवासी, जंगल व पर्यावरण हे जगदीशचे आवडते विषय. या विषयांचा त्याने 'हाकारा'तून सतत पाठपुरावा केला. गेली काही वर्ष पश्चिम घाट बचाव मोहिमेत तो गुंतला होता.

प्रा. गं. बा. सरदारांची जगदीशवर माया होती. गमतीने ते म्हणायचे, 'जगदीश कुमार वयातून बाहेर पडावयास तयार नाही.' जगदीशचा बहिरंग जरी बिनधास्त स्वरुपाचा असला, तरी तो मनाने अतिशय हळवा व वागणुकीने दिलदार होता. त्याला आमच्या सर्वांबद्दल अतिशय आदर होता. बहुतेक कार्यकर्ते हे लेखनात कच्चे असतात; परंतु जगदीश एक खंदा कार्यकर्ता व खंदा लेखक होता. मी गेल्यावर जगदीशने माझ्यावर खचितच मृत्युलेख लिहिला असता; परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते.

□□□

## शोकसभा

हाकाराचे पहिले कार्यकारी संपादक व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे माजी सहसचिव श्री. जगदीश गोडबोले यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेतर्फे दि. १८ जुलै १९९९ रोजी पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात शोकसभा घेण्यात आली.

शोकसभेस परिषदेचे सभासद, विविध स्वयंसेवी संस्थांतील मान्यवर व कार्यकर्ते, अभ्यासक, 'जीवन' संस्थेतील कार्यकर्ते, ग्रामस्थ, परिवारातील सदस्य व मित्रमंडळी असे एकूण ७५-८० जण उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्रा. अ. रा. कुलकर्णी होते.

'ममाविप'चे सचिव प्रा. रा. के. मुटाटकर यांनी सभेचे प्रास्ताविक करताना, १९७७ साली जगदीशबरोबर प्रत्यक्षात कामास सुरूवात झाल्यापासून त्याने बस्तरमधील आदिवासी भागात केलेले काम, १९७९ साली पुणे विद्यापीठात आयोजित केलेल्या 'महाराष्ट्रातील आदिवासींच्या समस्या' या चर्चासत्रामध्ये आदिवासी आयुक्तांसमोर जंगलजमिनीच्या प्रश्नावर अभ्यासपूर्वक मांडलेले विचार अशा जुन्या स्मृतींना उजाळा दिला.

त्यानंतर प्रा. राम शेवाळकर यांनी पाठविलेला शोकसंदेश वाचण्यात आला.

श्री. गोडबोले यांच्याबरोबर १४ वर्षे काम करणारे श्री. रविंद्र देसाई यांनी भावना व्यक्त करताना एक माणूस म्हणून जगदीश मोठा होता असे नमूद केले.

सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्री. प्रशांत कोठाडिया यांनी गोडबोले यांच्या जीवन संस्थेचे काम मावळातील ज्या जवण गावात चालू आहे तिथे त्यांच्या बरोबर सहा महिने काम करताना आलेले स्वतःचे अनुभव सांगितले. त्याच बरोबर जगदीश गोडबोले यांच्या निर्भिड व धाडसी वृत्तीचे दर्शन घडविणाऱ्या काही घटना सांगितल्या.

ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या श्रीमती विद्या बाळ यांनी जगदीशची संवेदनशील लेखक, माणूस तसेच एक कलंदर कार्यकर्ता म्हणून त्यांना झालेली ओळख याविषयी आपल्या भावना शब्दबद्ध केल्या.

परिषदेचे कार्यकारी सदस्य श्री. मिलिंद बोकील यांनी गोडबोल्यांनी केलेले आदिवासीविषयक लिखाण, आदिवासीं विषयीची त्यांची तळमळ आणि आदिवासींना एक माणूस म्हणून बघावे ही भूमिका तसेच आदिवासींबरोबर काम करताना, राहताना जगदीशने उचललेले आदिवासींचे स्वभावधर्म, गुण-दोष या विषयांचा एकत्रितपणे आढावा घेतला.

जवण गावातील एक ग्रामस्थ श्री. दत्तोबा शिंदे यांनी १९८३ साली श्री. जगदीश गोडबोल्यांनी त्यांच्या गावात काम सुरू केले त्यावेळच्या आठवणी सांगितल्या. श्री. गोडबोले यांच्या प्रेरणेने मावळ भागातील १६-१७ गावात वृक्षलागवड मोठ्या प्रमाणावर झाली व आपण स्वतः ५०० झाडांची लागवड आत्तापर्यंत केल्याचे सांगितले. ''वृक्ष हा आत्मा आहे त्याची जोपासना करा'' ही जगदीशची शिकवणूक होती. गावकरी या गावातून त्या गावात

पायी जात असतील तर जगदीश मूठभर झाडांच्या बिया त्यांच्या हातात देऊन वाटेत बिया टाकत जायला सांगत असे अशी आठवण त्यांनी सांगितली.

जीवन संस्थेचे ज्येष्ठ कार्यकर्ते व श्री. गोडबोले यांच्याबरोबर १७ वर्षांहून अधिक काळ काम करणारे श्री. गुलाब सपकाळ यांनी श्रद्धांजली वाहताना शोकसभेस आवर्जून उपस्थित असलेल्या जवण गावच्या ग्रामस्थांकडे सगळ्यांचे लक्ष वेधले. ते म्हणाले सध्या लावणीची कामे जोरात चालू आहेत, अशा वेळी मयत झाली तरी मढं झाकून ठेवून पहिल्यांदा लावणीचं काम शेतकरी लोक करतात, असे असताना केवळ जगदीशबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गावातील अनेक लोक शोकसभेस आले आहेत यातच जगदीशच्या कामाचे मोठेपण असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामायनचे श्री. अनिल काळे यांनी श्रद्धांजली वाहताना श्री. जगदीश गोडबोले हे रचनात्मक काम करताना लोकांचा सहभाग मिळवण्यात यशस्वी झाल्याचे सांगितले.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी सर्व वक्त्यांच्या भाषणाचा आढावा घेतला व परिषदेतर्फे श्री. जगदीश गोडबोले यांना श्रद्धांजली वाहिली.

सभेच्या शेवटी उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून जगदीशला श्रध्दांजली वाहिली.

□ □ □

# श्रद्धांजली

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्य, 'हाकारा' त्रैमासिकाचे पहिले कार्यकारी संपादक, उत्साही व धडाडीचा कार्यकर्ता **श्री. जगदीश गोडबोले** यांचे १५ जुलै १९९९ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यामुळे परिषद एका खंद्या कार्यकर्त्यास मुकली आहे.

आम्ही गोडबोले कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

- कार्यकारी समिती सदस्य
हाकारा परिवार

# हार्दिक अभिनंदन !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या कार्यकारी समितीचे
सदस्य व तरूण आदिवासी कार्यकर्ता

**ॲड. पद्माकर वळवी**

यांची महाराष्ट्र विधानसभेवर तळोदा मतदारसंघातून
आमदार म्हणून निवड झाली आहे.

त्याचप्रमाणे परिषदेचे स्नेही व आजीव सभासद

**ॲड. के. सी. पाडवी**

अक्राणी महाल या नंदूरबार जिल्ह्यातील विधानसभा
मतदारसंघातून आमदार म्हणून दुसऱ्यांदा निवडून
आले आहेत.

या दोन्ही आमदारांचे परिषद व हाकारा परिवारातर्फे
हार्दिक अभिनंदन व त्यांना आदिवासींच्या
विकास कार्याकरिता शुभेच्छा !!!

**– कार्यकारी समिती सदस्य**
हाकारा परिवार

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

